रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १७ डिसेंबर २०२३



# गोंधळवीरांना सुरक्षिततेची ग्यारंटी हवी ?

आधुनिक केसरी

**लोकसभेचे कामकाज चालू असताना अचानकपणे देशाच्याच तरुणांनी प्रेक्षक गॅलरीतून उडी मारली,घोषणाबाजी केली. त्यांनी धुराची नळकांडी फोडली! यातील तरुणाला माकड उड्या मारत असताना खासदारांनी पकडले. पण हे अतिरेकी नाहीत, हे लगेच लक्षात आले! संसदेत प्रेक्षक गॅलरीतून उड्या मारणे, पत्रके फेकणे, घोषणाबाजी करणे, अश्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. या तरुणांच्या या कृत्याच्या समर्थन होवू शकत नाही. यात संसद सुरक्षा व्यवस्थेत चूक झाली, हे खरे! पण या घटनेवरुन गोंधळवींरांनी संसदेचे बंद पाडणे, कितपत योग्य आहे? या सदस्यांना सुरक्षतेची ग्यारंटी हवी! पण काँग्रेस राजवटीत देश सुरक्षित होता का? याचे उत्तर भारतीयांना द्यायला हवे!**

संसदेवर १३ डिसेंबर २००१ रोजी पाक अतिरेक्यांनी केलेल्या हल्लास बावीस वर्षे झाले.या घटनेच्या स्मृतीदिनी घूसखोरी घटना घडली आहे. तेंव्हा केंद्रात भाजपाचे सरकार.होते. आजही भाजपाचे सरकार आहे.या घटनेत पाक अतिरेकी नसून देशातील तरुणांनी आहेत.हे लक्षात घेतले पाहिजे.या तरुणांनी सुरक्षा व्यवस्थेला भेदून संसदेच्या प्रेक्षक गॅलरीतून प्रवेश मिळविला.पण बुटात धुराच्या नळकांडी घेवून गेले!संसदेतील यातून गोंधळ व सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.पण या घटनेवरुन विरोधी पक्ष राजकारण का करत आहे? भारतीय लोकशाहीत जनतेने निवडून दिलेले खासदार संसदेत काय करतात? काय बोलतात? कसे वागतात! संसदेचे काम कसे चालते! हे पाहण्याची सामान्य माणसाची उत्सुकता असते! त्यामुळे सामान्य माणसासाठी प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जातो! महाविद्यालयीन विद्यार्थी व शाळेचे विद्यार्थी संसदेच्या काम पहाण्यासाठी सहलीने तेथे जातात!तेथे खासदार सामान्य माणसाला पाससाठी पत्रही देतात!यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिस्त पाळतात शिक्षकांच्या सूचनेचे पालन करतात!याचे त्यांना धडे दिले जातात,जर शिस्तीचे पालन केले नाही तर शिक्षाही केली जाते.संसदेत जबाबदार व सन्मानीय सदस्य शिस्तीचे व नियमाचे पालन करत नसतील तर मग ? संसदेत अनेकवेळा सदस्यांचे वर्तन पहाता! शरमेने मान खाली जाते!सभापतींनी ओरडून वारंवार सन्मानीय सदस्यांना खाली बसा! असे विनंती करावी लागते!तरीही सदस्य त्यांची विनंती जुनानत नाहीत ते उर्मटपणे उभेच राहतात!आरडा-ओरड करतात! कुत्र्यांचे आवाज काढतात! तेंव्हा संसदेपेक्षा शाळा तरी बरी वाटते! हे सर्वच सदस्य करतात असे नाही.काही सदस्याना 'संसदरत्न' गौरविले जाते. पण गोंधळामुळे संसदस्यामुळे संसदेचे काम होत नाही,ते ठप्प पाडले जाते!यात जनतेच्या कराचे कोट्यावधी रुपये वाया जातात! मग अश्या ससंद रत्नाचे काय करावयाचे ? असा साधा प्रश्न भारतीय मतदारांचा आहे. संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे,त्याचे पावित्र्य राखले गेले पाहिजे, सत्ताधारी पक्षावर अंकूश ठेवण्यासाठी विरोधी पक्ष जरूर हवा! पण तो बेजवाबदार असू नये!संसद सदस्याच्या वर्तनाबाबत नियमावली आहे. त्याचे काँग्रेस व विरोधी पक्ष पालन करतात काय? मोदी सरकारने घेतलेले सर्वच निर्णय चुकीचे कसे काय असू शकतात? सरकारच्या धोरणात त्रुटी असू शकतात.त्यावर आक्षेप घेणे,सुधारणा सुचविता येते,





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

पण मोदी विरोधातून भाजपा सरकारच्या प्रत्येक धोरणाला विरोध करणे हे काँग्रेस व विरोधी पक्षांनी नीतीच बनलेली आहे.विरोधी पक्षाने एका सदस्याने गृहमंत्री शहा जे बोलतील त्या विरोधात बोलायचे असे आम्ही ठरविले!असे बोलून दाखविले आहे.यावरुनच विरोधी पक्षाचे धोरण लक्षात येते.

संसदेतील घुसखोरी'ची घटना नियोजन पध्दतीने केली गेली हे.यामागे त्यांचा उद्देश काय होता?याला लोकशाही आंदोलन म्हणावयाचे काय? यामागे अराजकता निर्माण करण्याचे कट होता काय?तो उघडकीय यावयाचे आहे.यात तरुणांना अटक करण्यात आलेली असून तपास यंत्रणा याचा छडा लावत आहे.यात एक तरुणी आहे.ती तर देशातील किसान व पहिलवानांच्या आंदोलनात सक्रीय असणारी आंदोलनजीवी आहे.या तरुणांनी संसदेत व बाहेर 'तानाशाही नही चलेगी' अश्या घोषणा दिल्या.त्या कोणाच्या विरोधात ? सरकार का ?देशाच्या विरोधात होत्या? यात तरुण सागर शर्मा हा उत्तरप्रदेशचा,तर मनोरंजन गौड कर्नाटक, अमोल शिंदे हा लातूर,महाराष्ट्र,व नलीमदेवी हरियाणाची आहे.हे तरूण वेग-वेगळ्या राज्यातील राहणारे आहेत.हे तरुण सोशल मिडीयाच्या माध्यमातून एकत्र आले,असे सांगण्यात येते.ते 'भगतसिंह फॅन क्लब' पेज माध्यमातून संपर्कात आले.यात सागर व अमोल हे दोघे तरुण गरीब कुटुंबातील आहेत.यांचे फारसे शिक्षण झालेले नाही.यत एक जण रिक्षा चालवितो,तर दुसरा तरुण नोकरीच्या शोधात आहे.त्यांची पाश्वभूमी गुन्हेगारीची नाही.पण तरुणांनी संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेची टेहळणी केली.त्यांनी प्रेक्षक गॅलरीत जाण्याचे म्हैसूरचे भाजपा खा.प्रतापसिंह यांचेकडून ओळखपत्र मिळविले. श्चर्य म्हणजे! ते बुटात धुराची नळकांडी लपवून सुरक्षा व्यवस्था भेदून गेले.या घटनेवरुन संसदेची सुरक्षा व्यवस्था पोकळ होती,हे उघडकीस आले.हे तरुण दिल्लीत विकी वर्मा व यांच्या घरी थांबले.तेथे त्यांनी कट रचला.यातील 'ललित झा' हा मुख्य सुत्रधार असल्याचे सांगितले जात आहे.त्याचे तृणमूल काँग्रेस नेत्यासोबतचे एक छायाचित्र झळवले जात आहे.भाजपा नेत्यांच्या सबंधाची चौकशी मागणी केली आहे.पण घटनेत दोन गरीब तरुण कसे काय फसले? याचे आश्चर्य वाटते! या तरूणांनी हे पाऊल का उचलले? त्यांचे माथे कोणी भडकविले काय?त्यांचा मोहरा म्हणून वापर केला काय? हे कृत्य तरुणांनी बेरोजगारीच्या प्रश्नावरुन केले,ही पटणारे नाही.कारण यामागे नियोनपूर्व कट दिसतो आहे.या घटनेत राष्ट्रविरोधी शक्तीचा हात आहे काय? हे सर्व बाबी तपासानंतर समोर येतील.पण घटनेवरुन काँग्रेससह विरोधी पक्ष मोदी सरकारला घेरण्यास उतावीळ झालेला आहे.गृहमंत्री अमित शहा यांनी लगेच सभागृहात उत्तर द्यावे,अशी मागणी केली गेली. वास्तविक,संसदेची सुरक्षा व्यवस्था ही संसद संसदीय सचिवालयाची असते.संसदेच्या बाहेर दिल्ली व गृह विभागाची असते.यात लोकसभा अध्यक्ष बिर्ला यांनी संसदेची सुरक्षेची जबाबदारी माझी असून मी सर्वच सदस्याची चर्चा करुन त्या सुधारणा करावयास तयार आह,असे स्पष्टपणे सांगितले.सरकारने याबाबत चौकशी समितीगठीत केली आहे.तपास यंत्रणा या कटात असल्यांना धरपकड करत आहे.या कटामागे उद्देश काय? याचा मास्टरमाईंड कोण ? याची कडी जुळविली जात आहे. तपास यंत्रणा कामाला लागली आहे,यासाठी अवधी दिला पाहिजे. पण मात्र काँग्रेस व विरोधी पक्षाला 'लगीनघाई' करत आहेत. गृहमंत्र्यांकडून हे घडले कसे,याचे उत्तर हवे आहे! त्यांना सुरक्षतेची चिंता नाही.त्यांना मोदी सरकारला घेरणे व लक्ष्य करणे व गोंधळ, राजकारण करावयाचे आहे.यापूर्वी संसदेत अश्या घटना घडलेल्या आहेत.संसदेत ५ मे १९९४ मध्ये प्रेमपालसिंह व्यक्तीने प्रेक्षक गॅलरीतून उडी मारली होती. लगेच चार महिन्यात २४ ऑगस्ट १९९४ मध्ये मोहन पाठकने संसदेत प्रेक्षक गॅललीतून उडी मारली.त्यांच्या पाठोपाठ मनमोहनसिंग तिवारी यांनी घोषणा देत उडी मारली.त्यावेळी विरोधी पक्षांनी इतका गोंधळ घातला नव्हता.आज विरोधी पक्ष सुरक्षतेचा केवळ बहाणा करत आहे. मोदी सरकार ही घटना गांभिर्याने घेत नाही,असा आरोप काँग्रेस करत आहे. मग काँग्रेस पक्षाचे सरकार असताना देश सुरक्षित होता काय?याचे उत्तर जनतेला दिले पाहिजे.मग देशात प्रत्येक मोठ्या शहरात बॉम्बस्फोट होत होते.मुंबई शहरावर पाक अतिरेक्यांची हल्ला करण्यापर्यत मज्जल गेली होती.सामान्य माणसात भीतीचे वातावरण होते. बेवारस वस्तुपासून सावध रहावे!अश्या सावधगिरी सूचना दिल्या जात होत्या.रेल्वे, बस, हॉटेलमध्ये बॉम्बस्फोट झाले,यात शेकडो निष्पाप लोकांचा बळी गेला! हे भारतीयांनी भोगलेले आहे.तेंव्हा काँग्रेस सरकारने गांर्भियाने घेतले होते काय? उलट अतिरेक्यांबाबत सहानुशभूती व अश्रू गाळण्याचे काम केले.पण मोदी सरकार आल्यापासून दहावर्षात देशात कोठेही अतिरेकी हल्ला,बॉम्बस्फोट झालेला नाही.पाकमधून घूसखोरी करून येणाऱ्या अतिरेक्यांचे तेथेच मुडदे पाडून ते कबरीत गाडले जात आहे.संसदेची सुरक्षा महत्वाची आहे,मग त्यासाठी सुधारण्यासाठी विरोधी पक्ष सूचना करू शकतो.पण.यावरुन लगेच गृहमंत्र्याचा राजीनामा मागणे कितपत योग्य आहे? खासदार.प्रेक्षकांना पाससाठी ओळखपत्र देत असतात,पण यावरुन भाजपा खासदारावर कारवाईची करावी, अशी मागणी केली जात आहे. या कटात भाजपा सदस्य सामील असेल तर कारवाईल केली पाहिजे. लोकसभा व राज्यसभेत विरोधी पक्षांनी गोंधळ संसदेचे कामकाज होवू दिलेले नाही. यात लोकसभेचे १४ व राज्य सभेचा १ गोंधळवीर सदस्य हे सर्व दक्षिणेकडील आहेत.आता विरोधी पक्ष या घटनेत बेरोजगार आणि भटकलेले तरुण आहेत,असे म्हणू लागला आहे.या घटनेला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करत आहे. स्वातंत्र्यानंतरही देशातील गरीबी,बेकारी, महागाई हे प्रश्न सुटलेले नाहीत. त्यास केंद्रात दीर्घकाळ सत्तेत असलेले काँग्रेस सरकार जबाबदार नाही काय ? काँग्रेस आपल्या अपयशाचे खापर मोदी सरकारवर फोडत आहे.क्रांतीकारी शहीद भगतसिंह यांनी ९४ वर्षापूर्वी दिल्लीच्या सेंट्रल असेब्लीत बॉंब फेकला होता.भगतसिंग यांचीच प्रेरणा घेवून तरुणाने संसदेत घूसखोरी केली,अशी तुलना या घटेनेशी केली जात आहे. याची लाज कशी वाटत नाही.हेच काँग्रेस व डाव्या पक्षाचे नेते संसदेवरील २००१ च्या हल्यातील आरोपी अफजल गुरू व बॉम्बस्फोटातील आरोपी याकूब मेनन याला फाशी शिक्षा झाली असताना वाचविण्याचे प्रयत्न करत होते.यावेळी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकारांचा पुढाकार होता.या घटनेतील तरुणांना महाराष्ट्रातील 'निर्भय बनो' चळवळीचा नेता मदत करण्यास तयार आहे.यावरुन निर्भय बनो' चळवळीचे चारित्र्य लक्षात येते.भारतीय संसद लोकशाहीचा आत्मा आहे,त्यावर कोणीही घाला घालत असतील तर त्यांचेवर कठोर कारवाई झाली पाहिजे.त्यांचे समर्थन होवू शकत नाही. लोकसभेत 'घूस' कांड यापूर्वी घडले.पश्चिम बंगालच्या तूणमूलच्या काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याच्या कारणावरून लोकसभेने त्यांची खासदारकी रद्द केली. भारतीय कायद्यानुसार भ्रष्टाचारी व्यक्तीच्या विरोधात जोपर्यंत न्याय व्यवस्था जो पर्यंत दोषी ठरवत नाही!तोपर्यंत कायद्याच्या भाषेत दोषी मानले जात नाही.त्यामुळे राजकारणी या तत्वाचा आधार घेत आपण निर्दोष आहोत,आपल्या विरोधात षडयंत्र रचले गेले, असा बहाणा करत असतात.तृणमूल काँग्रेसच्या मुहआ यांचे वर्तन लाचखोरीचा, अनैतिक व असभ्यतेमध्ये मोडते.पण विरोधी पक्षाला 'मुहआ' वरील आरोप नैसर्गिक न्याय तत्वात बसत नसल्याने मान्य नाही.या प्रकरणात विरोधी पक्षांनी केवळ मोदी विरोधातून एकमेकांस सहाय्य करू,अवघे 'इंडिया'आघाडी वाढवू या! असे धोरण स्विकारले आहे.लोकसभेने नीतीपालन समितीचे गठण १६ मे २००० मध्ये करण्यात आले.या समितीत पंधरा सदस्य.यात सत्ताधारी व विरोधी पक्षाचे सदस्य असतात.भाजपाचे सदस्य निशीकांत दुबे यांनी लोकसभा अध्यक्षाकडे तृणमूल काँग्रेसच्या सदस्या लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याचा आरोप केला होता. त्या नंतर हे प्रकरण लोकसभा नीतीपालन समितीकडे पाठविण्यात आले. भाजपा सदस्य विनोद सोनकार यांचे अध्यक्षतेखाली समितीने दि.८ डिसेंबर २०२३ ला महुआ यांची सदस्याता रद्द करण्याची शिफारस केली होती. बांधकाम उद्योजक दर्शन हिरानंदानी, व गौतम अदानी हे मोठे उद्योजक आहेत.हिरानंदानी यांनी अदानीमा लक्ष्य करण्यासाठी संसद सदस्या श्रीमती महुआ मोईत्रा यांना हाताशी धरले. महुआ यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी कोट्यवधी रुपये दिले व महागड्या वस्तु दिल्ला,असा गंभीर आरोप आहे.संसदेच्या खासदारांना प्रश्न विचारण्यासाठी 'युजर आयडी' दिला जातो.खासदाराने वापरावा तो इतराना देऊ नये,असे संसदेचे नियम आहेत.पण महुआंनी स्वतः युजर आयडी हिराचंदानी यांनी दिला,तेच त्याव्दारे प्रश्न विचारत असत. मुहआ यांनी संसदेत चार वर्षात ६१ प्रश्न विचारले.त्यात ५१ प्रश्न तर हिरानंदानी कंपनी सबंधात होते. मुहआ यांच्या लॉगिनचा ४७ वेळा दुबई, ६ वेळा अमेरिका, ब्रिटन, नेपाळ येथून वापर केला आहे.ही बाब गंभीरबाब निदर्शनास आले.त्यात तसेच हिरानंदानी शपथपत्राव्दारे कबूली दिलेली आहे.तरीही तृणमूल काँग्रेसच्या सदस्याला वाचविण्यासाठी काँग्रेस नेते अधीन रंजन चौधरी, मनीष तिवारी यांनी फलंदाजी केली.त्यांनी नीतीपालन समितीला शिक्षा व दंड देण्याचा अधिकार नाही.ज्या सदस्याला दोषी मानण्यात आले त्यांची बाजू ऐकली जात नाही, उलट तपासणी केली नाही.हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरोधात आहे,असे मत म्हणाले. पण काँग्रेस नेत्यांना न्यायपालिका आणि संसदबाबत फरक माहित नाही काय? काँग्रेस नेत्यांनी महुआ यांचे आचारणाबाबत प्रश्न उपस्थित करणे का टाळले? काँग्रेसचे पुतण्या मावशीचे प्रेम उफळून का आले?आज इंडिया आघाडी अनैतिकेचे समर्थन व एकजूट दाखवित आहे,हे दुर्दैव आहे.यापूर्वी २०१२ मध्ये भाजपाचे सहा, बसपा- तीन,व राजद आणि काँग्रेस पक्षाचा एका सदस्याचे सदस्यत्व बरखास्त गेले होते.या सदस्यांनींना बोलण्याची संधी दिली गेली नव्हती. मग आज संसदीय नियम,परंपरंरा वेगळी कशी काय?१९७७ मध्ये तत्कालिन पंतप्रधान मोरारजी देशाई यांनी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी पदाचा दुरूपयोग व अधिकाऱ्यांचा अवमान प्रकरणी विरोधात प्रस्ताव आणला होता.शेवटी विशेषाधिकार समितीने श्रीमती गांधी यांना दोषी मानत सदस्यात रद्द झाली,नंतर एका महिन्यानंतर त्यांचे सदस्यत्व बहाल केले गेले. राहूल गांधींना न्यायालयाने बेताल वक्त्यावरुन शिक्षा झाल्याने सदस्यता रद्द झाली होती. भाजपाचे षडयंत्र म्हंटले गेले होते. यातून गांधी राजकीय 'हिरो' बनू पहात होते.प त्यांना जनतेची सहानुभूती मिळालेली नाही. बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचे चारा घोटाळा प्रकरणात शिक्षेनंतर सदस्यत्व रद्द केले गेले.केवळ मोदी सरकारला सत्तेतून घालण्यासाठी काँग्रेस आणि विरोधी पक्ष,लोकशाही,संसदीय नियमांची, परंपरेची पायमल्ली करत 'राष्ट्राला' पणाला लावत आहे.तो वेगवेगळे हातखंडे वापरत आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# साधेपणा आणि त्यागाची मूर्ती : ज्ञानेश्वरांची माता

आधुनिक केसरी

मुले झाल्यानंतर विठ्ठलपंताना आणि रखुमाबाईना प्रचंड मानहानी सहन करावी लागली. लोक त्यांच्या मुलांना संन्याशाची पोरे म्हणू चिडवू लागले आणि सगळ्यांनी त्यांच्याशी संबंध तोडले. मुलांच्या मुंजी कशा करायच्या हा प्रश्न त्यांना पडला. मग पैठणहून शुद्धिपत्र आणावे असे त्यांनी ठरवले.पैठणच्या वाटेवर असताना निवृत्तीनाथाना गहिनीनाथांचा अनुग्रह झाला. आणि ते धन्य झाले.या मुलांना कधी कोणाचे प्रेम लाभले नव्हते.पण आपल्या विरक्त आणि विद्वान पित्याचा सहवास त्यांना खूप काही शिकवून गेला. आलेल्या संकटाला हसतमुखाने आणि संयमाने सामोरे जाण्यास ते शिकले.आपल्या प्रेमळ मातेकडून क्षमाशील वृत्ती ते शिकले. घरामध्ये कधी कधी खाण्यासाठी काही नसायचे अशा वेळी केवळ पाणी पिऊन उपाशीपोटी झोपण्याची वेळ या निरपराध बालकांवर आली. पण आईचा मायेचा हात फिरला की ते तहान भूक सगळं विसरायचे. त्या थोर मातेने निवृत्तीला सांगितले, की बाळा, तुला जे ज्ञान तुझ्या गुरुकडून मिळाले आहे त्याचा उपयोग तू लोकांच्या कल्याणासाठी कर.आणि ज्ञानदेवाला सांगितले, "ज्ञाना, तू निवृत्तीनाथाला गुरु कर. गुरु हा परब्रह्म आहे." आईचा उपदेश ज्ञानेश्वरांनी तंतोतंत अंमलात आणला.

निवृत्तीनाथाना गुरु केले. निवृत्तीनाथांनी त्यांना सांगितले, "ज्ञानदेवा..लोक अज्ञानी आहेत. त्यांना तू गीतेचे तत्वज्ञान समजावून सांग. " त्यांच्या आदेशावरून ज्ञानेश्वरांनी लोकांना सोप्या भाषेत गीताधर्म समजावून सांगितला.संस्कृतमधील गीतार्थ मराठीतून सांगितला.कारण त्यांच्या हृदयात लोकांबद्दल अपार करूणा होती.वत्सलता होती. जननिंदा आणि छळ सोसूनही त्यांच्या मुखातून अमृतवाणीच बाहेर पडली. लोकांसाठी पसायदान मागितले, जो जे वांच्छिल तो ते लाहो अशी मागणी त्यांनी लोकांसाठी आपल्या गुरूंकडे केली. म्हणूनच ते साऱ्या विश्वाला वंदनीय ठरले साऱ्या जगाची माऊली झाले. लेख खूप मोठा होईल यासाठी मी बाकीचा भाग वगळला आहे. आपल्या सर्वांना ज्ञानेश्वर माउलींचे चरित्र तसे परिचित आहेच. पण ज्या थोर माऊलीने निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई यांसारख्या नररत्नांना जन्म दिला त्या माऊलीची थोरवी जाणून तिचे पुण्यस्मरण करण्याचा हा अल्पसा प्रयत्न . तिच्या पुण्यस्मृतीला शतशः प्रणाम...





## आनंदी पहाट

# सेवाभावी असणे ही आध्यात्मिक संपत्ती

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

इतरांप्रती सेवाभावी असणे ही एक आध्यात्मिक संपत्ती आहे, जी समुदाय उभारणीत योगदान देऊ शकते. काही प्रकारच्या धर्मादाय पद्धतीशिवाय आपलेपणा आणि समुदायाची भावना निर्माण करणे अशक्य आहे, असे काही जणांचे मत आहे. देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही दानशूर असण्याचे भाग्य प्राप्त होत असते. दानशूर व्यक्ती ही केवळ गरजूंनाच मदत करत नाही, तर अशी व्यक्ती स्वतःमध्ये सकारात्मक चारित्र्य आणि वर्तन विकसित करत असते, हे समजून घेतले पाहिजे. धर्मादाय कार्य तुम्हाला इतरांच्या दृष्टीकोनातून जीवन पाहण्याची संधी देते. त्यांचे संघर्ष आणि त्रास, त्यांचे विजय आणि सामर्थ्य हे आपण स्वतः अनुभवत असल्याची प्रचीती येऊ शकते. दुसऱ्याच्या आयुष्याचे साक्षीदार होणे हा एक बहुमान आहे. त्यामुळे तुम्हाला तुमच्या स्वतःच्या जीवनाबद्दल प्रशंसा आणि कृतज्ञता प्राप्त होते. माणूस म्हणून, एक सामाजिक कुळ म्हणून, आपल्याला आश्वासक वातावरणात राहण्याची गरज आहे. जिथे आपले पालनपोषण केले जाते आणि एकत्र भरभराट होऊ शकते, जिथे संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी मजबूत बांधिलकी असते. एकमेकांप्रती दानशूर असणे ही केवळ एक चांगली गोष्ट आहे असे नाही, तर मानव म्हणून आपल्या जगण्यासाठी आणि स्थानिक तसेच जागतिक समुदाय म्हणून आपल्या कल्याणासाठी हे अत्यावश्यक आहे. एक व्यक्ती बेघर असलेल्यांना आश्रयस्थान देण्याची स्वयंसेवा करू शकते, आनंदाने जेवण देऊ शकते आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकते. दुसरी व्यक्ती त्याच आश्रयाला पैसे देऊ शकते. आश्रयस्थानाच्या व्यक्तींना महिन्यातून एकदा साक्षरतेचा वर्ग शिकवून दुसरी तिचं ज्ञान आणि कौशल्य देऊ शकते. ही सर्व दानशूरता आणि सेवाभावी वर्तनाची उदाहरणे आहेत. आपण स्वतःला दुसऱ्याच्या जीवनात दयाळूपणे उपस्थित राहण्याचा अनुभव घेताना स्वतःमध्ये कृतज्ञतेचा अनुभव घेऊ शकतो.

# घर...

आधुनिक केसरी

घर म्हटले की खालील ओळी आवर्जून आठवतात. घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती.... खूप अर्थपूर्ण अशा या ओळी आहेत. खूप मोठे घर आहे पण ते जर घर वाटतच नसेल तर काय अर्थ आहे घराला? आई वडील मुलं सुना नातवंड सगळे आहेत पण त्या नात्यात जिव्हाळा नसेल तर काय उपयोग? बुजगवण्यासारखी नाती नको. त्या नात्यात प्रेम जिव्हाळा ठेवू. म्हणजे घर कसं घरासारखं वाटेल. हॉस्टेल वाटणार नाही. वडिलांनी घर उभारावं, तर आईने त्या घराचं पावित्र्य, मांगल्ये जपावे, तर मुलांनी त्या घराला सांभाळावं.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.28

सर्व नात्यांना एकत्र बांधून ठेवून घराचं घरपण जपावं. दिवसभर कोणी कुठेही गेला तरी संध्याकाळी घराकडे परतण्याची ओढ असावी .घरातील प्रत्येक नात्याचा आदर व्हावा. जसं आई दिवसभर राबते, जेवण बनवते, घराची सर्व जबाबदारी सांभाळते, घराची साफसफाई सगळे ती बारकाईने करते. तेव्हा तिचाही आदर केलाच पाहिजे. कारण खूप महत्त्वाची जबाबदारी ती पार पाडते. तिच्या भरवशावर घरातील इतर सदस्य बिनधास्त बाहेर पडतात. कडी कुलूप दार खिडक्या बंद न करता. घरात कोणी आजारी असतील तर आई तू बघून घे बरं का? असं विश्वासाने सांगतात .मग तिचा तर खूप मान सन्मान केला पाहिजे. खरं तर घर टिकून ठेवण्याचे खरं काम तीच करत असते. नाहीतर प्रत्येक वेळी तिला तू काय दिवसभर घरीच असते!! तुला काय काम आहे दिवसभर!!! घरी राहून बघा तिची काम? ती काय काय करते ... ती नसल्यावर तिचे महत्त्व कळते. अशा या सुगृहणीचा आदर व इतर सर्व सदस्यांचा आदर करू. जिव्हाळा ,नातं जपू. नातं टिकवू.....

# चोरावर मोर

आधुनिक केसरी

**रानात बोरं आणण्यासाठी चाललेल्या एका बारा तेरा वर्षाच्या मुलाला तहान लागली, म्हणून तो वाटेत लागलेल्या विहिरीत पाणी आहे किंवा काय, हे पाहण्यासाठी त्या विहिरापाशी गेला. त्या विहिरीत तो डोकावून पाहू लागला असता, त्याला समोरुन एक उग्र व खुनशी चर्येचा चोर पाठीवर गाठोडं घेऊन, आपल्याच दिशेने येत असलेला दिसला.**

**'हा चोर एकतर आपल्याला मारील, किंवा पळवून नेऊन चोऱ्या करायला लावील,' असं वाटल्यावरुन तो मुलगा त्या विहिरात पाहून मुद्दाम हमसाहमशी रडू लागला.**

**त्या रडणाऱ्या मुलाजवळ येऊन त्या चोरानं विचारलं, 'काय रे? तुला रडायला काय झालं?' तो मुलगा आपल्या रडण्यात खंड पडू न देता त्याला खोटच म्हणाला, 'मी या विहिरीत किती पाणि आहे हे पाहण्यासाठी वाकून पाहू लागलो असता, माझ्या गळ्यातली सोन्याची कंठी या विहिरीत पडली. आता कंठीशिवाय जर मी घरी गेलो तर आई-बाबा मला बेदम चोप देतील.' तुझी कंठी तुला काढून देतो, असं त्या मुलाला खोटचं सांगून, आणि चोरीचे पैसे व दागिने यांनी भरलेलं आपलं बोचक त्याला विहिरीबाहेर उभे राहून सांभाळायला सांगून आपण विहिरीत उडी मारावी व कंठी हाती लागताच, आपले बोचके व याची कंठी घेऊन आपण पसार व्हावं, असा बेत त्या चोरानं मनाशी केला. त्याप्रमाणे तो त्या मुलाला म्हणाला, 'बाळा ! तू हे माझं बोचक सांभाळ; मी तुला तुझी कंठी तुला विहिरीतून काढून देतो.' त्या हुशार मुलाला चोराच्या मनातलं कळून आलं, तरीही त्याने मुद्दाम त्या चोराला होकार दिला. त्याबरोबर त्या चोरानं विहिरीत उडी मारुन, विहिरीच्या तळाशी त्या कंठीचा शोध सुरु केला.**

**ही संधी साधून तो मुलगा त्या बोचक्यासह तिथून पसार झाला. गावात जाताच त्या मुलाने ते बोचके पोलीसांकडे नेऊन दिले. पोलीसांनी घोड्यावर स्वार होऊन त्या चोराचा पाठलाग केला व त्याला पकडले. नंतर त्या मुलाच्या प्रामाणिकपणाबद्दल व चातुर्याबद्दल त्यांनी त्याला बक्षिस दिले.**

# निरुपण


आधुनिक केसरी

**आमुची वेली कां खुंटिली ।हा हा देवा वृत्ती बुडाली ।**
**कुळस्वामीण कां क्षोभली ।विझाला कुळदीप ॥४०॥**
**आतां लेंकुराचें मुख देखेन ।तरी आनंदें राडी चालेन ।**
**आणी गळही टोंचीन ।कुळस्वामिणीपासीं ॥४१॥**
**आई भुता करीन तुझा ।नांव ठेवीन केरपुंजा ।**
**वेसणी घालीन, माझा- ।मनोरथ पुरवी ।४२॥**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**सद्‌गुरु सन्तन सेइये, फिर पीछे सत्संग ।**
**बोध भेद उपदेश है, साधन अगम असंग**
**।।७६।। (स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/७६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**प्रथम सद्‌गुरु आणि संतांची सेवा करावी. नंतर सत्संगाद्वारे समस्त तत्त्वांचा बोध प्राप्त करावा. तत्पश्चात सद्‌गुरूंच्या भेद-उपदेश साधनेद्वारे प्रकृतीपार असंग चेतन-मार्गाने अंतरंग-अनुभवात अग्रेसर व्हावे.**




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

...........................................................................

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# रामदास स्वामी

आधुनिक केसरी




कल्याण स्वामी डोमगाव येथे होते. अंतिम दिनी समर्थ पद्मासन घालून उत्तराभिमुख बसले. तीन वेळा 'जय जय रघुवीर समर्थ ' हा घोष करून आत्मा पंचत्वात विलीन केला. त्यांच्या पार्थिवाचे अंत्यसंस्कार उद्धव स्वामी यांनी केले. समर्थांनी पूर्वसूचना देऊन माघ वद्य नवमी शके सोळाशे तीन सन १६८१ रोजी देह ठेवला. हीच दासनवमी होय. समर्थसंप्रदाय हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा संप्रदाय आहे.[११] समर्थ रामदास स्वामी यांनी तो शिवाजी महाराजांच्या काळात स्थापन केला. संत रामदास स्वामींप्रमाणेच या संप्रदायाच्या कवींनी व कवयित्रींनी विपुल लेखन केले आहे. या संप्रदायाची बहुतेक हस्तलिखिते धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात ठेवली आहेत. त्यांचा शोध घेऊन संग्रह करण्यासाठी समर्थ भक्त शंकरराव देव यांनी अपार परिश्रम केले. त्यामुळे हा मौलिक संग्रह आजवर टिकून राहिला. समर्थांना शिष्याकडून कठोर साधनेची आणि अभ्यासाची अपेक्षा होती. समर्थांनी त्या काळी ११०० मठ स्थापन केले आणि सुमारे १४०० तरुण मुलांना समर्थ संप्रदायाची दीक्षा दिली. त्यांचे काही शिष्य गृहस्थाश्रमी होते, तर काही शिष्य ब्रम्हचारी होते. कल्याणस्वामी रामदासांचे पट्टशिष्य होते. ज्या वेळी एखाद्या शिष्याची महंतपदी नियुक्ती होत असे त्या वेळी त्या शिष्याची कसून परीक्षा घेतली जाई. समर्थांना शिष्याकडून कठोर साधनेची आणि अभ्यासाची अपेक्षा असे. दासबोधाचे नुसते पारायण करून भागत नव्हते, दासबोध समजावून घेण्यावर समर्थांचा भर होता. अनेक महंतांचा दासबोध कंठस्थ होता. शिष्याची परीक्षा घेण्याची समर्थांची पद्धत मोठी विलक्षण होती. त्यावेळी ग्रंथ छापले जात नसत. हाताने लिहून ग्रंथांचा नकला केल्या जात. छापील नसल्यामुळे ग्रंथ बांधलेले ( बाइंडिंग केलेले) नसत. पानांवर पृष्ठांक देखील नसायचे. अशा वेळी समर्थ त्या शिष्याकडून त्याने लिहिलेली दासबोधाची पोथी मागवून घेत. पत्त्याप्रमाणे पिसून पोथीची सर्व पाने विस्कळीत करत आणि मग शिष्याला सगळा दासबोध पुन्हा व्यवस्थित लावून ठेवायला सांगत. ज्या शिष्यांचा दासबोध कंठस्थ नसे त्यांना पोथी जुळवायला फार वेळ लागे. अशा शिष्याला महंत म्हणून किंवा मठपती पदी नियुक्त केले जात नसे. ज्याला पोथी लावायला विलंब झाला त्यांची निर्भत्सना करताना समर्थ म्हणत," याने दासबोध वाचला नाही केवळ गंधफुले वाहून पूजला."त्या वेळी समर्थांचे शिष्यांना सांगणे होते की, जो कोणी दासबोध ग्रंथाचे वाचन करील, तो ग्रंथ नीट समजावून घेईल आणि त्यानुसार आचरण करेल, अशा माणसाला मोक्ष मिळेल.

# ज्या घरात शांति । त्या घरात भगवंताची वस्ती ॥

आधुनिक केसरी

गृहस्थाश्रमासारखा आश्रम ।दुसरा नाही खास ॥ नीतिधर्माचे रक्षण ।यासाठीच विवाहाचे कारण ॥ ज्या घरात राहते शांति ।त्या घरात भगवंताची वस्ती ॥ कृतीवर मनुष्याची परीक्षा ।जैसी वासावर पदार्थाची परीक्षा ॥ कोणाचा न करावा घात ।ऐसे वागावे जगात ।आपले आपण करून घ्यावे हित ।त्यालाच म्हणतात संभावित ॥ न कधी व्हावे आपण निराश ।व्यवहार हात देईल खास ॥ व्यवहारातील करावा प्रयत्न । प्रपंचात न पडू द्यावे न्यून ।रोगाची भीति ।न ठेवावी चित्ती ॥ रोगाला उपचार करावे जरी बहुत ।तरी कष्टी न होऊ द्यावे चित्त ॥

आप्त इष्ट सखे सज्जन ।यांचे राखावे समाधान ।परि न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने ।चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आपलेपणा ठेवला जेथे ।प्रेम लागत असे तेथे ॥ ज्या घरात स्वार्थाचे मान बळावले ।तेथे समाधानाचे मान कमी झाले ॥ मन राखता आले ।तरच प्रत्येकाला सुख लागले ॥ सुखाने नांदावे नवरा-बायकोंनी ।राम आणावा ध्यानी ॥ दोघांनी रहावे प्रेमाने ।सदा



वागावे आनंदाने ॥ एकमेकांनी दुसऱ्यास दुःख होईल असे न करावे ।काळजी वाटेल असे न वागावे ॥ घरातील माणूस मार्गाने चुकले ।त्यास प्रायश्चित्त हवे खरे ।पण ते नसावे जन्माचे ।तेवढ्यापुरते असावे साचे ॥ एखाद्याचे हातून करू नये असे कर्म झाले ।तरी त्याला सुधारण्याच्या मार्गाने सर्वांनी वागावे ॥ आचरण शुद्ध असावे ।एकपत्नीव्रत सांभाळावे ।प्राण गेला तरी परद्वार करू नये ॥ कोणतेही व्यसन करू नये ।नीच संगत धरू नये ॥ भलते काम करू नये ॥ गृहछिद्र कोणा सांगू नये ।आपला बोज आपण घालवू नये ।विश्वासघात कोणाचा करू नये ॥ परदुःखे हसू नये ।देहदुःखे त्रासू नये ।केला उपकार बोलूं नये ॥ मुलाबाळांस सांभाळून राहावे ।प्रपंचात कधी उदास न व्हावे । प्रेमाने वागावे सर्वांशी ।सुख राहे निःस्वार्थापाशी ॥ आईवडिलांची आज्ञा पाळावी ।चांगल्याची संगत धरावी ।अभ्यासांत लक्ष ठेवून राहावे ।भगवंताचे नामस्मरण करावे ॥ नामापरते न माना दुजे साधन ।जैसे पतिव्रतेस पति प्रमाण ॥ नामापरते न मानावे सत्य ।ज्याने राम होईल अंकित ॥ हेच साधुसंतांचे बोल ।कोणीही न मानावे फोल ॥

**९०. कोणतेही काम करीत असता राखावी मनाची शांति ॥**

रविवार, १७ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 17 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-126 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-05



जेजुरी भारतीय लोकदैवत साक्षात भगवान श्रीकृष्ण, श्रीराम यांचेही भक्तीस्थान असलेल्या कृतयुगीन कुलस्वामी खंडोबाचा चंपाषष्ठी उत्सव देवदिवाळी मोठ्या उत्साहात पार पडत आहे. यंदा आयोध्या येथील प्रभु श्रीरामाच्या मंदिराच्या प्रतिकृतीचा देखावा साकारण्यात आला आहे. यामध्ये श्रीराम मंदिराची प्रतिकृती, प्रभु श्रीराम, माता सीता, लक्ष्मण तसेच रामभक्त हनुमान यांच्या मुर्ती, फळे, फराळ, मिठाई यांची आरास करण्यात आली आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# तुमची दलाली ठेचून टाकू

## उद्धव ठाकरे : अदानी उद्योग समूहाच्या कार्यालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी सत्ताधारी भाजप सरकारवर आणि द्योगपती गौतम अदानी यांच्यावर सडकून टीका केली. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे आक्रमक झाले. त्यांनी धारावी ते बीकेसी येथील अदानी उद्योग समूहाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. त्यानंतर त्यांनी धारावीकर आणि कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. 'तुम्ही अदानींचा बूट कशासाठी चाटता?', असा खोचक सवाल उद्धव ठाकरेंनी यावेळी सत्ताधाऱ्यांना केला. ज्याने ज्याने अदानींची सुपारी घेतली आहे त्या सुपारीबाजांना सांगू इच्छितो हा अडकित्ता लक्षात घ्या. किती मोठा अडकित्ता आहे. खलबत्ता आहे, अडकित्ता आहे, तुमची दलाली अशी ठेचून टाकू की, दलालीचं नाव घेणार नाही, असा घणाघात उद्धव ठाकरेंनी केला.**



गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकल्प चर्चेत आहे. अनेक नेते इथे आहेत. अनेक जण या प्रश्नासाठी आवाज उठवत आहे. मी त्यांना वचन दिले होते की, फक्त मुंबईच काय, संपूर्ण महाराष्ट्र आज धारावीत उतरवेल. त्याप्रमाणे फक्त मुंबईतली आपले कार्यकर्ते आज रस्त्यावर आलो आहेत. याचे वर्णन करण्याची गरज नाही. मी माध्यमांना विनंती करतो की, त्यांनी हे दृश्य अदानी आणि त्यांच्या बापजाद्यांना दाखवा, असे उद्धव ठाकरे म्हणाले. आता तुम्ही 50 खोके एकदम ओके अशी घोषणा दिली. आपली ही घोषणा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेली. पण आथा यांना 50 खोके कमी पडायला लागले म्हणून धारावी आणि मुंबई गिळायला निघाले आहेत ते बोके. यांची मस्ती वाढत चालली आहे. एकतर हे असंविधानिक सरकार आहे. यांना असे वाटते की, आपल्याला कुणी जाब विचारु शकत नाही. वर्षा ताई तुम्ही म्हणालात की, तुम्ही अदानींना प्रश्न विचारता तर भाजप उत्तर देता. तरी नशिब तुमचे अजून महुआ मोहित्रा नाही केलं. कारण त्यांनी त्यांना प्रश्न विचारले म्हणून थेट निलंबित करुन टाकले. नशिब तुम्ही आता सभागृहात जात आहात, असा चिमटा उद्धव ठाकरेंनी यावेळी काढला.

# मौजे लिहा जहागीर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लिहा जहागीर येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही श्री दत्त जयंती निमित्त गावकऱ्यांनी एकत्र येऊन अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. सर्व जातीधर्मांचे लोक एकत्र येऊन दरवर्षी हा सप्ताह आयोजित करतात हे विशेष ! सप्ताहाचे हे सातवे वर्ष असुन ह.भ.प. कैलास महाराज पवार बाबरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह पार पडणार आहे. यानिमित्त महाराष्ट्रातील मान्यवर किर्तनकारांची किर्तनसेवा होणार आहे तरी परिसरातील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती दत्त मंदिर संस्थान चे अध्यक्ष श्री समाधान पाटील नवले, उपाध्यक्ष श्री अर्जुन दांगोडे, ज्ञानेश्वर निकम, देविदास



म्हस्के, गणेश नलावडे, देविदास बनकर, सुधाकर पवार, भागिनाथ चव्हाण, अरुण निकम, रावसाहेब म्हस्के, संभाजी सावळे, उत्तम म्हस्के, कैलास म्हस्के, मारोती म्हस्के, योगेश म्हस्के, विष्णु मनगटे, राजु दिक्षित आदींनी केले आहे.

जगातील 10 लाख वाचकांपर्यंत ऑनलाइन जाणारे दैनिक
आधुनिक केसरी
नववर्षानिमित्त घेऊन आले आहे ऑनलाइन काव्यस्पर्धा
कोण होणार महाराष्ट्राचा महाकवी !
दर्जेदार कवींनी जरूर सहभागी व्हावे
YouTube
राज्यस्तरीय युट्यूब काव्यवाचन स्पर्धा
अशा पाठवा कविता
कवींनी सुरुवातीला आपला परिचय व नंतर स्वतःची कविता असा व्हिडिओ (जो की 5 मिनिटांच्या कमी व 10 मिनिटांच्यावर नसेल) 7620838883 या नंबरवर पाठवावी.
कवितेचा व्हिडिओ पाठविण्याची अंतिम तारीख 31 डिसेंबर 2023 असेल.
● अशी होईल निवड ●
जनता जनार्धन करणार महाकवीची निवड, सर्व कवींच्या कविता आधुनिक केसरीच्या युट्यूब चॅनलवर प्रसारित होतील. ज्या कवितेला जास्त लाईक येतील तेच होतील महाकवी!


# सांस्कृतिक वंचितता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**राष्ट्र निर्माणामध्ये सामाजिक समता महत्त्वाची आहे तेवढीच सांस्कृतिक एकता देखील महत्त्वाची आहे. सांस्कृतिक एकता म्हणजे भिन्न भिन्न संस्कृतींनी एकमेकात मिसळणे आणि शेवटी एकच एक संस्कृती शिल्लक राहणे असा त्याचा अर्थ नव्हे. तर आपण ज्या संस्कृतींचे पाईक होत, अशीच इतरांचीही संस्कृती त्यांना प्रिय असते आणि तिचा आदर आपण केला पाहिजे ही मनाची धारणा पक्की होणे होय. फक्त आपली तेवढी संस्कृती श्रेष्ठ आणि इतरेजनांची कनिष्ठ हा भाव म्हणजे सांस्कृतिक वंचितता होय. भारतीय जनमानसात सांस्कृतिक आदरभाव होता आणि आहे सुद्धा, परंतु काही थोड्याफार व्यक्ती किंवा गटांमुळे परस्पर संशयाचे वातावरण निर्माण होत आहे.**



## क्षितिजापल्याड

हे केवळ आजच घडते आहे असे नव्हे. प्रत्येक काळात अशा काही प्रवृत्ती असतातच. सर्व समाजाने त्यांना बाजूला सारून हा संस्कृतीचा प्रवाह गतिमान ठेवला आहे. खाणे, पिणे, उठणे, बसणे, लेवणे, पूजा, प्रार्थना, व्रत वैकल्ये, जन्मविधी, अंत्यविधी आणि अनेक प्रकारचे संस्कार यात भिन्नता असू शकते. कधी ती प्रदेशामुळे असेल तर कधी भाषा कारणीभूत असेल, पण या सर्व प्रकारात माणसाचे असणे महत्त्वाचे मानले आहे. या माणूस शब्दातूनच माणुसकी हा शब्द पुढे आला. माणुसकी जपणे म्हणजे मला जो अधिकार निसर्गदत्त प्राप्त झाला आहे असे आपण समजतो, अगदी तसाच अधिकार इतरांनाही आहे ही समज वाढणे आणि त्यानुसार वर्तन करणे म्हणजे सांस्कृतिकदृष्ट्या परिपक्व होणे होय. संस्कृती निर्माणामध्ये दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. भौतिक प्रगती आणि अध्यात्मिक सुधारणा. ज्या संस्कृतीने केवळ अध्यात्मिक प्रेरणा महत्त्वाची मानली आणि भौतिकतेकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले त्या संस्कृतीतून बहरणारी सभ्यता विषमतामूलक, ऐहिकतेत हिंसेचे समर्थन करणारी आणि सामाजिकदृष्ट्या मागास राहिली हे आपणांस जगातील विविध संस्कृतींचा अभ्यास केल्यानंतर लगेच लक्षात येईल. या प्रकारच्या संस्कृतीत सर्वांना सामावून घेण्याची पराकोटीची क्षमता असली तरी हे सामावणे फक्त अध्यात्मिक बाबतीतच होते हे आवर्जून लक्षात घ्यावे लागेल. म्हणजे देवाच्या दारी सर्व समान आहेत असे म्हणत असताना समाजातील उच्च-नीचपणाबद्दल अवाक्षर काढायचे नाही हे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल. बहुसांस्कृतिक असणे आणि सभ्यतेकडे दुर्लक्ष करणे ओघाने आलेच. सामाजिक विषमतेची कारणे त्यामुळेच मग शास्त्रात शोधली जाऊ लागली. ईश्वरप्रणित उच्चनिचता विविध कथांच्या माध्यमातून सांगणे आणि ते पटवून देणे यातून मग विविध पुराणांची निर्मिती झाली. अध्यात्माच्या अतिरेकामुळे आपल्यावर राज्य कोण करत आहे आणि आपली अवस्था अशी का आहे याकडे याच कारणामुळे दुर्लक्ष झाले. भारताचेच उदाहरण घ्यायचे तर या बाबतीत घेता येईल. इथे अनेक प्रकारच्या राजांनी राज्य केले परंतु सामान्य माणसाच्या जगण्यात काही फरक पडला नाही. संपूर्ण समाजाची संस्कृती वेगळी आणि एकट्या राजाची संस्कृती भिन्न असेही झाले. आज आपण लोकशाहीमध्ये राहतो आणि आपले प्रतिनिधी निवडून देतो. हे प्रतिनिधी आपलेच प्रतिबिंब असतात. म्हणजेच आपण जी संस्कृती मानतो ती आपल्या प्रतिनिधीने मानावी अशी आपली धारणा असते. जेव्हा जनतेचे प्रतिबिंब संसदेत दिसून येत नाही त्यावेळेस पुन्हा समाज त्यांना निवडून देत नाही ही आजची परिस्थिती आहे, परंतु ज्या काळात राजेशाही अस्तित्वात होती तेव्हा आपल्या धारणा आणि राजाची वैशिष्ट्ये यात कोणताच समान धागा नव्हता. याचे महत्त्वाचे कारण ऐहिकतेकडे पूर्ण दुर्लक्ष हे होय. आपल्यावर आपल्या विरोधी विचारांचा राजा राज्य करत आहे याचीही पर्वा कोणास नव्हती. कारण आध्यत्मिक संस्कृतीचे वहन करताना ऐहिकतेकडे झालेले पराकोटीचे दुर्लक्ष हे होय. म्हणून संपूर्ण भारतात शिवाजी महाराजांचे वेगळेपण काय असेल तर संस्कृतीचे अध्यात्माकडे झुकलेपण भौतिकतेकडे आणणे आणि अध्यात्म आणि भौतिकता यांची सांधेजोड करणे होय. संस्कृती विकासातील दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे भौतिक विकास होय. भारतीय संस्कृती ही अध्यात्मकेंद्री आहे हे आपण पाहिले. तर भौतिकतेला प्राधान्य देणाऱ्या संस्कृतींचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे एकारलेपण हे होय. ही संस्कृती दुसऱ्या कोणत्याच संस्कृतीत मिसळू शकत नाही किंबहुना दुसऱ्याचे सहअस्तित्व देखील या संस्कृतीस मान्य नसते. आपण एकमेवाद्वितीय आहोत ही तिची धारणा तिला अधिकाधिक संकुचित बनवण्यास कारणीभूत ठरते. अध्यात्मिक संस्कृतीत भौतिक हिंसेकडे दुर्लक्ष केले जाते तर इथे अध्यात्मिक हिंसेचे समर्थन मोठ्या प्रमाणात दिसून येते. भौतिकदृष्ट्या समतामुलक संदेश यातून दृगोचर होत असला तरी जगात आम्हीच श्रेष्ठ असल्याचा दंभ ही संस्कृती भरत असते. धर्मसत्ता आणि राजसत्ता या दोन्ही भिन्न नसून धार्मिकतेसाठी राजसत्तेचा वापर सर्रास होत असतो. इथे व्यक्तीचे व्यक्तीपण नाकारून तो सामाजिकतेचा फक्त एक एकक असल्याचे व्यक्तिमनावर बिंबवण्यात येत असल्यामुळे समाजासाठी, धर्मासाठी, संस्कृतीसाठी आणि आपल्या सभ्यता विकसनासाठी या संस्कृती पूजकांची काहीही करण्याची तयारी असते. हे सांस्कृतिक संचित कोणत्याच प्रकारची ढवळाढवळ न करता, त्यात काळानुरूप बदल न करता पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करणे एवढीच या संस्कृती पूजकांच्या जीवनाची इतिकर्तव्यता असते. म्हणूनच त्या तत्त्वज्ञानात विचारांची उंची आणि सौंदर्य, तात्त्विक निरूपण आणि त्याचा दरवळ, भौतिक समृद्धी आणि त्याची विशालता फार कमी प्रमाणात दिसून येते. सांस्कृतिक कट्टरता आणि अध्यात्माच्या क्षेत्रातील हिंसेला मिळालेली परवानगी यामुळे इतर समाजापासून फटकून वागण्याचे भागध्येय सांभाळीत ही संस्कृती वाटचाल करते. या दोन्ही प्रकारच्या संस्कृती सांस्कृतिकदृष्ट्या वंचितच म्हणाव्या लागतील. कारण आपण प्राधान्यक्रम कशाला देतो आहोत यावर ही वाटचाल अवलंबून असते. आधुनिक काळात कोणत्याही एका सांस्कृतिक वैशिष्ट्याला आपणांस समोर आणता येणार नाही. लोकशाही मूल्यांना संवर्धित करायचे असल्यास आपल्या धारणा काय आहेत, हा भाग गौण आहे. अत्यंत समतामूलक, परस्पर आदरशील आणि भारतीयत्त्व जोपासणारी संस्कृती विकसित करावी लागेल, तेव्हा कोठे आपण सांस्कृतिकदृष्ट्या वंचित राहणार नाहीत. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



# महाराष्ट्रातील सर्कस सम्राट: बंडोपंत देवल !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या मातीतसुद्धा एक असा विदुषक होऊन गेला, जो सर्कशीत लोकांचे मनोरंजन करायचा. हा विदुषक कोणत्याही सिनेमातला नाही, तर खऱ्या आयुष्यातला होता. या विदुषकाची कीर्ती केवळ महाराष्ट्रभरच नाही तर संपूर्ण जगभर पसरली होती. या विदूषकाचे नाव बंडोपंत देवल उर्फ सर्कस सम्राट काशिनाथ सखाराम असे होते. भारत देश जेव्हा ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा युरोप देशातल्या अनेक सर्कस कंपन्या भारतात येऊन खेळ सादर करत. जसे दादासाहेब फाळके यांनी ब्रिटीश सिनेमे पाहून सिनेमा बनवण्याचा ध्यास घेतला. तसेच पाश्चात्य देशांची सर्कस कला बघून भारतीयांची सुध्दा एक सर्कस असावी, असा विचार एका मराठी माणसाने केला. त्यांचे नाव विष्णुपंत छत्रे होते. त्यांनी सन १८७८ साली सांगली येथे अस्सल भारतीय पद्धतीची छत्रे सर्कस निर्माण केली.**

विष्णुपंत स्वतः उत्कृष्ट घोडेस्वार होते. त्यामुळे तेथे ते घोड्यांच्या सहाय्याने खेळ करणे, निरनिराळे स्टंट करणे, अशा अनेक गोष्टी अगदी कुशलतेने करायचे. सन १८८४ साली त्यांनी अनेक युरोपीय सर्कसपटू आपल्या सर्कशीत घेतले. यानंतर त्यांनी ग्रँड इंडीयन सर्कस असे नाव सर्कशीला दिले आणि ही सर्कस घेऊन त्यांनी भारतभर तसेच परदेशात दौरे काढले. त्याकाळी विष्णुपंत छत्रे हा मराठी माणूस सर्कशीच्या माध्यमातून ब्रिटिशांना न जुमानता सर्वत्र प्रयोग करत होता. त्यांची सर्कस मोठी होत गेली. परंतु त्यांच्या सर्कशीमध्ये काम करणाऱ्या माणसांनी स्वतःची एक वेगळी सर्कस काढली. छत्रे सर्कशीत नाव मिळवलेले मिरज म्हैशाळचे बाबासाहेब देवल यांनी आपल्या भावांसोबत सन १८९५ साली स्वतःची नवी सर्कस काढली. मिरजेच्या जोकरमुळे भारतातली सर्कस परदेशी भूमीवर धुमाकूळ घालू लागली. विदूषक किंवा जोकरचे खूप आकर्षण जनमनात होते. हॉलिवूडचा दि डार्क नाईट मधला जोकर तर अजूनही मनातून कधीकधी डोकावतो. जेव्हा लक्ष्याचा एक होता विदुषक पाहण्यात आला, तेव्हा विदुषकाच्या मुखावट्यामागे हसऱ्या चेहऱ्या पलिकडे एक वेगळे आणि काहीसे वेगळे जीवन दडलेले आहे, याची जाणीव झाली. अलीकडेच जोकर हा सिनेमा रिलीज झाला, तेव्हा परिस्थितीने दिलेल्या अफाट दुःखातून माणसाचा जोकर कसा होतो, हे अनुभवायला मिळाले.

सर्कशीचा इतिहास तसा फार जुना आहे. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत सर्कस सर्वप्रथम सुरू झाली, असे मानतात. त्याकाळी सर्कशीचे प्रमुख आकर्षण म्हणजे घोड्यांवर बसून होणारे अनेक प्रकारचे खेळ आणि प्राण्यांचे सामने हे होय. त्यामुळे सर्कस पाहणे ही उपस्थित लोकांसाठी एक पर्वणीच असायची. हळूहळू सर्कशीचे स्वरूप बदलत गेले तरीही सर्कसमध्ये या प्रमुख गोष्टी हमखास असायच्या. पारंपरिक सर्कशीची परंपरा थोडी लोप पावून आधुनिक काळानुसार सर्कस बदलली. फिलिप ॲस्टली या परदेशी घोडेस्वाराने इ.स.१७४२ साली आधुनिक सर्कशीला सुरुवात केली. अशाप्रकारे सर्कस फोफावत गेली आणि सर्कस कलेचा जगभरात विस्तार होत गेला.

मोठ्या मनाच्या विष्णुपंतांनी बाबासाहेबांना सांगितले की नवीन सर्कस काढतोयस तर आपल्या सर्कसचा जुना तंबू घेऊन जा. अशा तऱ्हेने छत्रे सर्कसचा जुना तंबू घेऊन नवीन देवल सर्कसची सुरुवात झाली. सर्कसच्या सुरुवातीला बाबसाहेबांबरोबर होते धाकटे तिन्ही बंधू आणि



म्हैसाळमधील सवंगडी. खरंतर बाबासाहेब सोडले तर इतर सर्व लोकांना सर्कस मधील कोणतीच कला अवगत नव्हती. पण अवघ्या काही दिवसांतच या लोकांमधूनच विविध खेळ दाखवणाऱ्या कलाकारांचा संच बाबासाहेबांनी तयार करून दाखवला. देवल सर्कस या नावाने ही सर्कस त्यावेळी सर्वत्र प्रसिद्ध झाली. पुढे ग्रेट इंडियन सर्कस म्हणून या सर्कसची जगभरात ख्याती झाली. भव्य दिव्य तामझाम, चित्तथरारक खेळ, सफाईदार कसरती, अशी या सर्कशीची वैशिष्ट्य होती. या सर्कशीचे प्रमुख आकर्षण म्हणजे काशिनाथ सखाराम उर्फ बंडोपंत देवल होते. असे म्हणू शकतो, की बंडोपंत देवल एकट्याच्या जोरावर देवल सर्कस रंजक करायचे. याला कारण असे की त्यांनी रंगवलेला विदुषक होय. बंडोपंत असा फर्मास विदुषक उभा करायचे, की त्यांचा विदुषक पाहायला देवल सर्कसमध्ये गर्दी व्हायची. वयाच्या ११व्या वर्षापासून बंडोपंत सर्कशीत काम करत होते. त्यांचे काका बाबासाहेब देवल यांच्यापासून त्यांना या कलेतल्या अनेक छोट्या छोट्या गोष्टी कळून आल्या होत्या. बंडोपंतांनी सिंगापूर, अफगाणिस्तान, मद्रास, मैसूर येथे धूम माजवली होती. ज्याकाळात भारतातल्या इतर सर्कसी बैलगाडीतून प्रवास करायच्या त्याकाळी देवल सर्कस परदेशी भूमीवर धुमाकूळ घालत होती. बंडोपंत देवल यांच्या विदूषकाचे नाव सर्वदूर पसरले होते. एकदा मिरजेला स्वातंत्र्यवीर सावरकर खास बंडोपंतांना भेटण्यासाठी आले होते. तो काळ मराठी संगीत नाटके आणि सर्कशींसाठी एक सुवर्णकाळ होता. मराठी संगीत नाटकांच्या जशा अनेक कंपन्या होत्या. तसेच सर्कस कलेमध्ये सुद्धा अनेक कंपन्या असून त्या लोकांचे मनोरंजन करत असत. दुसऱ्या महायुद्धाची मोठी झळ सर्कस कंपन्यांना बसली. यामध्ये देवल सर्कसलासुद्धा उतरती कळा लागली. पुढे महात्मा गांधींच्या हत्येनंतर जाळपोळ आणि सगळीकडे लुटालूट सुरू झाली. याचा परिणाम देवल सर्कसवर सुद्धा झाला. काही अज्ञात माणसांनी देवल सर्कसची मोठ्या प्रमाणात लूट केली. या सगळ्यांमध्ये लोकांच्या मनात सिनेमा पाहण्यासाठी वेड वाढू लागले. यामुळे सर्कस आणि संगीत नाटक कंपनी अक्षरशः डबघाईला आल्या. बंडोपंत देवल यांनी रंगवलेला विदुषक पाहायला जी गर्दी आधी व्हायची, ती गर्दी ओसरली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देव्हारी ग्रामपंचायत सीईओ विकास मीना यांच्या हस्ते स्मार्ट ग्राम पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी हे गाव अति दुर्गम डोंगराळ भागात असून बंजारा समाज 90%लोकवस्तीचे देव्हारी गाव तरीदेखील ग्रामपंचायतीला सन २०१८-१९ ह्या आर्थिक वर्षात सुंदर माझे गाव पुरस्कार योजनेत तालुका स्तरीय प्रथम बक्षीस पटकाविन्याचा मान बहुमान मिळविला देव्हारी ग्रामपंचायतिला दि.३०/११/२०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील बाबासाहेब विद्यापीठातील सभागृहात संपन्न पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.ग्रामपंचायतीला या स्थानावर नेण्याकरिता देव्हारी ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच व आत्ताच्या उपसरपंच मिराबाई उत्तम चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण तत्कालीन कार्यकारिणी ग्रामसेवक सुरेश काळे यांनी खूप परिश्रम घेतले व त्यांचे सातत्य ठेवण्याचं काम सरपंच शामिरखा तडवी व विद्यमान ग्रामपंचायत कार्यकारिणी करीत आहे गावात सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, उत्तरदायित्व, अपारंपरिक ऊर्जा साधनांचा उपयोग,ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. यात झालेल्या तपासणीत गुणांकानुसार सोयगाव तालुक्यात देव्हारी ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावल छत्रपती संभाजीनगर येथे मा मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना सर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सरपंच सामीरखा तडवी, उपसरपंच मिराबाई उत्तम चव्हाण व ग्रामसेवक सुरेश काळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ट्राफि,प्रमाणपत्र व १० लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी,उपमुख्य कार्यकारी अधिकारी( पंचायत )ओ आर रामावत ,भाजपा जिल्हा सरचिटणीस उत्तम चव्हाण ,गटविकास अधिकारी दादाराव आहिरे सोयगाव आदींसह अन्य कार्यालयाचे पदाधिकारी, अधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.या उल्लेखनीय केलेल्या कार्यामुळे देव्हारी गावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# जिथे सर्व शक्यता संपतात तिथे मोदी गॅरंटी सुरू होते : नरेंद्र मोदी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिथे सर्व शक्यता संपतात तिथे मोदी गॅरंटी सुरू होते आणि लोकांना विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून स्वतःच्या सक्षमीकरणाची जाणीव होत आहे असे प्रतिपादन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील खेमजेई या गावी आपले मत व्यक्त केले. मोदीची गॅरंटी ही गाडी आता गाव खेड्यामध्ये पोहोचते आहे. या गाडीच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकपणापर्यंत पोहोचत आहेत आणि गाव खेड्यातील नागरिकांमध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण तयार होताना दिसत आहे असे मत नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. PM स्वनिधी योजना यांच्या माध्यमातून स्वस्त व सुलभ लोन लोकांना मिळत आहे. सव्वा लाख लोकांनी पीएम स्वनिधी योजनेतील योजनेसाठी अर्ज केला आहे .यात 45 टक्के महिला आहेत सामाजिक सुरक्षेसाठी सुद्धा सरकार कटिबद्ध आहे .साठ वर्षापेक्षा जास्त प्रत्येकाला सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ मिळावा यासाठी अटल पेन्शन योजना प्रधानमंत्री विमा सुरक्षा योजना तद्वतच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून हजारो करोड रुपयांची राशी सर्वसामान्य नागरिकांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे. सरकारच्या पेन्शन व विमा योजनेच्या माध्यमातून आपल्या सुरक्षा कवच नागरिकांनी मजबूत करावे असे आवाहन नरेंद्र मोदी यांनी केले या कार्यक्रमाला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हर्दिपसिंह पुरी माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर ,महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार ,जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह, परदेशी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आदींची उपस्थिती होती.

# शरद पवार यांचे नाव देशाच्या राजकारणात कायम कोरले जाईल : प्रा. प्रवीण दवणे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त लोणंद (ता.खंडाळा) येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज मुलींचे येथे रयत संकुल यांच्या वतीने अभिष्टचिंतन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यकार व गीतकार प्रा.प्रवीण दवणे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.शरद पवार यांचे नांव देशाच्या राजकारणात कायम कोरले जाईल असे प्रा.प्रवीण दवणे यांनी म्हटले. यावेळी अध्यक्षस्थानी महात्मा फुले आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज पनवेलचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर होते.प्रा.प्रवीण दवणे म्हणाले की,कर्मवीर अण्णांनी बहुजनांच्या मुलांसाठी शाळा घरापर्यंत पोहोचवली.कर्मवीर अण्णांनी रयतेचे रोपटे लावून त्याचा वटवृक्ष केला.परंतु पवार साहेबांनी त्या वटवृक्षाला आधुनिक शिक्षणाची जोड दिली. पवार साहेब एवढे मोठे आहेत की त्यांचा वाढदिवस आज जगभरातील त्यांच्या वर नितांत प्रेम करणारी माणसे साजरा करत आहेत. विद्यार्थ्यांनी पवार साहेबांच्या कष्टाचे संस्कार आपणामध्ये रुजविले पाहिजेत. शरदचंद्रजी पवार यांचे नावे देशाच्या राजकारणात कायम कोरले जाईल. देशाच्या राजकारणात बुद्धी चातुर्य व निर्णय क्षमतेच्या जोरावरती वेगळा ठसा उमटवणारे कर्तुत्ववान नेतृत्वशरदचंद्र पवार आहेत.असे सुद्धा त्यांनी म्हटले. प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर म्हणाले की, विद्यार्थिनींनी पवार साहेबांच्या जीवनकार्याचा चरित्राचा आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आदर्श घेणे गरजेचे आहे. कीतीही संकट आली तरी त्यातून पार करून जाण्याची ताकद त्यांच्याकडून घेतली पाहिजे.एवढा मोठा आजार असतानाही आपण कार्यकर्त्यांसाठी आणि देशासाठी कार्य केलेच पाहिजे अशा विचाराचे साहेब आहेत. साहेब कर्तुत्वाचा आणि कीर्तीचा महासागर आहेत.त्यांना सर्व क्षेत्रातलं ज्ञान असल्यामुळे आजही त्यांच्याकडे सर्वजण मार्गदर्शन घ्यायला येतात.रयत शिक्षण संस्थेला रोल मॉडेल करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. अॅड.सुरेंद्र बोडरे व्यक्त करताना म्हणाले, लोणंद मधील रयत संकुल नावारूपाला आणण्यामध्ये पवार साहेबांचे मोलाचे योगदान आहे.यशवंतराव चव्हाण यांचे पूर्ण विचार महाराष्ट्रा मध्ये पुढे नेहण्याचे काम शरद पवार साहेबांनी केले.या कार्यक्रमप्रसंगी मिलिंद माने,हणमंतराव शेळके,सागर शेळके,तृप्ती घाडगे,दिपाली शेळके,

राजेश भाटिया,सुचेता हांडेबर,शुभांगी माने,प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्राचार्य चंद्रकांत जाधव,प्राचार्या सुनंदा नेवसे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथींचा परिचय प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी करून दिला.मान्यवरांचे स्वागत प्राचार्या सुनंदा नेवसे यांनी केले. या कार्यक्रमाला लोणंद परिसरातील रयत प्रेमी,हितचिंतक, मान्यवर, शिक्षक शिक्षकेतर सेवक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम. डी.नायकू यांनी केले.मान्यवरांचे आभार प्राचार्या सुनंदा नेवसे यांनी मानले.





# धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ निवडणूक जल्लोषात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा मराठी पत्रकार संघ निवडणूक बिनविरोध झाली आहे अध्यक्षपदी मनोज गर्दे तर उपाध्यक्ष अतुल पाटील यांची कार्यकारणी सहबिनविरोध निवड झाली आहे ह्या ठिकाणी मोठ्या जल्लोषात आनंद व्यक्त करण्यात आला.
तत्कालीन अध्यक्ष यांनी निवडणूक कार्यकाळ संपल्याने राजीनामा दिल्यानंतर सदर धुळे जि.मराठी पत्रकार संघाचे निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली या अगोदर सर्व सभासदांची नाव नोंदणी त्याच्यानंतर निवडणूक कार्यक्रम या ठिकाणी जाहीर करण्यात आला तर या वेळेस या निवडणुकी कार्यक्रमासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मिलिंद बैसाणे यांनी कामकाज पाहिले होते. तर यासाठी कोर कमिटीचे देखील मार्गदर्शन लाभले तर यावेळेस 2024 ते 2026 या दोन वर्षाच्या कालखंडासाठी सदर ही निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली.यावेळी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ नूतन अध्यक्ष म्हणून अध्यक्षपदी मनोज गर्दे, उपाध्यक्ष शहर अतुल पाटील,ग्रामीण उपाध्यक्ष अरुण धोबी, सरचिटणीस सचिन बागुल,कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ,कार्यकारणी सदस्य मोहन मोरे, कार्यकारणी सदस्य आकाश सोनवणे, कार्यकारणी सदस्य पुरुषोत्तम पाटील, मनोहर सोलंकी, कार्यकारणी सदस्य राजेंद्र भावसार उर्फ राजूभाऊ फेटेवाले, कार्यकारणी सदस्य रवींद्र नगराळे,कार्यकारणी सदस्य राकेश गाळणकर, कार्यकारणी सदस्य संतोष ताडे, कार्यकारणी सदस्य रेषचंद जैन, कार्यकारणी सदस्य दीपक शिंदे, कार्यकारणी सदस्य जमेल शहा,तसेच स्वीकृत अशोक तोटे, पंकज पाटील,वाल्मीक पाटील, आवेश खान, प्रदीप राजपूत, आदींची या ठिकाणी बिनविरोध निवड करण्यात आली असून 2024 ते 2026 या द्विवार्षिक निवडणुकीसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. तर यावेळेस निवडणूक अधिकारी मिलिंद बैसाणे माजी अध्यक्ष चंद्रशेखर पाटील,रवींद्र इंगळे,भैय्या भारेराव,ओम शर्मा, आदि सर्व ज्येष्ठ आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सदर निवडणूक प्रक्रिया पार पडली.



# वडोद बाजार येथे घंटागाडी लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार ग्रुप ग्रामपंचायत कडून कचरा व्यवस्थापन करण्यासाठी घंटा गाडी लोकार्पण करण्यात आली. यावेळी सरपंच पकिजा पठाण , उपसरपंच गोपाळ वाघ, ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे ,ग्रामपचायत सदस्य , शिवराम म्हस्के डॉ सुहास वायकोस, राजिक शेख,शुभम गंगावणे, काकाजी कोलते, , गोविंद पांडेजी, माजी सरपंच शेख रजजाक, आसाराम कोलते, बाबूराव मंदाडे, नासेर पठाण, चेअरमन कडुबा म्हस्के ,मिर्झा बेग, शेख अंजुम, ताजमात शहा, प्रकाश काथार शेख इजास, फकिरा मिस्त्री, बळवंत वाघ, जनार्दन शिनगारे, रामदास कापसे, अशोक शिंनगारे, रमेश वाघ, बाबु शेठ, सोमनाथ कोलते , ग्रामपंचायत कर्मचारी आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते गावातील कचरा व्यवस्थापन करण्यात येणार असून या घंटागाडीच्या माध्यमातून ओला कचरा व सुका कचरा जमा करण्यात येणार आहे.



# अंतर्मनीची तळमळ व्यक्त करणाऱ्या कविता



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**एखादी घटना घडली किंवा प्रसंग घडला की त्याचा थेट परिणाम आपल्या मनावर होतो. मग तो प्रसंग सुखाचा असो वा दुःखाचा. आपण पडलो, धडपडलो की आपल्याला शारीरिक वेदना होतात. शरीरावर झालेले घाव , जखमा डोळ्यांनी दिसतात. पण काही जखमा ह्या दिसत नाहीत पण त्या वेदनेमागची दाहकता जाणवते. कवी अर्जुन बांबेरे गेली २३ वर्षे जव्हार आणि भिवंडीमधील आदिवासी भागात अध्यापनाचे कार्य केले असून सध्या शहापूरमधील ग्रामीण आदिवासी भागात ते मुलांना शिकवत आहेत.**

कवी अर्जुन बांबेरे यांचा 'दंश झालाय काळजाला' हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी संवेदनशील जाणीवेच्या या कवीने आपल्या शब्दसंपदेतून समाजाचा बिघडलेला स्तर, वाढती विषमता, सर्वसामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करून त्यांच्या भावना, मनातील उद्विग्नता या कवितासंग्रहातून व्यक्त केल्या आहेत. फक्त स्वप्नरंजनात न अडकता कवीने माणुसकीचा अभाव, नात्यांमधील हरवलेला प्रेमभाव, सामाजिक भेदभाव, जनतेची होणारी फसवणूक, राजकीय पार्श्वभूमी अशा विषयांची निवड करून खऱ्या अर्थाने नेमकेपणाने आणि सुयोग्य शब्दात सर्वांना जाग आणली आहे. आणि व्यक्त होण्याची उर्मी निर्माण केली आहे. आपल्या अनुभवविश्वातील हे विषय सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचण्यासाठी कवीने कवितेच्या रुपात ह्या भावना शब्दबद्ध केल्या.या संग्रहात मला कवीची तीन रुपं दिसली. एक म्हणजे हाडाचा शिक्षक , दुसरे म्हणजे सामाजिक परिस्थितीची जाण असून आपले मत निर्भिडपणे मांडणारा नागरिका आणि प्रतिभावनेतून व्यक्त होणारा प्रियकर... या कवितांमधून कवीला लाभलेल्या अनुभवविश्वातील अनेक लहान - सहान गोष्टींची ओळख होते. विशेष म्हणजे या कवितांमधून बळीराजाच्या अवस्थेचे वर्णन करून त्यांच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यातील काही कविता अष्टाक्षरी असून काही यमक कवितासुद्धा यात समाविष्ट आहेत. कवी अर्जुन बांबेरे यांच्या कवितामध्ये निसर्गाच्या विविध छटा प्रकर्षाने जाणवतात. रानावनात मोकळेपणाने बालपण जगलेल्या कवीच्या लेखणीत त्याचे विश्व डोकावत राहते. आई आणि बाबा यांच्यासोबतच्या आठवणी आणि व्यक्त होण्याचे जे राहून गेले, ती वेदना आणि आई- बाबांची जाणवणारी कमतरता, बहिणीविषयीचा आदर ह्या सगळ्या भावभावना एकत्रितपणे या कवितासंग्रहात अवतरल्या आहेत.

**'या साऱ्या विश्वातून वेदनेचा होऊ दे अंत**
**मग असेल माझं हृदय क्षितिजासम शांत '**

आपल्या आसपासच्या लोकांकडे पाहताना त्यांचे दुःख, यातना पाहून कवी अस्वस्थ होतो. कवी म्हणतो, सगळ्यांच्या वेदना संपू दे. फक्त स्वतःपुरता विचार न करता हे संपूर्ण विश्व माझे कुटुंब आहे, या विश्वातून वेदनेचा अंत होऊ दे, अशी भावना व्यक्त करणारे कवीचे मन किती सर्वसमावेशक आहे, याची जाणीव 'वेदने तुझा अंत व्हावा' कवितेतून होते.

**'लय झालं भाऊ आता बदलून घे स्वतःला**
**पाचशे हजार मध्ये**
**विकून टाकले मताला'**

'छप्पर चोर' ही कविता डोळ्यात अंजन घालणारी आहे. निवडणुका जवळ आल्या की मतदार हा मतदार राजा होतो. उमेदवाराने दिलेल्या प्रलोभनाच्या आहारी जाऊन चुकीचा उमेदवार निवडला जातो. ही सत्य स्थिती आहे. कवीने यातील वास्तव मांडून एक आवाहन केले आहे, की कोणत्याही उमेदवाराला मत देताना विचारपूर्वक करा. प्रलोभनाच्या आहारी न जाता आपले अमुल्य मत देऊन समाजात बदल घडवा.

**'माझा बाप उभा होता**
**साऱ्या शिवाराचा धनी**
**त्याच्या संगतीला मागे**
**ढग पावसाची गाणी'**

अनेकदा आपण बाबांविषयी लगेच व्यक्त होत नाही. कारण आई नेहमी जवळची वाटते. बापाची शिस्तप्रिय भूमिका पाहिल्याने त्यांच्याविषयीच्या भावना मनात दाटून येतात. 'माझा बाप' कवितेत कवीच्या डोळ्यातील अश्रु , बाबांविषयीची ओढ दिसून देते.

नवसृजन प्रकाशनाने प्रकाशित केलेला ' दंश झालाय काळजाला' हा कवितासंग्रह अंतर्मनीची तळमळ थेटपणे आणि सूचकतेने व्यक्त करणारा आहे. सर्वसामान्यांची वेदना व्यक्त करून त्यांचा आवाज बुलंद करणारा हा कवितासंग्रह नक्की वाचा. या कवितासंग्रहाला कवी, अनुवादक, संपादक, प्रकाशक गीतेश शिंदे यांनी सखोल प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाची पाठराखण ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी केली आहे.तसेच पराग ठाकरे यांनी मुखपृष्ठ साकारले आहे.

**( दंश झालाय काळजाला - कवितासंग्रह / कवी अर्जुन बांबेरे / प्रकाशक : नवसृजन प्रकाशन / मूल्य : २०० रुपये )**




# स्वहित आणि राष्ट्रहित सम असले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**स्वहित आणि राष्ट्र हित सम असलं पाहिजे ज्या पद्धतीने आपण स्वहितासाठी प्रयत्नांशिल असतो. त्याच पद्धतीने राष्ट्र हित साधण्यासाठी आपलं उचीत योगदान असल पाहिजे.जीवनातील काही बाबींना आपण आपलं कर्तव्य समजतो त्याच पद्धतीने आपल्या राष्ट्राच नावलौकिक जागतिक पातळीवर होईल अशा पद्धतीने सार्वजनिक पातळीवर असणार आचारण असल पाहिजे. राष्ट्रीय चरित्र हे जबाबदारी कर्तव्य समजून सहभाग नोंदवला पाहिजे.राष्ट्रीय चरित्र निर्माण होणं हि वेळेची गरज असुन त्यासाठी प्रत्येकाने उत्स्फूर्तपणे स्वयंस्फुर्तीने योगदान दिलं पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी आपण जेव्हा वावरतो तेव्हा आपण जाणिव पुर्वक सार्वजनिक शिस्तीला महत्व देऊन ती स्व इच्छेने पाळली पाहिजे.**

जेणेकरून आपल अनुकरण इतर करतील व राष्ट्रीय चरित्र निर्माण होण्यासाठी योगदान मिळेल. आपल व्यक्तिगत चरित्र निर्माण व्हावं म्हणून आपण प्रयत्न करत असतो त्याच प्रमाणे राष्ट्रीय चरित्र निर्माण होण्यासाठी देखिल आपण योगदान दिलं पाहिजे हि वेळेची आणि काळाची गरज आहे. राष्ट्रीय चरित्र निर्माण होण्यासाठी समाजिक पातळीवरील सार्वजनिक शिस्तीला खूप महत्त्व आहे.प्रत्येकजण स्वतः च व्यक्तिगत चरित्र निर्माण करण्यासाठी नावलौकिक निर्माण करण्यासाठी अहोरात्र कष्ट मेहनत घेत असतो .धडपड करत असतो या मध्ये काहीच गैर नाही परंतु जसं आपण स्वतः साठी प्रयत्न करतो. तसं आपण आपलं गाव आपला जिल्हा राज्य व पर्यायाने देशाच नावलौकिक करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणं गरजेचं आहे त्या त्या काळातील शासन व्यवस्था अनेक असे नियम तयार करुन राष्ट्रीय चरित्र निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असतात. आपण या राष्ट्रचे नागरिक म्हणून आपलं देखील कर्तव्य आहे लिखित नियम तर आपण पाळलेच पाहिजे पण अलिखित नियम सुद्धा पाळण गरजेचे आहे. व्यवस्था व्यवस्थेचं कार्य करत असते पण आपण जबाबदार नागरिक म्हणून आपण देखील कोणत्याही व्यवस्थेवर अवलंबून न राहता आपल्या देशाचं राष्ट्रीय चरित्र निर्माण करण्यासाठी योगदान दिले पाहिजे. व्यक्तिगत चरित्र निर्माण झाल्याने व्यक्तिसह देशाचा नावलौकिक होतो . मागिल कालखंडात आपल्या देशात अनेक असे व्यक्तिगत चरित्र निर्माण झाले त्यांनी जागतिक पातळीवर वेगवेगळे किर्तीमान स्थापित करून राष्ट्र गौरव वाढवलं.आपण व्यक्तिगत चरित्र निर्माण करून जागतिक स्तरावर आपला वेगळा ठसा निर्माण करत विविध क्षेत्रात भारतीय व्यक्तिंनी आपलं नाव लौकीक निर्माण केल. हि अभिमान आनंदाची बाब आहे असे अनेक व्यक्तिगत चरित्र भविष्यात देखील निर्माण झाले पाहिजेत पण त्या सोबत राष्ट्रीय चरित्र देखील निर्माण झालं पाहिजे.ज्या पद्धतीने व्यक्तिगत चरित्र निर्माण झाले आहेत त्याच तुलनेत राष्ट्रीय चरित्र सुद्धा निर्माण होणं अपेक्षित होते .सार्वजनिक ठिकाणी वावरताना जी समय सुचकता आणि विवेक असणं दिसणं व आचरण होणं अपेक्षित असतं तसं आचरण आपणं करत नाही.आपण जसं स्वतःच्या घराची काळजी घेतो. शिस्त पाळतो म्हणजे शिस्त बद्ध आचरण करतो परंतु हिच बाब आपण जेव्हा सार्वजनिक ठिकाणी वावरत असतो . तेव्हा मात्र आपण कळत न कळत पाळत नाही .किंवा तसं आपल्या कडुन काटेकोर पालन होत नाही जसं बस किंवा ट्रेन मध्ये चढताना उतरताना जागा मिळेल किंवा नाही मिळणार पण प्रत्येकाने स्वयंशिसत म्हणून अगदी रांगेत कुठल्याही परिस्थितीत रंग न तोडता चढ उतार केला पाहिजे. आणि याच पद्धतीने धार्मिक ठिकाणी ,मॉल्स मध्ये तसेच वेगवेगळ्या ठिकाणी स्वयं शिस्त निर्माण होण्यासाठी प्रयत्न होण गरजेच आहे.आणि यासाठी राष्ट्रीय चरित्र महत्वाचं आहे.राष्ट्रीय चरित्र म्हणजे काय तर एखाद्या देशातील सर्व नागरिक देशहिताच्या दृष्टीने देशाच्या गौरवशाली परंपरेत भर घालण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी आचरण करत असताना अलिखित अशी एखादी सवय नियम ज्यांचं पालन करताना कुठलाही कायदा नियम किंवा बंधन नसताना देखील स्वयं स्फूर्तीने आचरण करत असतात अगदी देशातील वेगवेगळ्या प्रांतातील नागरिक जे वेगवेगळी बोलीभाषा बोलताना दिसतात परंतु सार्वजनिक ठिकाणी वावरताना अगदी स्व इच्छेनुसार कुठल्याही नियामाची भिती न बाळगता कर्तव्य म्हणून पालन करतात याला राष्ट्रीय चरित्र म्हटलं जातं आणि ह्या पद्धतीच राष्ट्रीय चरित्र आपल्यला जगातील अनेक देशांमध्ये भ्रमण केल्यानंतर लक्षात येईल थोडक्यात काय तर प्रत्येकाला सार्वजनिक ठिकाणी स्वयं शिस्त हि लागली पाहिजे . परंतु या मध्ये आपण कुठेतरी अजुनही आपल्याकडे सुरवता झालेली नाही किंवा तशा पद्धतीच्या संकल्पना अनेक पुढे आल्या परंतु दुर्दैवाने याला शंभर टक्के यश मिळालं नाही हे आपल्या सगळयांच दुर्भाग्य म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.व्यक्तिगत चरित्र निर्माण होणं गरजेचं असत. कोणत्याही लोकशाही व्यवस्था असणार्या देशातील नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी स्वयं शिस्त निर्माण होणं हे त्या त्या देशाच जागतिक पातळीवर एक वेगळ्या प्रकारच नावलौकिक होत असत.महणुन देश हितासाठी प्रत्येकानं आपापल्या जीवनात कायदा नियम यापलिकडे जाऊन काही शिस्ती स्वयं शिस्त म्हणून स्वीकारल्या पाहिजेत हि वेळेची आवश्यकता पण आहे .म्हणून प्रत्येकाने राष्ट्रीय चरित्र निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

# आदर्श कोणाचा घ्यायचा ?



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**मोबाईल आणि इंटरनेट यांच्या मोहजालात आणि फसव्या दुनियेत अडकून पडलेल्या व्यक्ती दिशाहीन आणि भरकटलेले जीवन जगत आहेत. घरोघरी मातीच्या चुली हे मागे पडून घराघरांत मोबाईल आणि प्रत्येकाच्या हातात मोबाईल असे आधुनिक युग सुरू झाले आहे. त्यामुळे चांगले काय नि वाईट काय ?हे कळेनासे झाले आहे. संस्कार, सभ्यता, शालीनता, दया प्रज्ञावान, परोपकार, गुणवान, समजुतदारपणा हे शब्द मानवी जीवनातून लांब पळाले आहेत. परिणामी चांगले व सुसंस्कृत जीवन जगायचे कसे? जीवनात कोणाचा आदर्श घ्यायचा? हे कळेनासे झाले आहे.**

म्हणून आजचे विद्यार्थी अभ्यास कमी आणि उनाडक्या गोष्टी जास्त करत आहेत. म्हणून त्यांचे जीवनरुपी जहाज चक्रीवादळात अडकल्या सारखे भरकटत आहे. जीवनात चांगली व्यक्ती बनायचे असेल, मोठा माणूस व्हायचे असेल आणि चांगला माणूस म्हणून नाव कमवायचे असेल तर आपले आदर्श व मार्गदर्शक हे चांगले पाहिजेत. मग प्रश्न पडतो की आपण आदर्श कोणाचा घ्यायचा? या प्रश्नाचे उत्तर आपण शोधक वृत्तीने शोधले की आपल्या अवतीभवती, आपल्या घरांत आपले आदर्श मिळतात. त्यासाठी आपण आपले आदर्श शोधले पाहिजेत. आपल्या गावात अनेक चांगले लोक असतात, ज्यांना कोणतेच व्यसन नसते, जे उच्च शिक्षित आहेत, जे चारित्र्यवान आहेत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत जे मोठ्या पदावर पोहचले आहेत अशा लोकांचा आपण आदर्श घेतला पाहिजे. आपले आईवडील हेच आपले पहिले आणि खरे आदर्श असतात हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. ते आपल्यासाठी किती कष्ट करत असतात याची आम्ही जाणीव ठेवतच नाही. आपल्या भारतात व आपल्या महाराष्ट्रात अनेक महामानव, समाजसुधारक, विचारवंत आणि दृष्टे युगपुरुष होऊन गेले.



विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेतला पाहिजे.ते अठरा अठरा तास अभ्यास करायचे म्हणून ते प्रज्ञावंत, ज्ञानवंत म्हणून जगभर ओळखले जातात. तेवढा वेळ नाही जमला तरीही काही हरकत नाही परंतु आजच्या विद्यार्थ्यांनी किमान सहा तास अभ्यास केला तर जीवनाचे सोने व्हायला वेळ लागणार नाही. बाबासाहेबांचा विद्याव्यासंग जगजाहीर आहे तो विद्याव्यासंग आपण आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. बाबासाहेबांनी पुस्तकांसाठी, ग्रंथासाठी घर बांधले. आपण आपल्या घरांत किमान शंभर चांगली पुस्तके संग्रही ठेवले पाहिजेत. त्यात भारताचे संविधान हे असलेच पाहिजे. अशी पुस्तके वाचून आपल्या मस्तकातले घाणेरडे विचार नष्ट होतील. म्हणून पुस्तके वाचण्याऱ्या लोकांचाही आपण आदर्श घेतला पाहिजे. त्याचबरोबर आपण आपले महापुरुष, विचारवंत आणि युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, संत तुकाराम महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगेबाबा, अण्णा भाऊ साठे, तुकडोजी महाराज यांचा आदर्श आपण सर्वांनी बाळगला पाहिजे. विद्यार्थी दशेत असताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांचा आदर्श जोपासला पाहिजे. परंतु त्यांचे शिक्षक त्या दर्जाचे असावेत. काही शिक्षक व्यसनी, दुराचारी असतात. आपण इतर शिक्षकांपेक्षा वेगळे आहोत, मीच कसा चांगला शिक्षक आहे हे विद्यार्थ्यांना नेहमी पटवून सांगतात. असे धूर्त व आपमतलबी शिक्षक आदर्श घेण्यासारखे नसतात. अशा शिक्षकांपासून विद्यार्थ्यांनी चार हात दूर राहणेच पसंत करावे.

जे लोक आपल्या व्यवसायात, नोकरीत, उद्योग व व्यापारात नेहमी मग्न असतात,आपले काम व कार्य निष्ठेने करतात अशा कर्तृत्ववान लोकांचा आपण आदर्श घेतला पाहिजे.शेतात नेहमी कष्टणारे शेतकरी व अहोरात्र देशाचे रक्षण करणारे सैनिक आपले आदर्श असतात. चित्रपटांत काम करणारे हिरो हिरोईन आणि पैशासाठी आपला खेळ गहाण ठेवणारे खेळाडू आपले आदर्श होऊ शकत नाहीत. तसेच भ्रष्टाचार करणारे, जातीभेद मानणारे,धर्मांधता बाळगणारे आणि निष्क्रिय राजकारणी यांचा आदर्श घेणारे या जगात कोणीच नाही हे ही तितकेच खरे आहे. त्याकरिता आपण चांगल्या लोकांचा आदर्श जोपासला की आपले जीवन सुध्दा चांगले बनते आणि म्हणून,सांगा आदर्श कोणाचा घ्यायचा ?हे विचारण्याची वेळ सुध्दा येणार नाही!

# हरित पत वाढविण्यासाठी भारताचा पुढाकार



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**ग्रीन क्रेडिट म्हणजे पर्यावरण संतुलनासाठी भविष्यात करावयाची अथायोग्य तरतूद गुंतवणूक होय. "आधि केले मग सांगितले" या न्यायाने गेल्या 10 वर्षात भारताने पर्यावरण व ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रयत्नामुळे भारताने जगापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणातून बैठका आणि चर्चेतून या परिषदेला एक निश्चित दिशा दिली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या जागतिक हवामान बदलावर विचार मंथन करण्यासाठी दुबई येथील शिखर परिषदेमध्ये जगातील प्रमुख नेते एका व्यासपीठावर आले आहेत. हवामान बदल हा मानव जातीच्या दृष्टीने गंभीर व चिंतेचा विषय असून वर्षानंतर होत असलेल्या या शिखर परिषदेत अनेक गुंतागुतीच्या व कूट प्रश्नावर मंथन घडविले जात आहे.**

संयुक्त राष्ट्र संघाची ही वार्षिक हवामान शिखर परिषद ही भविष्यात येणाऱ्या अडचणी व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दिशा दर्शक बदल घडवून आणत आहे. 30 नोव्हेंबर ते 12 डिसेंबर या दरम्यान होत असलेल्या दुबई येथील शिखर परिषदेचे यजमान पद संयुक्त अरब अमिरातीकडे आहे, कारण जगातील 10 प्रमुख तेल उत्पादक राष्ट्रापैकी यू.ए.ई. हा प्रमुख देश आहे. तेल, वायू आणि कोळसा हे एक जिवाश्म इंधन आहे. हवामान बदलाची मुख्य कारण म्हणजे जिवाश्म इंधन जाळल्यानंतर कार्बनडॉय ऑक्साईड सारख्या तापमान वाढविणाऱ्या वायूमुळे पृथ्वी तापत आहे. 2023 हे वर्ष जगातील सर्वात उष्ण वर्ष होते. त्यामूळे पृथ्वीचे तापमान कमी करण्यासाठी हीच वेळ आहे व आता अधिक वेळ दवडता कामा नये. त्यामूळे जगातील विकसनशील राष्ट्रे या परिषदेत एकत्र येऊन जिवाश्म इंधना ऐवजी पवन आणि सौर ऊर्जेच्या निर्मितीसाठी स्वच्छ तंत्रज्ञानाच्या विस्तारावर भर देत आहेत. जगाच्या पर्यावरण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडविण्यासाठी ही परिषद काही प्रयत्न करू शकेल काय? आपल्या उद्दिष्ट तूर्तीसाठी दीर्घकालीन विचार करता जागतिक तापमान वाढ 1.5 C. पर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात यशस्वी होईल काय, भविष्यात शेती आणि अन्न उत्पादनापुढे कोणती आव्हाने असतील असे अनेक प्रश्न उभे केले जात आहेत. 2015 साली पॅरिस मध्ये 200 देशांनी पर्यावरण संतुलनावर सहमती दाखविली होती या दृष्टीने आत्मपरिक्षण करून भावी वाटचाल कशी केली जाईल, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते त्याची उत्तरे दुबई शिखर परिषदेत दिली जाणार आहेत.

**पुढाकार संयुक्त राष्ट्र संघाचा :** या परिषदेचे यजमानपद दुबईचे सम्राट सुलतान अल जाबेर यांच्याकडे आहे व जगातील 75 हजार प्रतिनीधी या परिषदेसाठी दुबईत जमले आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध हवामान संस्थाचे प्रतिनिधी या परिषदेत भाग घेत आहेत.'इंटर गव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लाईमेट चेंज' या यत्रंणेनूसार हवामान बदलाचे हानीकारक दुरगामी प्रभाव टाळण्यासाठी 1.5 C.कार्बनउत्सर्नाचे लक्ष गाठणे महत्त्वाचे असणार आहे. पूर्व औद्योगिक क्रांती काळाच्या तुलनेमध्ये सध्या दीर्घकालीन तपमान वाढ सुमारे 1.1 C. किंवा 1.2 C. एवढी आहे. मानवाने जिवाश्म इंधन मोठ्या प्रमाणात जाळल्याच्या अधिच्या काळापेक्षा आजचा काळ अधिक चिंताजनक आहे. अलिकडील अंदाज असे सूचीत करतो की, 2100 पर्यंत जग हे 2.4 ते 2.7C. तपमान वाढीच्या मार्गावर आहे. त्यामुळे 1.5 C. ही मर्यादा रोखण्यासाठी झपाट्याने काम करणे आवश्यक आहे. वेळ थोडी आहे, परंतु गंभीर प्रयत्न केले नाही तर सारे जग उष्णतेच्या खाईत लोटले जाऊ शकते.

कॉप- 28 मध्ये चर्चेचा केंद्रबिंदू आहे, हरित ग्रह वायू प्रभाव कमी करणे व जागतिक तपमान वाढण्यापासून रोखणे हा आहे. त्यासाठी ऊर्जा स्त्रोतांचा विवेकी वापर करण्यावर भर द्यावयाचा आहे. श्रीमंत व गरीब राष्ट्रांनी हवामान रक्षणासाठी कोष विकसित करणे आणि विकसनशील राष्ट्रासाठी नवीन करारावर सहमती निर्माण करण्यासाठी भर दिला जात आहे. भविष्यात निरोगी आणि स्वच्छ लोकानुकूल जिवन शैलीचा विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे. त्यासाठी सर्व सामावेशक दृष्टीकोन स्विकारला जात आहे. आरोग्य, वित्त, अन्न, निसर्ग आणि कृषी जीवन या विषयावर भर देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अमेरिका, चीन, ब्रीटन, इटाली या देशाचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत. शिवाय व्यवसाय आणि विश्वस्थ संस्था यांचे प्रतिनिधी सुद्धा सहभागी झाले आहेत. जिवाश्म इंधनाशी संबंधीत अनेक प्रतिनिधी भाग घेत आहेत. स्वतः सम्राट अली जाबेर यांनी 100 दशलक्ष एवढा निधी हवामान रक्षणाच्या कोषासाठी घोषीत केला आहे, त्यांच्या पावलावर युरोपीयन युनियनने पाऊल टाकली आहेत. तोटा किंवा नुकसान निधी म्हणून ही रक्कम वापरली जाईल. या निधी साठी जगातील श्रीमंत देशांनासुद्धा आता आपले योगदान द्यावे लागणार आहे. त्यांच्याकडून अधिक भरगोस कृतीची अपेक्षा आहे. अशा प्रकारचा कोष निर्माण केल्यामूळे कोषनिधी वाढविण्यासाठी योग्य पाऊले टाकली जात आहेत. या शिखर परिषदेत नविन दृष्टीने भावी आशा-आकांक्षा पल्लवीत करण्यासाठी धाडसी पाऊले टाकावी लागतील कारण आवश्यक त्या वेगाने जग अद्यापही काम करत नाही. आदर्श तत्त्वाचे अनुसरण करून बिकट प्रश्न सोडवावे लागतील. कार्बन उत्सर्जन कमी करण्यसाठी या परिषदेत घडविण्यात आलेले विचार मंथन व नवनवीन वैज्ञानिक प्रयोग नव्या जगाला मार्गदर्शन करणारे आहेत.




**भारताची ठोस भूमिका :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दुबई शिखर परिषदेतील मुख्य भाषण जागतिक हवामान बदलातील विविध समस्यांना सामोरे जाण्यासाठी अत्यंत मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये पर्यावरण संतुलनासाठी सरकार व औद्योगिक संस्थामधील सुसंवादावर भर दिला. भविष्यात पृथ्वीचे तपमान कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच भारताने "एक जग एक पृथ्वी व एक परिवार'' हे ध्येय समोर ठेवून वैश्विक सहयोगावर भर दिला आहे. नव्या जगामध्ये प्रदूषणाच्या वाढत्या अडणीमुळे समस्यांची गुंतागुत वाढली आहे. त्यामुळे तपमान वाढ कशी रोखता येईल ही एक समस्या बनली आहे. विकसनशील राष्ट्रे ज्या तळमळीने या प्रश्नाकडे पाहत आहेत त्याबाबत पाश्चीमात्य राष्ट्रे गंभीर नाहीत. त्यांचे सक्रीय सहकार्य वाढल्याशिवाय हवामान बदला नंतरचे उद्योग कृषी व अन्न पुरवठा यावर होणारे परिणाम रोखता येणार नाहीत. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची हवामान विषयक भूमिका ठाम पणे मांडली. विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखण्यासाठी भारताने जगासमोर एक उत्तम उदा. मांडले आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे पॅरिस कराराप्रमाणे झालेल्या चर्चेनुसार भारत पुढील व्यूव्ह रचना करत आहे. विश्वकल्याणासाठी सर्वांची भागीदारी आवश्यक आहे तरच पर्याय सुटू शकेले भारताची लोकसंख्या 17 टक्के आहे परंतु कार्बन उत्र्सजन 4 टक्के पेक्षा कमी आहे. भारताने हवामान बद्लाचे गंभीर परिणाम टाळण्यासाठी, हवामान न्याय, हवामान वित्त सुरक्षीत करण्यासाठी भारताने हरित पथ वाढविण्याचा निश्चय केला आहे. भारताचा हा संकल्प विकसनशिल देशात अनुसरला पाहिजे. भारताने 11 वर्ष पूर्वी पर्यावरण संतुलनाचे लक्ष घातले आहे. विशेषतः पर्यावरण क्षेत्रात संतुलन गाठण्यासाठी ग्रीन क्रेडिट ची आवश्यकता आहे तरच सर्वांची सुरक्षा व भागिदारी वाढू शकेल. भारताने इकॉलॉजि व इकॉनॉमि मध्ये संतुलन गाठले आहे. भारत जगातील 5 प्रमुख अर्थव्यवस्थेपैकी एक असून भारताने (जीमाश्म) नॉन फॉसिल ऊर्जेबाबत चे लक्ष 9 वर्षापूर्वी गाठले आहे. 2070 पर्यंत भारत शून्य हे लक्ष गाठू शकेल. शाश्वत भविष्यासाठी भारताने नव्या जिवनशैलीच्या विकासावर भर दिला असून नवीकरण ऊर्जा आणि पर्यायी ऊर्जेचा विकास भारताने गतीने केला आहे. तसेच सौर ऊर्जा, पवन ऊर्जा व जैव इंधनाबाबत अनेक प्रयोग करून नविन योजना तयार केल्या आहेत. ग्लासगो परिषदेनंतर भारताने 13 देशाचा नवीन समूह तयार करून पर्यावरण कृती योजना तयार केली आहे. लोकांच्या भागिदारीतून पर्यावरण समस्या सामुदायिक शहाणपणातून सुटू शकेल. गेल्या शतकामध्ये मुठभर देशांनी पर्यावरणाचा अंधाधूंद वापर केल्यामूळे आज जगापुढे बिकट प्रश्न उभे आहेत. ते सोडविण्साठी प्रत्येक देशाने आपले लक्ष व उद्दिष्ट ठेऊन पूर्तता केली पाहिजे सर्वांनी मिळून, सर्व देशांनी एकत्र काम करण्याची गरज आहे. सर्व विकसनशील देशांनी हनी व नुकसान टाळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत नविनतम सर्व समावेशक व शाश्वत दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. भारताने 2028 साली कॉक- 33 परिषदेचे आयोजन करण्याचे निमंत्रण दिले आहे. ऑक्सपर्ड विद्यापीठातील तज्ञांनी जागतिक हवामान बदलाचे परिणाम टाळण्यासाठी वैज्ञानिक शोधाची गरज मांडली आहे. तर बोसवाणा विद्यापीठाच्या तज्ञांनी क्षेत्रीय पहाणी करण्यावर भर दिला आहे.

**समारोप :** दुबई येथे झालेल्या जागतिक पर्यावरण परिषदेत भारताने पुढाकार घेतल्यामुळे ग्रीन क्रीडिट म्हणजे हरित पथ व्यवस्था विकसित करण्यावर भर दिला आहे. आपले कार्बन उत्सर्जन शून्यावर नेण्याचा भारताचा संकल्प आहे. भारताने 9 व 11 वर्षापूर्वी जे प्रयत्न सूरू केले त्याची फलिते आता दिसून येत आहेत. सौर ऊर्जा आणि जैव ऊर्जे बाबत सातत्याने पाठ पुरवठा घेतला आहे. कमीत कमी वेळात अधिक चांगली कामे पूर्ण करून आणि दीर्घकालीन उपाय योजना करून पर्यावरण समस्या सोडविता येईल. हवामान बदलानंतर नव्या जगात सामुदायिक शहाणपणाची गरज आहे. समस्या अनेक आहेत, आव्हानेही आहेत परंतु भविष्यकाळात करावयाच्या प्रयत्नाची दिशा ही दीर्घकालीन नियोजनावर अवलंबून असणार आहे. हवामान बदलातील निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी सामुदायिक कोश उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे न्याय व समतोल दृष्टीने विचार करता सामुदायिक कृतीवर भर देऊन पाऊले टाकवी लागतील. सकारात्मक, आशादायी आणि निर्णायक पाऊले टाकूण चित्र बदलता येऊ शकेल. सामुदायिक शहाणपण व योग्य कृती हा पर्यावरण समस्या सोडविण्याचा खरा मार्ग होय, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा खरा संदेश होय. ही परिषद विश्वकल्याण व मानवतेच्या रक्षणार्थ नवे जागरण घडवत आहे. अतिरीक्त उर्जा वापर कमी करणे, तसेच जमीनीवर राहून वास्तव वादी दृष्टीने विचार करणे, आपल्या शक्तीस्थांनाचा जपून वापर करणे, या परिषदेत भर दिला आहे. आपली आजची कृती उद्याच्या हजारो वर्षाचे भवितव्य ठरविणार आहे. आज पर्यावरण रक्षणामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन कमी पण राजकारण जास्त असे चित्र दिसून येत आहे ते बदलण्याची गरज आहे. पुढील पाच वर्षांनी भारतात होणाऱ्या परिषदेत भारत आणखी अभिमानास्पद कामगिरी करून जगाला नवा मार्ग दाखवू शकेल, यात शंका नाही.

# व्हाट्सएप युनिव्हर्सिटीचे विद्वान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**सोशल मिडियाचा विकास विज्ञानामुळे झाला. आणि त्यामधून अज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करायला सुरवात झाली. कोणत्याही कुटुंबाची,व्यक्तीची व देशाची प्रगती शिक्षणावर व जागृतीवर अवलंबून असते. शिक्षण म्हणजे निव्वळ पदवी घेऊन कागद मिळवणे नव्हे तर शिक्षण म्हणजे वैचारिक बदल करून माणसाला माणूस म्हणून स्विकार करणे होय. शिक्षणाचा उपयोग स्वतः साठी कुटुंबासाठी तसेच देशासाठी होत असतो. शिक्षणामुळे माणूस जागृत होऊन सत्य असत्या मधला फरक कळून असत्याचा विरोध करून सत्याचा स्विकार कराण्याचे धाडस करणे म्हणजे शिक्षण होय. सत्य हे कटू असते आणि ते पचायला अवघड असते हे खुप वेळा आपण ऐकत असतो परंतु मागच्या काही वर्षापासून तर सत्य बोलणे गंभीर स्वरूपाचा गुन्हा झाल्याचे दिसून येते.**

सत्य बोलणाऱ्यांना देशद्रोही, धर्मद्रोही आणि व्यक्ती विरोधी म्हणून जाहीर केले जाते, किंबहुना अनेक प्रकरणात सत्य बोलले म्हणून पोलीस यंत्रणेचा गैरवापर करून दबावतंत्र वापरण्यात आले. चुकीचे, असत्य, काल्पनिक, माणसा माणसात द्वेष पसरवणे, विषमता, आणि ज्याचा व माणसाच्या विकासाचा कोणताही संबध नाही अशा पोस्ट, व्हिडीओ शेअर करण्यात धन्यता व विद्वता मानणारे विद्वान व्हाट्सएप युनिव्हर्सिटी ची देण आहे. या उलट आपण शिक्षीत असुन बेरोजगार आहोत, आपल्या सारखे अनेक तरुण शिक्षीत असुन बेरोजगार आहेत याची जाणीव नसुन केवळ चुकिच्या गोष्टींवर समोर येणारे आणि सत्य गोष्टीला विरोध करणारे विद्वान तरुण केवळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वरच आढळून येतात. देशात आरोग्य सुविधा मृत्युशयेवर आहेत, बेरोजगारी आहे, महागाई आहे, शिक्षणाचे व्यापारी करण करून बालवाडीची फी लाखों रुपयांपर्यंत गेली आहे. यावर एकही शब्द न बोलणारे किंबहुना या समस्या देशात आहेत याचीच जाणीव नसलेले आणि इतरांचा द्वेष करून माझाच धर्म, माझीच जात श्रेष्ठ कशी यावर गर्व करणारे तरुण निव्वळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून आपले मत बनवून मेंदु व शिक्षणाचा वापर करणे बंद केले आहे. चुकिची विचारसरणी व विशिष्ट समुहाचा द्वेष करून राजकीय झोळी भरून घेण्यासाठी या व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्वान तरुणांचा वापर जातीच्या, धर्माच्या व व्यक्तीच्या नावावर करून घेतला जातो. देशात हजारो वर्षांपासून विषमता, भेदभाव, अर्धविश्वास व पाखंड याला खतपाणी घालून बहुसंख्य लोकांना मानसिक गुलाम बनवून स्वतः ची झोळी भरणारे लोक आजही आपला कावा सोडायला तयार नाहीत. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान यासारख्या गोष्टी असुनही जर बहुसंख्य तरुणांना अज्ञान, अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, काल्पनिक कथा, जात धर्म इत्यादी आधारावर माणसिक गुलाम बनवून माणसाला माणसा विरोधात, एका जातीला दुसऱ्या जाती विरोधात, एका धर्माला दुसऱ्या धर्माच्या विरोधात उभे करून तरुणांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आयुष्य उद्ध्वस्त केले जात असताना ही व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे विद्वान विद्यार्थी सत्य बोलण्याची हिंमत करत नाहीत याचे कारण व्हाट्सएपच्या माध्यमातून चुकिचे, काल्पनिक व द्वेषाचे विचार आजही पेरून शिक्षणाला कमकुवत करून टाकले आहे. समाजामध्ये सामाजिक प्रबोधन करून लोकांना जागृत करणाऱ्या प्रत्येक संत महापुरुषांनी शिक्षणावर भर दिला, शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले परंतू व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्यार्थ्यांना संत महापुरुषांचे विचार व शिक्षण याचे काही घेणे देणे नाही. ते केवळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर विश्वास ठेवून स्वतः च्या समस्येकडे दुर्लक्ष करत, आपल्या बौद्धिक पातळीचा विचार न करता व्हाट्सएप वर आलेले मॅसेज फॉरवर्ड करण्यात धन्यता मानतात. व्हाट्सएपवर बरेचसे मॅसेज अशा पद्धतीने बनवले जातात की त्या मधुन चुकीच्या व काल्पनिक गोष्टी जास्त सांगितल्या जातात तसेच त्याच पोस्ट च्या माध्यमातून फॉरवर्ड करणाऱ्या तरुणांची बौद्धिक पातळी तपासली जाते. कारण चुकीचे काल्पनिक मॅसेज केवळ जात धर्म किंवा इतरांचा द्वेष करण्यासाठी बनवले जातात. त्या मॅसेज ची शहानिशा, सत्यता तपासून न बघता आला तसाच निव्वळ द्वेष भावनेने फॉरवर्ड करून आपली बौद्धिक क्षमता, बौद्धिक विकास हा मॅसेज तयार करणाऱ्यांना




दिसून येतो. आणि जे तरुण कोणत्याही प्रकारचा विचार न करता, सत्यता न तपासता, शहानिशा न करता जसाच तसा मॅसेज फॉरवर्ड करतात तेच लोक समाजात द्वेष पसरवण्यासाठी वापरले जातात. व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर स्वतः ला विद्वान, अभ्यासक व शिक्षीत समजणारे परंतु समता बंधुता न्याय व स्वातंत्र्य, देशहित व मानव हीताचा विचार न करता निव्वळ एखाद्या गोष्टी चा विरोध करणारे लोक कधीच स्वतः बुद्धीने काम करत नाहीत. त्यांची बुद्धी दुसरे कोणी तरी कंट्रोल केलेली असते. ज्यांनी बुद्धी कंट्रोल केलेली असते त्याच लोकांना या मेंदु चा वापर न करणाऱ्या तरुणांचा जास्त वापर होतो. स्वतः बेरोजगार, औषधोपचार मिळत नसताना देशाच्या अर्थव्यवस्था व भारताचे नाव जगात झाले असा सिद्धांत मांडणारे तरुण बेरोजगारी, शिक्षण, महागाई आरोग्य सुविधा सारख्या समस्या ला सामोरे जातात. परंतु त्या विरोधात बोलु शकत नाहीत. कारण त्यांना जेथुन मॅसेज येतात तेथे शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई, भोंदुगीरी, अंधविश्वास याबद्दल मॅसेज येत नाही तर जाती जाती जाती धर्मात द्वेष व तिरस्कार करणाऱ्याच पोस्ट येतात म्हणून त्यांच्या डोक्यात निव्वळ द्वेषच भरण्याचे काम आज व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून बरेच लोक करत आहेत. म्हणून देशात अनेक समस्या निर्माण होऊनही त्यावर पाहिजे तशी चर्चा होत नाही परंतु ज्या गोष्टींवर चर्चा नको व्हायला त्या गोष्टींवर चर्चा मुद्दाम हुन केली जाते कारण या माध्यमातून चुकिच्या विचाराची पेरणी करून तरुण रोजगार, शिक्षण, आरोग्यासाठी नाही तर जात धर्मासाठी रस्त्यावर उतरले पाहिजे. हाच या मागचा उद्देश असतो. तरुणांनी आज आपला शत्रु ओळखून समान समस्येवर एकत्र येऊन शत्रु विरोधात आवाज उठवणे आवश्यक आहे. जाती धर्माच्या नावावर फुट पाडून जाती धर्माच्या नावावर झोळी भरणाऱ्या लोकांना धडा शिकवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कोणताही प्रकारचा भेद न पाळता सर्वांगीण विकासाची कास धरली तरच आपण स्वतः चा व देशाचा विचार करू शकतो. परंतु व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून चुकीचे विचार पेरून मुळ समस्येपासून दुर नेऊन निव्वळ काल्पनिक कथा, जात धर्म आणि द्वेष यांच्या नावावर लोकांना भावनिक बनवून त्यांना त्यांचा प्रचार प्रसार करायला लावणे व हे करताना तरुणांना धन्यता वाटतणे हेच व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर विद्वान असल्याचे लक्षण होय. जो तरुण आलेल्या पोस्ट ची शहानिशा करू शकत नाही, पोस्ट मधील तथ्य शोधु शकत नाही, त्यामागचा उद्देश शोधु शकत नाही अशा तरुणांच्या शिक्षणाचा उपयोग काय हा प्रश्न जरी उपस्थित राहीला तरीही शिकलेल्या, संख्येने जास्त असलेल्या लोकांना आजही मानसिक गुलाम बनवून, मुठभर लोकांचे चुकीचे पसरवण्यासाठी ढिगभर लोक समोर येऊन मोठ्या आनंदाने व गर्वाने काम करून धन्यता माणत असतील तर देश चुकिच्या दिशेने जात आहे. आणि व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून असेच विद्वान तरुण तयार झाले तर देशात विषमता, द्वेष, अज्ञान, माणसिक गुलाम जास्त वाढून देशात अराजकता माजेल परंतु आज आणि उद्याही व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्वान तरुणांना त्याच काही वाटणार नाही. कारण व्हाट्सएपच्या माध्यमातून चुकीचे घेतलेल्या ज्ञानाची शहानिशा न करता स्विकार करणे म्हणजे गुलाम असण्याचे सिद्ध करणे होय.

# कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतात कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारें लैंगीक शोषण ही समस्या अतिशय गंभीर आहे.कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ रोखण्यासाठी कायदा करण्यात आला असला तरी कामाच्या ठीकानी लैंगिक छळ होतच आहे.उत्तर प्रदेशातल्या एका महिला न्यायाधीशाने थेट सरन्यायाधीश चंद्रचूड यांना पत्र लिहून इच्छामरणाची मागणी केली आहे. पीडित महिला जज यांनी वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्यावर शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. महिला सशक्तिकरणाच्या कितीही चर्चा झाल्या तरी अद्याप महिलांवर होणारे अत्या च्यावर कमी करण्यात आपल्याला यश आलेले नाही. या महिलांसाठी देशाची न्यायव्यवस्था हा एक फार मोठा आधार आहे.**

न्यायालयापर्यंत पोहोचलेल्या महिलांना काही प्रमात का होईना दिलासा मिळाल्याची अनेक उदाहरणे आहेत पण चक्क एका महिला न्यायाधीशांनाच लैंगिक शोषणाचा सामना करावा लागत असून त्यांना न्याय न मिळाल्यामुळे त्यांनी थेट देशाच्या सरन्यायाधीशांकडे मरणाची परवानगी मागितल्याचा धक्कादायक हा प्रकार आहे. तर सामान्य महिलांनी काय करावे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ रोखण्यासाठी, लैंगिक छळाचे प्रमुख मूलभूत घटक समजून घेणे महत्त्वाचे आहे. लैंगिक छळ ही एक सामाजिक समस्या आहे. हे रोखणे म्हणजे केवळ व्यक्तींचे वर्तन बदलणे नव्हे; ज्या ठिकाणी हे घडते त्या कामाच्या ठिकाणांची संस्कृती आणि वातावरण बदलण्याची गरज आहे. प्रथमतः लैंगिक छळ होण्यापासून रोखण्यासाठी, आम्ही या वर्तनांना चालना देणाऱ्या प्रणालीगत आणि संदर्भित समस्या ओळखल्या पाहिजेत. प्राथमिक प्रतिबंध म्हणजे लैंगिक अत्याचाराची मूळ कारणे (किंवा चालक) संबोधित करणे. शक्ती म्हणजे इतरांवर नियंत्रण, अधिकार किंवा प्रभाव असणे; त्याला अनेक आयाम आहेत. लैंगिक छळाची कारणे समजून घेण्यासाठी सत्तेची संकल्पना आणि विशेषतः सत्तेचा गैरवापर हा केंद्रस्थानी आहे. कामाच्या ठिकाणी, पॉवर डायनॅमिक्स सहसा एखाद्या व्यक्तीच्या ज्येष्ठता, वय किंवा व्यवसाय मूल्याशी जोडलेले मानले जाते. उदाहरणार्थ, छळ करणारा एखाद्या व्यवसायाचा मालक, व्यवसायाचा मूल्यवान ग्राहक, छळ झालेल्या व्यक्तीचा थेट पर्यवेक्षक बनून किंवा त्या व्यक्तीच्या भविष्यातील करिअरच्या संभाव्यतेवर प्रभाव टाकण्याच्या स्थितीत असू शकतो.

लैंगिक असमानता हे कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचे प्रमुख कारण किंवा मूळ कारण आहे. भेदभाव आणि इतर प्रकारच्या गैरसोयींमुळे कामाच्या ठिकाणी शक्ती असमतोल निर्माण होते ज्यामुळे एखाद्या व्यक्तीचा लैंगिक छळाचा अनुभव वाढू शकतो.

लैंगिक छळ हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांवरील हिंसाचाराचा एक प्रकार म्हणून ओळखला जातो, ज्यामध्ये महिलांवरील हिंसाचाराच्या इतर प्रकारांप्रमाणेच अंतर्निहित घटक असतात.

लिंग असमानता तेव्हा उद्‌भवते जेव्हा शक्ती, संधी आणि संसाधने समाजात पुरुष आणि स्त्रिया यांच्यात समान रीतीने सामायिक केली जात नाहीत आणि जेव्हा स्त्रियांना पुरुषांसारखे महत्त्व आणि सन्मान दिला जात नाही.

प्रचलित लिंग मानदंड आणि संरचनांमुळे समाजातील पुरुष आणि स्त्रियांना प्रदान केलेली शक्ती, संसाधने, संधी आणि मूल्य यांचे असमान वितरण. लैंगिक असमानता ही वृत्ती, निकष आणि वर्तणुकीमुळे निर्माण होते जे सूचित करतात की विषमलैंगिकता ही सामान्य किंवा प्राधान्यकृत लैंगिक अभिमुखता आहे आणि लोकांची पसंतीची लिंग ओळख हीच आहे ज्याने ते जन्माला आले आहेत समाजातील बायनरी लिंग भूमिका आणि लिंग-आधारित निकष लोकांना कसे समजतात यावर या नियम, वृत्ती आणि वर्तनांचा प्रभाव पडतो. सामाजिक संदर्भाचे इतर पैलू आहेत जे स्त्रियांवरील हिंसाचाराच्या आकलनाशी संबंधित आहेत.

लैंगिक असमानता इतर सामाजिक अन्यायांपासून वेगळी केली जाऊ शकत नाही कारण लिंग असमानता सहसा संरचनात्मक आणि पद्धतशीर भेदभाव, असमानता आणि अन्यायाच्या इतर प्रकारांसह असते. याचा अर्थ असा की स्त्रिया आणि पुरुषांना दिलेले मूल्य सर्व स्त्रियांना किंवा सर्व पुरुषांना समान रीतीने प्रदान केले जात नाही आणि आपला समाज, संस्था आणि संघटना त्या परस्परसंवादातून आकार घेतात. या परस्परसंवादांचा महिलांवरील हिंसाचाराचा प्रसार, गतिशीलता आणि प्रभाव यावरही प्रभाव पडतो.



२०१८ च्या राष्ट्रीय सर्वेक्षणात स्पष्टपणे दिसून आले आहे की लैंगिक छळ हा पुरुषांबरोबरच महिलांसाठीही एक समस्या आहे. तथापि, गेल्या पाच वर्षांत कामाच्या ठिकाणी पुरुषांपेक्षा स्त्रियांचा लैंगिक छळ होण्याची शक्यता जास्त होती (पुरुषांच्या तुलनेत 26% स्त्रिया 39%). एकूणच लैंगिक छळाच्या बळींकडे पाहता, गेल्या पाच वर्षात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या बळींपैकी पाचपैकी तीन (58%) महिला होत्या. सर्वेक्षणाने मागील सर्व संशोधनांची पुष्टी केली, असे आढळून आले की कामाच्या ठिकाणी बहुतेक लैंगिक छळ पुरुषांकडूनच केला जातो. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या बळींपैकी 79% एक किंवा अधिक पुरुष गुन्हेगारांकडून लैंगिक छळ झाला.

देशात महिलांवर या काळात बलात्काराच्या ९१ हजार ९०० घटना घडल्या. २०२१ मध्ये प्रत्येक दिवशी बलात्काराच्या ८६ घटना आणि प्रत्येक तासाला अत्याचारच्या ४६ घटना घडल्या. राजस्थान (सहा हजार ३००), मध्यप्रदेश (दोन हजार ९५० ), उत्तर प्रदेश ( दोन हजार ८४५ ) आणि महाराष्ट्र (दोन हजार ५००) येथे सर्वाधिक बलात्कार झाले. या साऱ्याला अत्याचार, त्यांची व्याप्ती, ते रोखण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव, गुन्हेगारांना राजकीय अभय, पोलिसांचा भ्रष्टाचार, राज्य शासनांचे सदोष निर्णय (बिल्कीस बानो प्रकरण) आणि समाजाची संवेदनहीनता ही कारणे आहेत. वाढत्या धार्मिक उन्मादात स्त्री ही एक उपभोगाची 'वस्तू' आहे, अशी समाजधारणा वाढविणाऱ्या शक्ती सक्रिय झाल्या आहेत. त्यांच्या बेछूट वर्तनाला राजमान्यता मिळत आहे. तसेच, स्त्री अत्याचारावरील संवेदना जाती व धर्माच्या आधारे पाहिली जाऊ लागली आहे. हे केवळ भयावह नाही, तर समाज म्हणून किळसवाणे व विकृतीचे लक्षण आहे. या मानसिकतेमधून वेगवेगळ्या जाती व धर्मातील स्त्रिया स्वतःच्या संवेदना आपापल्या समुदायापर्यंत मर्यादित ठेवत आहेत. बुरखा किंवा तिहेरी तलाकाला विरोध करतानाच आपल्या धर्मातील जाचक रुढींकडे पुरुष व स्त्रियाही काणाडोळा करीत आहेत. स्त्री अत्याचारांच्या विरोधात आवाज उठविणारी चळवळ उभी राहण्याच्या मार्गात हा मोठा अडसर बनू लागला आहे. तसेच, राजकीय पक्षांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन राजकीय स्वार्थापर्यंत संकुचित राहिला आहे. राजकारण आणि समाजकारण यातील स्त्रियांच्या आरक्षणाला कुटुंबातील स्त्रियांना पुढे करून आधीच वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. परंतु स्वपक्षीय आणि परपक्षीय भिंगातून स्त्री अत्याचाराच्या घटनांकडे पाहिले जात आहे. 'निर्भया'च्या अश्लाघ्य घटनेननंतर ढवळून निघालेला समाज बघून आपण समाज म्हणून 'शाबूत' आहोत, असे वाटणाऱ्या मला आज मणिपूरमधील स्त्री अत्याचारावर राजकीय विचारांच्या संलग्नतेपोटी निपचित पडलेल्या समाजाकडे बघून भीती वाटते. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी, त्यांचे उगमस्थान असलेली सर्वंकष पुरुष-प्रधानता नष्ट करणे, हाच एकमेव पर्याय आहे.

# यळकोट, यळकोट जय मल्हार



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशात सणावारांचे व देवीदेवतांच्या यात्रा, ज्यांचे विशेष व अन्ययसाधारण महत्व आहे असे म्हटले तरी योग्य व उचित ठरेल. तेंव्हा प्रत्येक महिन्यात भारताच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या राज्यात देवी-देवतांच्या यात्रा भरतात. छत्रपती संभाजीनगरला लागूनच बीड बाय पास लगत सातारा हे गांव आहे. याचे रुपांतर आता शहरातच झाले आहे. येथे खंडोबारायाची मोठी यात्रा भरते. आजुबाजूने निसर्गसृष्टीने नटलेला परिसर असून दोन मोठया टेकड्या आहेत. हिरवळीने पसलेले आल्हाददायक थंडीच्या गारव्याने भारावून गेलेले वातावरण आहे. हे सर्व दृश्य बघून यात्रेकरु मंत्रमुग्ध होऊन तल्लीनतेने खंडोबाचे दर्शन घेतात.**

अशा या नयनरम्य निसर्गरम्य स्थळी खंडोबारायाचे भव्य-दिव्य असे मंदिर आहे. सद्यस्थितीत दरवर्षी भरणाऱ्या या यात्रेला नुसते मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रातही विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. आज रोजी चंपाषष्ठी दिनी महाराष्ट्र राज्यात प्रमख्रु सहा ठिकाणी यात्रा भरतात. त्यातच प्रमुख एक यात्रा म्हणजे शुध्द षष्ठी चंपाषष्ठी म्हणून सातारा छत्रपती संभाजीनगर येथे भरतेय. सद्यस्थितीत बऱ्याच जणांना वाटते की, खंडोबाराय म्हटले की, धनगरांचे दैवत आहे. पण तसे काहीही नाही. राज्यातीलच नव्हेतर देशातील अनेक भटक्या जाती जमाती, तसेच मराठा, कुणबी, वाणी, ब्राम्हण, बारा बलुतेदार या दैवतास मानपान देतात. वेळप्रसंगी खंडोबाच्या नावाने जागरण गोंधळ घालतात. सर्व स्तरातील समाजवर्ग खंडोबारायास कुलदैवत मानतात. धनगरांचे हे तर कुलदैवत असून अनेक समाज घटकांचे असून जेंव्हा घरामध्ये मुलांचे किंवा मुलीचे लग्न ठरते तेंव्हा तत्कालिन परिस्थितीत जागणरण गोंधळ घालतात व खंडोबारायाचे दर्शन हे हमखास जोडीने घेतात. यामुळे भावी जीवन हे सुखरुप जाते व घरादारात शांतता नांदेते अशी भावनिक श्रध्दा असते. पूर्वीपासून तर आजतागायत हे चालत आले आहे. प्रत्येकाच्या देव्हाऱ्यात खंडोबाची पूजा केली जाते. दर रविवारी खंडोबारायांच्या नावाने तळी उचलली जाते व खालील गीत म्हटले जाते.

***हर हर महादेव***
***चुण चुण मोरया***
***बहिरोबाचा चांदुबा***
***तळी भांडार हाती धरा***
***बेलभंडार उधळा बेल भंडार उधळा***
***यळकोट यळकोट जय मल्हार***
***नामाचा जयघोष करा***
***दिवट्या हाती धरा***
***मल्हारी मार्तंड नांदे***
***तुमच्या आमच्या घरा***

ग्रामीण भागातील भक्तगण या यात्रेस मोठया संख्येने येतात. येणाऱ्या एक महिन्यानंतर हरभरा, गहु ही पिके भरभरुन शेतकऱ्यांच्या हाती येतात. यामुळे शतकरी राजा खुशीत असतो, तो मोठ्या भक्ती भावाने येऊन बेलभंडार उधळत यळकोट यळकोट जय मल्हाराच्या गजरात खंडोबारायाचे दर्शन घेतात. प्रसाद म्हणून खोबरावाटी, रेवड्यांची उशळण करतात. आजुबाजूच्या पंचक्रोशी गावतले भाविक हे आपल्या मुलाबाळासह चालत येतात. असे अनेक भक्तांच्या नवसाला पावणारे जागृत देवस्थान म्हणजे सातारा छत्रपती संभाजीनगरचे होय.






खंडोबारायाच्या नावाने भरणाऱ्या या यात्रेला चंपाषष्ठी असे का म्हणतात ? यामागे फार मोठी अख्यायिका आहे. जेंव्हा मणी व मल्ल या दैत्यांनी ब्रम्हदेवाला प्रसन्न करुन घेतले व अजिंक्य होण्याचा वर मागितला. या वर प्राप्तीमुळे ते दैत्य गर्वाभिमानी होऊन देवदेवतांचा छळ करु लागले. इंद्र व अप्सरांना सळो की पळो करुन सोडले. मणी व मल्ल हे स्वैराचार व अंदाधुदंपणे उन्मत होत गेले. त्यांच्या क्रुर कृत्यापासून मुक्तता मिळावी म्हणून इंद्रदेवताने शिवशंकराकडे मदतीची याचना केली. अशा कठिण समयी भगवान शंकरांनी उग्र व भव्य दिव्य मार्तंड भैरव हा अवतार धारण केला. मार्तंड अर्थात मार्तंड भैरवांनी तिसरा डोळा उघडला. तो तेजस्वी भासत होता. कपाळी हळदीचा भंडारा लावला होता. नंदीवर आरुढ होऊन मणी व मल्ल या दैत्यांचा वध करण्यासाठी निघाले. त्यांच्या सोबतीला गजानन व कार्तिकेय होते. घनघोर युध्द होऊन मणी व मल्लाचे पारिपत्य केल्यामुळे ऋषीमुनी सुखावून गेले. त्यांनी मार्तंड भैरावास विनंती केली, ज्या ठिकाणी या दैत्यांचे निर्दालन झाले, तेथे कायमस्वरुपी वास्तव करावे.यामुळे भक्तजनांच्या मनी आपले अस्तित्व राहून ते निर्धास्तपणे आपले जीवन जगतील. या विनंतीला मान देऊन मार्तंड भैरवाने लिंगरुपे निर्माण केली. तिच तिथी म्हणजे आजची मार्गशीर्ष शुध्द षष्ठी वार रविवार नक्षत्र शततार का होते. ऋषीमुनींनी त्या दोन लिंगाजवळ वैरामुर्ती मल्हारी तयार केली. तसेच खंडोबाचा विवाह म्हाळसा बरोबर झाला. आजही वाघ्या मुरळीला दैवत मानून त्यांचे दर्शन घेते जाते. जागरणात म्हाळसा, बानूला मान, मान्यता देतात. खंडोबासाठी भंडार तळी भरणे, नैवेद्याचे विशेष महत्व आहे. वांग्याचे भरीत व बाजरीची भाकरी हा नैवेद्य बनवितात व संपूर्ण घरादारात त्याचे सेवन चंपाषष्ठी या दिवशी करतात. या चंपाषष्ठीलाच सातारा छत्रपती संभजीनगरात मोठी यात्रा भरते.

परंतु काही अंधश्रध्दा माननाऱ्या मानव जाती जमाती जिभेचे चोचले पूर्ण करण्यासाठी अन्य जामतींनी खंडोबास मांसाहाराचा नैवेद्य चालतो म्हणून बोकड, कोंबडे यांचे बळी देण्याची प्रथा सुरु केली. तसे पाहिले तर वास्तविकपणे मांसाहाराचा नैवेद्य कोणत्याही देवी देवतांस चालत नाही. तसेच कोणत्याही पोथी पुराणात आढळून येत नाही. अंधश्रध्देपायी माणसांनीच या प्रथा चालु केल्या. तरी या प्रथा-कुप्रथा मोडीस निघणे फार गरजेचे आहे. प्रसाद म्हणून कोंबडे, शेळया, मेंढया, बोकड या मुक्या प्राण्यांचा बळी का द्यायचा ? याचाही विचार प्रत्येकाने करावा. तुम्ही इतर फलहार शाखाहाराचा नैवेद्य दाखवू शकतात, हाच खंडोबारायाचा मान आहे. वांग्याचे भरीत, बाजरीची भाकरी आहे. सातारा स्थित छत्रपती संभाजीनगरचे मंदिर ४०० ते ४५० वर्षापूर्वीचे खंडोबा मंदिर आहे. मंदिराच्या आतमध्ये सातत फुट लांबीची एक जुनी तलवार आहे. या मंदिराचा जीर्णोध्दार हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी केलेला आहे. याच दिवशी जेजुरीला मोठी यात्रा भरते. तरी प्रति जेजुरी म्हणून या सातारा, छत्रपती संभाजीनगरच्या यात्रेला विशेष महत्व आहे.

# तुमचं कार्य चांगलं असायला हवं ?

आधुनिक केसरी

**अलिकडील काळात वास्तविकता पाहिली जात नाही. तसं पाहिल्यास वास्तविक गोष्टी केल्या जात नाही आणि अपेक्षा भरपूर बाळगल्या जातात. शिवाय स्वतः कोणतीच गोष्ट न करता दुसऱ्यावर अवलंबून राहिलं जातं. याबाबतीत एक प्रसंग असा आहे. या ट्युबवर एका अधिकारी साहेबानं शेअर केला आहे. बावडेवाडीची शाळा. त्या शाळेत शिक्षकाची सहल गेली. ते शिक्षक बऱ्याच लांबून त्या ठिकाणी तीन चार हजार रुपये लावून गेले. तशी त्यांनी शाळा पाहिली. तशी ती शाळा चांगलीच आहे आणि लोकांचे डोळे दिपवणारी व त्यांना हेवा सोडणारी आहे. ती आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा असून आज तो आपल्या महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय स्तरावरील शाळा करण्याचा पहिला प्रयोग आहे.**




शिवाय तशा प्रकारच्या शाळा असतीलही बऱ्याच. परंतु काही लोकं असे असतात की जे दाखवत नाहीत, करतात. फरक एवढाच की ते प्रकाशझोतात येत नाहीत. येवू पाहात नाहीत. अन् इथं तर खाजगी शाळेचा संस्थाचालक त्यांना वर येवूही देत नाही. असे बरेच शिक्षक आहेत की ज्यांच्या चवथीच्या वर्गात काही मुलांना अस्खलितपणे वाचता येतं व आठवी नववीच्या विद्यार्थ्यांना अस्खलितपणे बोलता येतं. तशा शहरी भागातही नावाजलेल्या शाळा आहेतच. ती बावडेवाडीची शाळा. ती पाहताच भारावलेला एक शिक्षक. तो शिक्षक त्या शाळेतून भारावून गेला व त्यानं ठरवलं की आपणही आपली शाळा तशाच धर्तीवर तशाच स्वरुपाची बनवावी. त्या शाळेनं अंगणवाडी शाळेला जोडली काय? आपणही जोडावी. असा विचार करुन तो गावच्या शाळेत गेल्यावर अंगणवाडी सेविकेकडे गेला. त्यानंतर तिनं बोलतांना आढेवेढे घेत नकार दिला. त्यानंतर तो गावातील प्रशासनाकडे गेला. त्यांनीही आढेवेढे घेत नकार दिला. तसं पाहता एखादा चांगलं काम करीत असेल तर त्याला लोकं पुर्वी वेडेच समजतात. जसं थॉमस अल्वा एडीसन वा त्या काळातील तत्सम शास्त्रज्ञ. आज त्यांची इज्जत नाही तर त्यांनी केलेल्या संशोधनानं लोकांनी त्यांना डोक्यावर उचललं आहे. तो ध्येयवेडा शिक्षक निराश झाला व शेवटचा पर्याय म्हणून तालुक्याला गेला. तेथील अधिकाऱ्याला भेटला. त्यांनी सांगीतलं की सदर शिक्षकानं आपला नाद सोडून द्यावा. मग काय, सदर शिक्षक एवढा निराश झाला की त्यानं आपला विचार त्यागला. त्याला ज्या गोष्टी करायच्या होत्या. त्या गोष्टीबद्दल त्याच्या मनात तिटकारा निर्माण झाला. त्यातच त्या गोष्टीचं नाव जरी कोणी काढलं तरी त्याला महाभयंकर राग आला. समाजाचं असंच रुप आज पाहायला मिळतं. जो करतो, त्याला कोणीच कोणते कार्य करु देत नाहीत. अडवतात. तसं पाहिल्यास कोणी सहकार्यही करीत नाहीत. तरीही त्यावर कोणी मात करुन ते कार्य केल्यास त्याचा द्वेष करतात व त्याचे पाय ओढतात. याचाच अर्थ असा की आपणही करीत नाहीत व कोणी करीत असल्यास त्यालाही करु देत नाहीत. कोणतेही कार्य, ते कार्य प्रभावी घडावं म्हणून चार पायऱ्या आहेत. पहिली पायरी स्व पातळी, स्वपातळी म्हणजे स्वतः कोणाकडून अपेक्षा न करता कार्य करीत राहणे. जेणेकरुन ते कार्य पाहून दुसरा प्रेरीत होईल व दुसरा ते कार्य करु शकेल. दुसरी पायरी समाजपातळी, आपण केलेले कार्य समाजाला आपोआपच दिसेल व त्या कार्यासाठी लागणारं सहकार्य समाजाकडून मिळवता येईल. तिसरी पातळी भौतिक पातळी, की जी समाजसहकार्यातून साकार करता येईल व चवथी पायरी आहे प्रशासन पातळी. ज्याची आपोआपच सरकार दखल घेईल किंवा सरकारकडून मदत मिळवता येईल.

वरील बाबींचं उदाहरण बाबा आमटे वा सिंधूताई सपकाळचं देता येईल. तसंच काल ज्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलं, त्यांचंही देता येईल. त्यांनी सुरुवातीला स्वतःपासून सुरुवात केली. मगच समाजानं त्यांना सहकार्य केलं. त्यानंतर भौतिकता आली व प्रशासनाचं सहकार्यही. एडीसनचं उदाहरण दिल्यास तो स्वतः प्रयोग करायचा. कोणाचंच सहकार्य घ्यायचा नाही. जशी प्रयोग करतांना आपल्याच शेतातील धानाची गंजी पेटवणे. त्यानंतर घरुन वडीलांनी त्यांना हाकलून देणे. पुढे छंद जोपासत आगगाडीवर पोट भरण्यासाठी वस्तू विकल्या. त्यानंतर आगगाडीच्या डब्यात प्रयोग करीत असतांना पिवळा फॉस्फरस सांडला व आगगाडीला आग लागली. ह्या सर्व गोष्टी त्यानं स्वतः केल्या. सर्व त्रास सहन करुन. आज त्याचं संशोधन समाजानं स्विकारलं. आज आपण एक सेकंदही विना लाईटनं राहू शकत नाही. हा लाईट शोधला त्यानं. आज त्याला समाज चाहतो. त्या लाईटच्या उत्पादनासाठी भौतिक साधनात मोठमोठे कारखाने उभारले गेले आहेत. तसंच आज प्रशासनही या लाईट उत्पादनावर विशेष लक्ष देत आहे. महत्वाचं सांगायचं झाल्यास कोणतेही कार्य करतांना ते कार्य स्वतःपासून सुरु करावं. त्यासाठी ज्या गोष्टीवर प्रयोग करायचा आहे, त्या गोष्टीला समजून घ्यावं. त्याचे होणारे विपरीत परिणाम लक्षात घ्यावे. त्यातच ते परिणाम लक्षात घेवून कार्य करावे. तेव्हाच समाजाचं सहकार्य प्राप्त करता येईल.

तसं पाहता समाज सहकार्य करेल. परंतु त्यासाठी आपलंही कार्य तेवढंच तोलामोलाचं असायला हवं. सिंधूताईनं स्वतः सुरुवात केली आपल्या कार्याची. मगच समाजानं सहकार्य केलं. त्यानंतर प्रशासन व इतर गोष्टी आल्या. डॉ बाबा आमटेनं स्वतः सुरुवात केली. मग त्यांची दखल घेवून त्यांना रमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला. त्यानंतर समाजही सोबतीला आला व देशानं त्यांची दखल घेतली. विशेष म्हणजे कोणतेही कार्य करीत असतांना आपण कोणी मदत करेल, कोणी आपली दखल घेईल यावर विसंबून राहू नये. कारण हे जग स्वार्थी जग आहे. ते स्वार्थीपणानं वागणारच. म्हणून आपण तेच लक्षात घेवून त्याप्रमाणेच वागावं. म्हणजेच तुम्हाला चांगलं कार्य करता येईल व तेच तुमच्या हातून चांगले झालेले कार्य उद्या समाजालाही पसंत पडेल. तेच कार्य पुढं प्रशासनालाही. परंतु त्यासाठी तुमचं केलेलं कोणतंही कार्य हे चांगलं कार्य असायला हवं. तरंच समाज स्विकारतो.

यात दुमत नाही.

अंकुश शिंगाडे, नागपूर
९३७३३५९४५०

# मनाची मशागत गरजेची



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**गेल्या दोन दशकांचा काळ झाला. अर्थात वीस वर्षांचा काळ जर आपण बघितला तर यात आमूलाग्र परिवर्तन झालेल आपण पाहतोय. प्रचंड औद्योगिक विकास, तंत्रज्ञानात झालेला बदल, वाहतूक व दळणवळणाच्या साधनात झालेला बदल, भौतिक साधन सामुग्री यात झालेली क्रांती , सामाजिक बदल, राहणीमानात झालेला बदल , वैचारिक बदल हे सगळं आपण पाहतोय , अनुभवतोय. गाव खेड्यातही आज हे बदल पोहोचलेले आहेत. हे सगळे एका बाजूला होत असताना दुसऱ्या बाजूला माणसा माणसातही खूप बदल झालेले आपण पाहतोय. राग ,द्वेष, लोभ, मोह, असुया, मत्सर, जळफळाहट, वैर भावना, दुराचार हे आणि अस बरच काही आपण इतक्यात सातत्याने वाढलेले पाहयोय.**

हे असं का होतंय ? याचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते . ती हे की, इतक्यात आपण आपल्या मनावर मशागत करणं जवळ जवळ बंदच केलंय. हो. मनाची मशागत ही आज या बदलत्या काळची गरज झाली आहे. आधी कुटुंबामध्ये जो मोकळेपणा होता , तो मोकळेपणा आज राहिलेला नाही. मनाची जी मशागत आधी घराघरात होतहोती ती आता होत नाही हे तेवढंच खरंय. मनावर होणारे संस्कार, विचारांना मिळणारी दिशा हे सगळं आता बंद झालंय. कारण भौतिक सुख समृद्धी मिळविण्यासाठी आता आई वडील दोघंही घराबाहेर पडायला लागलेत. आणि मुला बाळांवर होणारे संस्कार आता आधीसारखे होत नाहीत. आजी आजोबांच्या गोष्टी आता कानावर पडत नाहीत. काळ बदलला तसा खेळण्याचे साधन बदललेत आणि आता मैदानावरचे खेळच बंद झाल्याने मुलांना बाहेर खेळण्याचे वैयक्तिक फायदेही मिळत नाहीत. आणि यातूनच मनावर होणारे संस्कार आता बंद झालेत. आणि म्हणूनच मग आता मनाची मशागत करण्याची गरज अधिकाधिक भासू लागली. मग आता ही मनाची मशागत कशी करायची हाही प्रश्न समोर येतो. खरं तर मनाची मशागत करायला



सगळ्यात पहिली गोष्ट करायची आहे ती म्हणजे स्वतःसाठी वेळ काढणे. खरंतर ही गोष्टच आज कालबाह्य झाल्यासारखी झाली आहे. कारण आपण भौतिक साधनांच्या पाठीमागे इतके धावायला लागलोय की आता स्वतःसाठीचा वेळ काढायचा कसा ही एक समस्या म्हणून या काळात समोर उभी राहते आहे. आणि म्हणूनच मनाच्या मशागतीसाठी पहिली सुरुवात करायची असेल तर आधी स्वतःसाठी वेळ काढायला शिकावे लागेल. आणि त्यासाठी सगळ्यात पहिले आपल्याजवळ असलेल्या वेळेचं नियोजन आपल्याला कराव लागेल . कारण आपण जर वेळेचे नियोजन केलं नाही तर आपल्याला स्वतःसाठी चा वेळ काढता येणार नाही. एकदा का स्वतःसाठी वेळ काढायला लागलो की नाही की मग सगळ्यात चांगली गोष्ट ही घडायला लागते की आपण आपल्या मनाकडे लक्ष द्यायला लागतो. स्वतःकडे लक्ष द्यायला लागतो. आणि मग विचार करणं सुरू होतं. एकदा का विचार करायला लागलो की मग काय करायचं हा प्रश्न आपोआपच समोर उभा राहतो . इथून खरंतर मनाच्या मशागतीची पहिली पायरी सुरू होते आणि मग हळूहळू आपल्याला आपलीच दिशा कळायला लागते .मग विचारांना दिशा द्यायची म्हटलं की विषय येतो तो काहीतरी वाचण्याचा , पाहण्याचा , ऐकण्याचा. पण यात महत्वाची भूमिका पार पडते ती पुस्तकं. हो पुस्तकांचं वाचन, पुस्तकांची निवड , ती पुस्तक वाचणं आणि वाचलेल्या पुस्तकावर विचार करणं, मंथन करणं, मित्रांमध्ये चर्चा करणे आणि या चर्चेतून आपल्या विचारांना दिशा देणे हे खूप गरजेचे आहे जे आज होताना दिसत नाही. आणि यातूनच मग राग करणे, एकमेकांची असूया, एकमेकांचा मत्सर करणं आणि स्वतःच्याच मनाची जळफळाट करून घेत स्वतःला त्रास करून घेणे हे सगळं आपल्याही नकळत आपल्या सोबत घडायला लागतं. यातून काय होतंय ? तुमची चिडचिड वाढली , तुमच्या मनाचा त्रागा वाढला, तुमचं तुमच्या डोक्यावरच नियंत्रण सुटलं, तुमची विचारांची दिशा भरकटली आणि मग यातून पुढे नको त्या गोष्टी घडायला लागल्या आहेत. ज्या आज आपण दररोजच्या वर्तमानपत्रात पाहतोय, दररोजच्या बातम्यांमध्ये पाहतोय, आपल्या अवतीभवती या घटना या गोष्टी आपण सातत्याने पाहत आलो आहे. या सगळ्यांचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती हीच की योग्य वेळी योग्य पध्दतीने मनाची मशागत जर झाली असती तर कदाचित या गोष्टी ज्या आज आपण आपल्या अवतीभवती पाहत आहोत त्या घडल्या नसत्या. किंवा किमान आपल्या बाबतीत तरी आपण स्वतःपुरता का होईना आत्मिक शांती, मनाचे समाधान ,जगण्याची समृद्धता सहज मिळवू शकलो असतो. काहीतरी चांगलं ऐकायला आपल्या जवळ आज वेळ नाही. खरं तर चांगलं संगीत हे सुद्धा मनाच्या मशागतीच्या एक चांगला साधन आहे. पण हे संगीत ऐकायला सुद्धा आपल्याकडे आज वेळ नाही. चांगलं निवांत पाहायला वेळ नाही. चांगल्या स्थळावर जाऊन वेळ घालवणे, तिथून नवीन प्रेरणा घेणे यांनी सुद्धा मनाची मशागत होत जाते. पण हे सगळं सोडून आपण ना नुसतं धावतोय. हे धावणं आता कुठेतरी थांबायला हवंय. एकदा का मनाची मशागत करायला लागलो ना की म जगण्याची दिशाच बदलते . लोक काय म्हणतील हा विचार दूर होत जातो. स्वतःच्या मनाचं ऐकायची सवय लागते . नी म वाचलेल्या पुस्तकातील विचारांनी , ऐकलेल्या गाण्यांच्या सुमधुर सुरांनी जगण्याची एक नवी दिशा मिळायला लागते.

ही दिशा मिळणे हेच मनाच्या मशागतीच ध्येय. म्हणून स्वतःसाठी वेळ काढा , मिळालेल्या वेळेचा स्वतःसाठी उपयोग करायला शिका. आणि हा वेळ आपल्या मनाच्या मशागतीसाठी द्यायला शिका. जगणं तुमचही समृद्ध होईल. बॉक्स : - विक एन्ड सेलिब्रेशन च्या काळात स्वतःसाठी वेळ देणं ही आज एक नवी समस्या उभी ठाकली आहे. ही गरज का आणि कशासाठी याचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा मनाची मशागत हा विषय माझ्या मनात आला . आणि बदलत्या जिवन शैलीत मनाची मशागत का आणि कशी करायची यावर लिहावं अस मनापासून वाटलं नी लिहायला लागलो.

# मदतीचा संस्कार रुजवणारा कथासंग्रह - मदतीचा हात



गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**बालसाहित्यात काव्यकोडी, बालनाटिका, बालकविता, बालकथा इत्यादी साहित्य प्रकारांतून मुलांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या लेखिका, कवयित्री ज्योती कपिले यांचा "मदतीचा हात" हा बालकथा संग्रह अलीकडेच प्रकाशित झालाय. कथा हा साहित्यप्रकार बालकांच्या अगदी आवडीचा साहित्य प्रकार आहे. लहान मुले आजी - आजोबा, आई- बाबांकडे कथा, गोष्ट ऐकवण्याचा हट्ट धरतात.**




अशा बालकांना कथा ऐकवल्या की त्यांची मनशांती होते. बालपण हे संस्कारक्षम असते. बालपणात रुजवलेल्या गोष्टी आयुष्यभर विसरत नाहीत. लेखिका ज्योती कपिले यांच्या "मदतीचा हात" या नव्याकोऱ्या कथासंग्रहातील बालकथा अगदी तशाच आहेत. मुलांच्या दैनंदिन व्यवहारातील गोष्टींतून मुलांमध्ये मदतीचा संस्कार रूजवण्याचा त्यांचा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहे.

ज्योती कपिले यांच्या या कथा संग्रहात एकुण सहा कथांचा समावेश आहे. कथासंग्रहातील पहिली कथा "पूर्णब्रम्ह" ही मुलांना जेवणातील विविध पदार्थांचे महत्त्व पटवून देणारी आहे. सोबतच जेवणापूर्वी श्लोक म्हणणे, ताटात वाढलेले सर्व पदार्थ आवडीने खाणे, जेवताना टिव्ही बघू नये अशा गोष्टी मुलांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न या कथेतून केला आहे. सुट्टीत मामाच्या गावाला आलेला आदित्य, विनय, सई, श्रेया या नातवंडांना आजी जेवनापूर्वी "वदन कवळ घेता" हे श्लोक म्हणायला सांगते. जेवणात मेथीची भाजी बघून किरकिर करणारा आदित्य, कारले न खाणारा विनय यांना आजी अन्नातून मिळणारी जिवनसत्वे सांगते. चौरस आहाराच्या महत्त्वासोबतच, अन्न हे पूर्णब्रम्ह असल्याचे मागी मुलांना पटवून सांगते.

"मदतीचा हात" या शिर्षक कथेतून मुलांवर इतरांना गरजेच्या वेळी मदत करण्याची शिकवण मिळते. भोपळ्याची भाजी आवडत नाही म्हणून जेवायला नको म्हणणारा राहुल आईसोबत मंदिरात जातो. तिथे परिसरातील भिकाऱ्यांना त्यांची आई जेवणात भोपळ्याची भाजी वाढते. सर्व भिकारी मिळेल ते अन्न खाताना बघून त्यांच्या मनात असलेला भाज्यांविषयीचा तिटकारा कुठल्या कुठे पळून जातो. "आनंद" या कथेतून भेटणारा अक्षय त्याच्या आल्हाड सरांनी 'देणाऱ्याने देत जावे" या कवितेच्या ओळीतून घेत्याकडून देते व्हावे हा संदेश खूपच मोलाचा आहे. सरांच्या शिकवणीतून अक्षय आपल्या वाढदिवसाचा केक न कापता "आधार" या अनाथाश्रमातील अनाथ मुलाचा वाढदिवस साजरा करण्याचा निश्चय करतो. आपला आनंद दुसऱ्यांसोबत वाटण्यात खरा आनंद असतो. याची जाणीव आनंद ही कथा वाचल्यावर वाचकाला होते. आपली जूनी खेळणी दुसऱ्याच्या गच्चीत टाकणारा सचिन "खेळणी" या कथेत वाचकांना भेटतो. तो जुनी खेळणी बेपर्वाईने, आईला न सांगता राधिकाच्या गच्चीत कचरा म्हणून टाकून देतो. आपल्याला खेळणी नको असतील तर ती गरजू मुला-मुलींना देता येवू शकते असा विचार पेरणारी राधिका वाचकाला आपल्यातलीच एक वाटून जाते. "शेफ सोहम" ही कथा आईला स्वयंपाकघरात मदत करत करत स्वतःच सॅंडवीच बनवायला शिकणाऱ्या सोहम आणि त्याची बहीण सिद्धी यांच्या स्वावलंबी शिक्षण घेण्याची गोष्ट वाचकाला या कथेत वाचायला मिळते. "भाजीचं गणित" या कथेत बटाटे खावून वैतागलेला मयूरेश त्याची आई आणि हातावर पोट असलेली भाजीवाली वाचकाला अंतर्मुख करून जातात. सततच्या पावसामुळे महागलेल्या भाज्या, त्यात मयूरेशचे हे नको ते नको यामुळे वैतागून आई मयुरेशला बाजारात घेऊन जाते.

ज्योती कपिले यांचा हा छोट्यांसाठीचा कथा संग्रह आजीच्या गोष्टींप्रमाणे संस्कारक्षम कथांनी सजलेला आहे. या कथा मुलांच्या अवतीभवती आणि मुलांच्या प्रत्यक्ष जीवणात घडणाऱ्या असल्यामुळे त्या वाचकांना आपल्या वाटतात. या कथासंग्रहाची निर्मिती जे के मीडियाने अत्यंत दर्जेदार अशी केली आहे. राधा गावडे यांनी केलेले पुस्तकाचे मुखपृष्ठ कथा संग्रहात डोकावणारं आहे. या कथा संग्रहाची पाठराखण बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी केली आहे. बालकांमध्ये मदतीचा संस्कार रूजवण्यात हा कथासंग्रह नक्की यशस्वी होईल हा विश्वास आहे.

पुस्तकाचे नाव - मदतीचा हात
बालकथा संग्रह
लेखिका - ज्योती कपिले
प्रकाशक - जे के मीडिया, ठाणे.
किंमत - ८० रू.

# गजल एके गजल



जयेश अ.माधव
संपर्क क्र. 9167710614

आधुनिक केसरी

**नुकताच 'दीवान-ए-एके' हा गजल संग्रह वाचनात आला. या गजल संग्रहाचे गझलकार एके शेख हे मराठी गझल वाङ्ग्यातले खूप अनुभवी वरिष्ठ गजलगार आहेत.दीवान म्हणजे उर्दूमध्ये गझलसंग्रह पण अशा गजलांचा संग्रह ज्यामध्ये उर्दू भाषेतील अलिफ बे पे ते पासून ए पर्यंत सर्व मुळाक्षरे वापरून प्रत्येक मुळाक्षराची रदीफ असलेली एक गझल असते, अशा गजलांच्या संग्रहाला दीवान असे म्हणतात.**




उर्दूमध्ये असे दीवान शंभरच्या वर प्रकाशित झाले आहेत.

पण मराठीत गजल समृद्ध होत असताना अशा प्रकारचा दीवान मराठी गजलेत आणण्याचे महत्त्वाचे काम ए के शेख साहेब यांनी केले आहे. मराठीतला सर्वात प्रथम दीवान प्रकाशित करण्याचा मान त्यांनाच मिळाला आहे. त्यांचा पहिला दीवान 'अमृताची पालखी' हा 2017 साली प्रकाशित झाला आणि आता दुसरा दीवान म्हणजेच 'दीवान-ए- एके' हा याच वर्षी फेब्रुवारी मध्ये प्रकाशित झाला.

'दीवान-ए- एके' या गझल संग्रहात म्हणजेच दीवान मध्ये वेगवेगळ्या वृत्तांमधील २०७ गजला आहेत. यातील अनेक गजलांना गजलनवाज भिमराव पांचाळे यांनी स्वरसाज चढवला आहे.सहज सोप्या भाषेतल्या या गजला वाचताना आपण स्वतःला हरवून जातो.ए.के.शेख साहेब हे गजलकार तर आहेतच पण ते मराठी छंदशास्त्राचे गाढे अभ्यासकही आहेत.

अमृताची अक्षयाची अक्षरांची पालखी
गजल हणजे गच्च ओल्या भावनांची पालखी
हीर रांझा कृष्णराधा मजनु लैला तर कधी
गजल मीरेच्या मनातिल यातनांची पालखी

देवप्रिया वृत्तातली ही गजल म्हणजे मानवी जीवनाची एक अनुभूती आहे. हे दाखवण्याचा प्रयत्न गझलकाराने केला आहे. गझल ही फक्त आनंदाच्या सणांची, प्रेमाची अनुभूती नसून विरहाची व्यथाही आहे. संपूर्ण गझल संग्रहात एक से बढ़कर एक गजला आहेत.

**आयुष्याशी अजून माझा करार बाकी**
**घटना काही घडून गेल्या थरार बाकी**
**असे शेर वाचणे म्हणजे आयुष्य पुन्हा नव्याने जगायची उर्मी देते.**

**डाव मित्राचेच होते नेमके**
**घाव मित्राचेच होते नेमके**
**मी मला माहीत होतो कोण तो**
**आव मित्राचेच होते नेमके**

ही गजल म्हणजे एक नमुना गझल आहे. या गजलेत रदीफ 'मित्राचे होते नेमके' एवढा मोठा आहे. फक्त काफीया साठीच शिल्लक जागा राहीली. त्या जागेत त्यांनी घाव,आव, गाव, गाव, नाम असे आद्य काफीया योजून खूपच अर्थबोध होईल अशी सुंदर गझल तयार केली आहे. अशी गझल वाचताना तंद्री लागल्याशिवाय राहत नाही.

**तू दिल्या जखमात मी हरवून गेलो**
**अन् तुला विसरायचे विसरून गेलो**
**पाहुनी वर्दळ तुझ्या घरची कितीदा**
**मी जसा आलो तसा परतून गेलो**

अहाहा..!! मंजुघोषा वृत्तातील ही गझल गझल नवाज भिमराव पांचाळे यांच्या आवाजात ऐकणे केवळ अमृतानुभवच!

'दीवान-ए-एके' मधल्या प्रत्येक गजलेला एक स्वतंत्र अस्तित्व आहे. नवीन गजल लिहायला शिकणाऱ्यांसाठी हे पुस्तक म्हणजे नजराणा आहे. प्रत्येक गजलेच्या सुरुवातीलाच त्यांनी वृत्ताचे नाव आणि लगावली दिली आहे. त्यामुळे गझल समजण्यास खूपच सोपी होऊन गेली आहे. पुस्तकाची प्रस्तावना डॉ.संदीप गुप्ते यांनी खुपच छान लिहिली आहे. ए के शेख साहेब यांच्या प्रदीर्घ अनुभवातून, सूक्ष्म निरीक्षणातून आणि विलक्षण प्रतिभेतून साकारलेला हा गजल संग्रह वाचणे म्हणजे मराठी गजल रसिकांसाठी ही पर्वणीच आहे.

आता तर फक्त मराठी गजलेचे दोनच दीवान प्रकाशित झाले आहेत आणि ते दोनही दीवान एके यांच्याच नावावर आहेत यापुढे भविष्यात मराठी गजरलेचे असे अनेक दिवाण प्रकाशित होतील. एके शेफ साहेब यांच्याकडून प्रेरणा घेऊन मराठी गजले अधिकाधिक दिवाण प्रकाशित व्हावेत आणि मराठी गझल समृद्ध व्हावी हीच अपेक्षा.

# स्वच्छतेचे प्रसारक आधुनिक संत गाडगे महाराज



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**विज्ञान आणि स्वच्छतेचे प्रसारक आधुनिक संत गाडगे महाराज ३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेंडगाव ता. दर्यापूर, जि. अमरावती या गावी झिंगराजी व सखुबाई जानोरकर या परीट समाजातील गरीब माता-पित्याच्या घरी जन्म घेतलेला डेबू, मोठेपणी लोकसंत गाडगेबाबा म्हणून ओळखले गेले. वयाच्या आठव्या वर्षी पितृछत्र हरवले आणि सखुबाई व डेबू यांच्यासमोर दुःखाचा डोंगर उभा राहिला. त्यानंतर दापुरा या गावी ते त्यांचे मामा चंद्रभान यांच्याकडे राहायला गेले. तेथे ते मामाची जनावरे घेऊन रानात जाऊ लागले. लहानपणी गोठा साफ करण्यासाठी हाती घेतलेला खराटा पुढे त्यांची ओळख ठरली. गावात गावकऱ्यांसोबत भजन म्हणण्याची डेबूला आवड निर्माण झाली. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. प्राण्यांची हत्या करणे त्यांना पसंत नव्हते.**

हळूहळू त्यांच्या विचारांचा प्रभाव गावातील तरुण गटावर पडू लागला. भजनी मंडळेही डेबूजी भजनी मंडळ म्हणून ओळखले जाऊ लागले. भजनात देवकीनंदन गोपाळाचा सूर गुंजू लागला.

भजन सप्ताहात दलितांना मिळणारी उपेक्षित वागणूक व उष्टे अन्न या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी दलितांना एकाच पंगतीत बसवून सहभोजन घडवून आणले. त्या काळात हे मोठ्या सामाजिक क्रांतीचे पाऊल उचलले गेल्याचे इतिहासात नोंदवले गेले आहे. वयाच्या सोळा-सतराव्या वर्षी धनाजी खारकर यांच्या कुंती नावाच्या मुलीगी डेबूचा विवाह झाला व त्यांच्या गृहस्थाश्रमास सुरुवात झाली. पुढे चंद्रभान मामाचा मृत्यू झाल्यावर संसाराची सर्व जबाबदारी डेबूवर पडली. तिकडे सावकाराच्या सावकारी पाशाला विरोध करुन डेवूने स्वतःला अन्यायाविरुद्ध उभा राहणारा तरुण म्हणून समाजात नावलौकिक मिळविला. त्यांना मुलगी झाली, तेव्हा मटण व दारु अशा मेजवानीसह बारसे न करता शाकाहारी पद्धतीचे जेवण त्यांनी दिले. समाजबाधंवांना हात जोडून मटण व दारुमुळे आपण आपला संसार कसा नासवतो ते समजून सांगितले. अशाप्रकारे त्यांची विचारसरणी पंचक्रोशीत प्रभाव करु लागली होती. दौलतगिरी या गोसाव्याला गुरु केल्यानंतर गुरुच्या व्यसनाची माहिती मिळताच त्यांनी दौलतगिरीचे शिष्यत्व नाकारले. लोकहिताची कामे व अडचणी सोडविणे या कामामध्ये व्यस्त असलेल्या डेबूला लोक देवीसिंग या नावाने ओळखू लागले. माणसाला माणूस म्हणून कसे जगात येईल, त्याच्यासाठी काय करता येईल, या विचारांनी गाडगे महाराज सतत विचारात मग्न राहू लागले. अशातच तीन महिन्यांची गर्भवती पत्नी, मुली अलोका, कलावती यांना सोडून त्यांनी अंगणातील खापराचे गाडगे च अंगावरील वस्त्रानिशी घरदार सोडले व समाजाच्या हितासाठी भटकंती स्वीकारली ती कायमचीच. लोकोद्धारासाठी तथागत भगवान बुद्धाप्रमाणे घरदार सोडलेल्या डेबूला लोक गाडगेबाबा, गाडगेमहाराज या नावाने ओळखू लागले. ऋणमोचन गावच्या यात्रेत कुंतीबाईनी मंदिराचा रस्ता साफ करणाऱ्या गाडगे महाराजांना मुलाच्या जन्माची बातमी दिली व घरी परतण्याची गळ घातली पण लोक उद्धार हेच आपले जीवनध्येय मानून त्यांनी घरी परतण्यास नकार दिला. जवळपास १९०५ ते १९१७ या कालावधीत गाडगेबाबा सतत फिरत राहिले. त्यांनी भीक मागून जेवण केले. अंगावर फाटक्या चिंध्या पांघरल्या, झाडाखाली झोपले. महाराष्ट्राला ओळख होईपर्यंत त्यांनी खडतर आयुष्य उपभोगत गोरगरिबांच्या समस्या जाणून घेत भटकंती केली. हळूहळू गाडगेमहाराजांची कीर्ती सर्वत्र पसरु लागली. त्यांच्या मागे मीठा समाज उभा राहिला. त्यांची स्वच्छता मोहीम एकट्यापुरती मर्यादित राहिली नव्हती, त्यात लोकही सहभागी होऊ लागले. दिवसा हातात खराटा घेऊन गाव स्वच्छ करणारा व चार दोन घरी शिव्याशाप ऐकत भीक मागणारा हा फकीर रात्रीच्या कीर्तनामुळे गावातील लोकांचा जननायक होऊ लागला. प्रसंगी दगडांचा चिपळ्याप्रमाणे वापर करणारा हा संत गावागावात लोककल्याणाचा संदेश पोहचवू लागला. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यास पाणी, मुला-मुलींना शिक्षण या शिकवणीसह नवस देवधर्माच्यामुळे आजारी माणूस बरा होत नाही तर तो औषधाने बरा होतो हा त्यांचा विज्ञानवादी उपदेशही गावागावात प्रभावशाली ठरु लागला. प्राणिहत्या करु नका, कर्ज काढून लग्न, जना करु नका. ही महत्वाची शिकवणही त्यांनी लोकांत रुजवली. ५ मे १९२३ रोजी कळले. कुत्रा रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण या गावी गाडगेमहाराज कीर्तनास गेले होते. कीर्तन सुरु करण्यापूर्वी त्यांचा मुलगा गोविंद मरण पावल्याचे वृत्त चावल्यामुळे चौथ्या वर्गातील हा मुलगा मेल्याचे वृत्त ऐकून गाडगेबाबा कीर्तनास उभे राहिले, ऐसे गेले कोट्यान् कोटी! काय रडू एकासाठी... अशी सुरुवात करून त्यांनी कीर्तन केले. कीर्तनाच्या माध्यमातून ते सारा महाराष्ट्र फिरले. समाजात वैचारिक क्रांती घडविली. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे चालविली, धर्मशाळा बांधल्या, वसतिगृहे सुरु केली. ऋणमोचन येथे चार घाटांचे बांधकाम, मूर्तिजापूर गोरक्षण संस्था, पंढरपूर धर्मशाळा, नाशिक, आळंदी, देहू, त्र्यंबकेश्वर, पुणे याठिकाणी धर्मशाळा अशी अनेक कामे करीत त्या काळात त्यांनी चौदा लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च केले, मात्र स्वतःचा फाटका वेश आणि गाडग्यात भिक्षा मागून आलेले अन्न यावरच त्यांचा चरितार्थ चालत राहिला. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शाळेचे अनुदान बंद झाल्यावर गाडगेबाबा तत्कालीन मुख्यमंत्री खेर यांना अनुदान सुरु करण्याविषयी बोलले व अनुदान सुरु झाले. सेवाग्रामच्या परिसरात महात्मा गांधी व गाडगेबाबांची भेट घडली. बाबांचे कीर्तन ऐकून महात्मा गांधी मंत्रमुग्ध झाले. संत चोखामेळा धर्मशाळा बांधून तिची व्यवस्था गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविली. डॉ. आंबेडकर व गाडगेमहाराज एकमेकांचा फार आदर करत. बाबासाहेब गाडगे महाराजांचे कीर्तन गर्दीत बसून ऐकण्यात धन्यता मानत. पुढे गाडगे महाराजांची प्रकृती साथ देत नव्हतीपण आंबेडकरांच्या मृत्यूच्या बातमीनंतर ते अधिकच अस्वस्थ झाले. १३ नोव्हेंबर १९५६ ला कैकाडी महाराजांच्या निमंत्रणावरुन पंढरपूरला केलेले कीर्तन अखेरचे कीर्तन ठरले आणि ६ डिसेंबर १९५६ ला डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर अवघ्या पंधरा दिवसात महाराष्ट्राने आपला थोर सुपुत्र गाडगेबाबांच्या रुपाने २० डिसेंबर १०५६ ला गमावला. गावाच्या पारावर आला कुणी झाडुवाला बाबासफाई करून पाराची घेतला गावाचा ताबा सांगा म्हणे, किती आहेत देव तुमच्या गावात खंडोबा, म्हसोबा, मरीमाय..लेक गुंतले नावात तोच सांगे मग वाजवून दगडाच्या चिपळ्या नाव अनेक तरी देव एकच आहे ना गड्या नशापाणी नका करू अन् नका पाहू जातपात.. नका देव वाटून घेऊ नका करू माणसाचा घात देवाच्या नवसासाठी तुम्ही कापू नका बकरू दवाखान्यातच बरं होईल आजारी लेकरू कर्ज काढून नका वाजवू गड्याहो लग्नाचे ढोल जत्राबित्रा पुरे करून जाणा शिक्षणाचे मोल पितर घालण्यापरी जित्या मायबापाला जपाहुंड्याच्या पैशान सजत नाही संसाराचा खोपा विचार देऊन निघे, कंबरेला झाडू बांधून कुणी पाया पडे नेमका गर्दीत संधी साधून फटकारे त्यास म्हणे, मी माणुसच आहे ना बाप्पा देवकीनंदन गोपाला म्हणून फक्त माणुसकी जपा आज आपण ग्रामस्वच्छता, परिसर स्वच्छता असे अनेक उपक्रम राबवतो. शासनही संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान राबवते. ग्रामसफाई, व्यसनमुक्त, अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडाविरोध यांचे पालन करणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली होय!

## !! व्यथा बळीराजाची !!



काय मी सांगु तुला आज
माझीच मला वाटे लाज
अरे शेतकरी मी कोरडवाहू
बंधा-याचं स्वप्न कशाला पाहू
ऐकत निळवंड्याच्या गोष्टी
आज मी गाठली एकसष्टी
विकासाची उलटी गटारगंगा
जनसामान्य झाला नंगा
पोरांनां शहराचा सोस
अहो गावं पडली ओस
गावात माणसं राहीना
शहरात आसरा मिळेना
बुढ्याला पोरांच्या लग्नाची चिंता
त्याची गालफडं बसली आता
पहिल्यासारखं पिकत नाही,
पिकलं तर मग विकत नाही.
दलालांच्या हाती सगळ्या नाड्या
त्यांच्या दारात लाखोंच्या गाड्या
शेतीकर्जाच्या दुष्टचक्रांना,
आणि सामाजिक समस्यांना
लाखो शेतकरी आत्महत्यांना
कृषिप्रधान देशात उत्तरंच नाहीना
आता बहुधा हे शेवटच्या
पिढीचे शिलेदार असतील
यांच्या नंतर कोण
मातीत हात घालतील
यापुढे भविष्यात कोण
आणि काय पिकवतील?
पिकलंच नाही शेतात तर
कुणास ठाऊक काय खातील?
नुसत्या नोटांनी भूक कशी भागेल
उशिरा जेव्हा जगाला उमगेल
तेव्हा फार उशीर झालेला असेल
बळीराजाचं जीवन धोक्यात
असेल
आहेर वा.र. नासिक
मो.९९५८७८२९८२



## धुके व शेतकरी

आले धुके, वाढला शेतकऱ्याचा
तान दवाबिंदूंनी भरली, पिकाची
गच्च पोसलेली माळ.
मात्र शहरामध्ये तर वेगळेच चित्र
तिथे आवडते सगळ्यांना गुलाबी
थंडीची सकाळ. बघताच पिकाला
धुक्याने वेढलेले
वाढतात शेतकऱ्याचे ठोके हृदयाचे,
शहरामध्ये तर सकाळी फिरायला
जातात आणि घेतात फोटो त्याचे.
धुक्याच्या सकाळी शाळेत
जाण्याचे काम नाही
म्हणून विद्यार्थ्यांना येते खूप मजा,
पण त्यांना काय माहित
त्यांचा शेतकरी बाप भोगतोय
धुक्याची सजा. कधी धुके तर कधी
अवकाळी पाऊस पीक करपते,
होते त्याचे मोठे नुकसान
साऱ्या कुटुंबाचा भार त्याच्यावर
मग कसा नाही येणार त्याला ताण.
डोळे भरून येतात शेतकऱ्याचे
पाहून हा खेळ धुक्याचा,
पीक करपते,मग तुम्हीच सांगा
कसा जगेल हा पोशिंदा जगाचा ?
शेवटी हे निसर्ग चक्रच आहे
कोण काय करू शकेल याला,
पण निर्भयतेने उभा राहतो शेतकरी
त्याचे कष्ट कळले पाहीजेत जगाला
कु.वेदिका प्रकाश दांदडे.
रा.गोहोगाव दांदडे
(वर्ग 8 वा, सनराईज इंग्लिश स्कूल,
रिसोड)

## वार....

त्यांच्या साठी झिजलेला बाप त्यांना भार झाला
खंगलेला देह तरीही झोपेत त्याच्या वार झाला

शोधला मी वंश येथे झाकलेल्या विस्तवाचा
वेचिता मी तो निखारा फुंकताना गार झाला

अंतरीचा श्वास माझा तोडूनी तो जात होता
पाठलाग केला परंतु तो नदीच्या पार झाला

कमजोर तो शत्रु तरीही राज्य माझे जिंकले
सैन्य माझे पांगले अन् सेनापती ही ठार झाला

पाहुनी आलो मुकुट मी गाढवाच्या मस्तकी
वानराचा वंश पण अश्वावरी तो स्वार झाला

जाणुनी अवाक झालो माझ्या खुनाची योजना
सोयरा त्याच्यात माझा तो सुरी ची धार झाला

जिंदगी भर लावला मी जीव त्याच्या वर जरी
शोधतो मी आज आहे तो कुणाचा यार झाला ?
-बलराज संघई, 9420015108

## जातं

भारतीय संस्कृतीचे
प्राचीन वैभव होते
जात्याशी जीवाभावाचे
स्त्रीवर्गाचे नाते होते

जात्यावरी दळताना
भावना मनी दाटती
ओव्यांचे सुरेख स्वर
घराघरात गुंजती

संसाररूपी जात्यात
मन भरडून जाई
जात्यावरती सखया
दळताना ओव्या गाई

घराघरातलं जातं
अन्नपूर्णाचे प्रतिक
जोधळ्यांचे करी पीठ
आरोग्यदायी पोषक

यंत्रयुगात जात्याची
घरघर ना राहिली
आठवण ही जात्याची
मनी दाटून राहिली.....

- सुनिल माथने अकोला
मो.9403282970

## स्नेहर्णव

कुठल्याशा वळणावरी
नाती जुळतात,
मन तरंग होऊनी लाटेच्या
झुल्यावरी झुलतात.
दूर क्षितिजावर आठवणींचे
फुल होऊन फुलतात.
अन् मनाच्या अथांग सागरी
तुषार होऊन विसावतात.
अन् दूरच्या वाटेवर संधी
कालात लुप्त होऊ पाहतात.
नि मग कधीतरी केव्हातरी
दूरची वाट निशेत विरते जेंव्हा
जेंव्हा,
आठवणींचा हळवा काठ
अश्रूत भिजतो तेंव्हा तेंव्हा.
सौ. वैशाली इंदुमती जाधव -
महाडिक.
मो. क्र.- ९७६७४३७९२३



## अवकाळी

हल्ली कधीही येते टिपटिप पावसाची
अवकाळी उग्र होते झिमझिम पावसाची

यावे खुशाल त्याने शेतात उगवणीला
मग सर्वांना आवडते रिमझिम पावसाची

उन्हाळ्यात हिवाळा नि हिवाळी पावसाळा
मना असह्य होते गिचमिड पावसाची

बरसावे रात्रभर वरूनि धो धो उजाडराणी
दिवसा नकोच आम्हां चिकचिक पावसाची

कांदा,तुरी,गव्हाची आली रे पिके सुगीला
नुकसानदायी ठरते रिपरिप पावसाची

बिघडवून टाकले ते वक्र कालचक्र पावसाचे
का झोप मोडता हो निपचित पावसाची

रज्जाक शेख श्रीरामपूर
9665778558



## आठवणी

आठवणी उधळीत येती
भिरभिर लावून पंख
विस्मृतीच्या पटलावरती
होतसे विषारी डंख

अनाकलनीय ,गूढ जरी
हातावरली रेघ
अडवले तरी नयनातूनी
झरती काळे मेघ

रेशीमशाल नात्यांची होती
धागे का हे विरती?
क्रूर घाव देती जळजळीत
रक्ताची ही नाती

विकल हृदय हे माझे होता
श्रीहरीचा करते धावा
मन शांतविणारा ऐकू येतो
झुळूकीतून मधु पावा

- सौ.माधुरी म.इनामदार...
छत्रपती संभाजीनगर

## नातं

सांगुन तुला कधी कळणार
हाय.. नात म्हणजे एक शब्द
प्रेमाचा,.. दुसर असत तरी
काय ...
आपुलकी जिव्हाळा
सुखावतो मानाला
आज तोच निघाला .. त्यालाच
शोधायला....
शोध अवघड असला जरी,
त्याचा हट्ट हाय, नात म्हणजे
एक शब्द प्रेमाचा,..
दुसर असत तरी काय ...
तुझे तर शब्दच मुके
जणू माझीच वाट चुके या
निशब्द वाटेवर
खूप आहे अंधार दाट आहे
धुके,
तरी त्या वाटेवर एकटाच
बोलत चालणार हाय...... नात
म्हणजे एक शब्द प्रेमाचा,..
दुसर असत तरी काय ...
शब्दांच्या भावना
मी पहिल्या उदास होताना
देवाने अनलिमिटेड टॉक टाईम
दिला
पण बघितलं मी तो ही सेव
करताना ..... तरी वाट शब्दांची
मी बघणार हाय .. नात म्हणजे
एक शब्द प्रेमाचा,.. दुसर असत
तरी काय ...
किती सोपं असत IGNOR
करण
सहज हसून विषय बदलणं
बिझि तर सगळेच असतात
पण ती गंम्मतच वेगळी बिझी
असतांना ही बोलण... ते
समजायला... मन असावं अस
जशी दुधावरची साय
नात म्हणजे एक शब्द प्रेमाचा,..
दुसर असत तरी काय .... दुसर
असत तरी काय .........
अभय शेजवळ



## जगनाडे महाराज

जगनाडे महाराजांचे
कार्य जगी थोर
वाचून जीवनातील
मिटतात सारे घोर
माणसा-माणसात
नसावा भेदा भेद
जात,पात, धर्माचा
त्यांनी केला छेद
शिक्षणा शिवाय
जीवना नाही अर्थ
शिक्षणा विना
जीवन असे व्यर्थ
समाजात मानवतेचा
विचार त्यांनी आणला
मानवांच्या मनातील
द्वेष,मत्सर संपविला
जगनाडे महाराजांच्या
विचारांना स्वीकारू या
मानवी जीवनाचे
सदा भले चिंतू या
धोंडीरामसिंह
राजपूत, वैजापूर जि. औरंगाबाद
मो. ९४२१३१२२४४




## एकच मिशन, जुनीच पेन्शन



ही नवीन पेन्शन योजना
फसवी आहे, घातक आहे;
ती जुनीच पेन्शन योजना
सुरक्षित व फायदेशीर आहे.
आमच्या बेमुदत संपाला
तुम्ही 'संघटित दादागिरी' म्हणता;
राजकीय दबाव आला की,
विकाऊ पत्रकारिता करता.
एकदा निवडून आले की,
तुम्ही आर्थिक घोटाळे करता;
सात पिढ्यांची सोय करण्यासाठी
निष्पाप जनतेचे गळे कापता.
कोरड्या व फसव्या
आश्वासनांचा
तुम्ही बारमाही पाऊस पाडता;
आमची तहान-भूक
शमण्याआधीच
विकासाची नदी गायब करता.
पेन्शन जनक्रांती महामोर्चा
आणखी तीव्र करू
जुनी पेन्शन योजना सुरू झालीच
पाहिजे;
सामर्थ्य व ताकदीचे दर्शन घडवू
आमचा घास आम्हाला
मिळालाच पाहिजे.
एकच मिशन, जुनीच पेन्शन
जुनी पेन्शन योजना लागू करा;
एकच मिशन, जुनीच पेन्शन
अन्यथा खुर्च्या खाली करा...!
- मिलिंद हिवराळे
बार्शिटाकळी, जि. अकोला
भ्र. ७५०७०९४८८२
अखंड साहित्य चळवळ

## आयुष्याच्या प्रवासात

स्वप्नांत असंख्य असे,
विचार मनी दाटले,
उमलत्या कळी सारखे,
नकळत मन हे कसे बोलू लागले.

एकट्याने सुरू ह्या प्रवासात ,
कळते खऱ्या आयुष्याचे गणित ,
स्थिर ठेवावे मन आणि विचार,
मार्ग असंख्य राहते उभे पुढ्यात .

स्वप्नं स्वप्नांत न रहावे गुंतून,
घ्यावे बोध जरा वास्तव्यात राहून,
पात्र निरर्थक निमित्त्य मात्र असे ,
त्या मार्गे न ठेवावे पाउल कधीही चुकून.

असंख्य वाट्या ह्या आयुष्याच्या
विचार मनाचे ठेवावे न अस्थिर ,
मन, विचार असे जिथे शुद्ध त्यांचे,
प्रवास आनंदमय आयुष्याच्या वाटेवर.

-तुषार लाखे.
- वरोरा, जिल्हा चंद्रपूर.
-8600548913, 8482869843

## जगण्याला पंख फुटले...

साथ तुझी रे लाभता,
पंख फुटले जगण्याला...
क्षण फुलले रे माझे,
अर्थ आला जीवनाला...धृ

होते एकाकी एकटी,
भुक मजला मायेची...
सहवासे तुझीया रे,
कळी खुलली जाईची...
सुकलेली वेल आली,
तुझ्यामुळे बहराला...
क्षण फुलले रे माझे...१

तुचं भरल्या जखमा,
तूच लाविलास लेप...
तुझ्या प्रेरणेने सख्या,
घेते आभाळात झेप...
तूच आणले सत्यात,
माझ्या खुळ्या स्वपनाला...२
क्षण फुलले रे माझे,

तुच दिला रे विश्वास,
तुच कौतुकही केले...
माझ्या साऱ्या भावनांना,
जिवापाड रे जपले...
तुझ्यामुळेच चैतन्य,
माझ्या घर -अंगणाला...३
क्षण फुलले रे माझे...
-सौ. शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-
चोपडे, ९८२३०६६६०६




सौ. ज्योती संजय पाटील
ग्रंथपाल, छत्रपती संभाजीनगर.

# साताऱ्याचे श्री खंडोबा देवस्थान जेजूरीचे प्रतीरुप

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर हे जगातील एक सर्वाधिक वेगाने वाढणारे औद्योगिक शहर आहे. हे मराठवाड्याच्या व त्यासोबतच महाराष्ट्र पर्यटनाच्या राजधानीचे शहर आहे. छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये सातारा हे छोटेसे खेडे होते, परंतू आता ते महानगर पालिकेच्या हदिदत आले आहे. ते छत्रपती संभाजीनगर शहरापासून अवघ्या ८ कि.मी. अंतरावर आहे. सातारा हे अनेक वर्षापूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या दक्षिणेला उंच डोंगराच्या कुशीत आणि दाट झाडी मध्ये असलेले जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते.**

या ठिकाणी श्री खंडोबाचे भव्य हेमाडपंथी मंदिर आहे. महाराष्ट्राचे पूजनीय आणि लोकप्रिय दैवत असलेल्या खंडोबाचे जागृत देवस्थान सातारा येथे आहे. येथील खंडोबा यात्रा महादेवस्थान जेजूरी प्रमाणेच लोकप्रिय आहे. म्हणून याला जेजूरीचे प्रतिरुप मानतात. श्री खंडोबा दैवत जागृत, नवसाला पावणारे व सातारा परिसराला, छत्रपती संभाजीनगर शहराला भरभराट देणारे मानले जाते. शहराच्या दक्षिण भागात वसलेल्या आणि गेल्या झपाटयाने वाढलेल्या साता-यात येळकोट यळकोट जय मल्हार हा जयघोष घुमायला लागला आहे. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात या देवाचा मोठा उत्सव साजरा केला जातो. मल्हारी मार्तड, श्री खंडोबा हा संबंध राज्यातील अनेकविध जमातीचे श्रध्दास्थान, कुलदैवत म्हणुन हे खंडोबा देवस्थान प्रसिध्द आहे. श्री खंडोबा अनेक नावांनी पुजला जातो. त्यामध्ये मैलार, मल्हारी मार्तंड, म्हाळसापती, म्हाळसाकांत ही नावे सर्व परिचित आहेत. मल्हारी मार्तंड श्री खंडोबाचे महाराष्ट्रात ६ जागृत ठिकाणे आहेत. ५ ठिकाणे हे कर्नाटकात आहेत. **साता-याची भौगोलिक व ऐतिहासिक ओळखः**-शहराच्या मुख्य बसस्थानकापासून सूमारे ११ कि.मी. (दक्षिणेस) अंतरावर रमणिय सृष्टी सौदर्याने नटलेल्या डोंगर पायथ्याच्या खाली मध्यम उंची स्थानी सातारा हे ठिकाण आहे. अत्यंत वैभवशाली दिवस खेडे असतांना या गावाने उपभोगलेले आहेत. कारण सातारा निजाम राजवटीत जहागिरीचे मुख्य ठिकाण होते. हैद्राबाद संस्थानात (बारागाव) जहागिरी असलेले सातारा गाव गावकोटात सूरक्षित होते. दोन वेशी (तटबंदीचे मुख्य व्दार) असेलेल्या सातारा गावात जहागिर वाडा, न्यायमुर्ती कचेरी आणि इतर कारभारांचे एक चौक, दोन चौक असे भव्य वाडे होते. या चिरेबंदी वाड्यांमध्ये हैद्राबाद संस्थानच्या जहागिरीचा कारभार चालत असे. न्यायदान पासून टपालापर्यंत सर्व कामें इथून चालत असे. पूर्वी शके १४००ते १५०० दरम्यान मुळ खंडोबा देवस्थान हे साताऱ्याच्या दक्षिणेस असलेल्या मोठया डोंगरावर होते. हे स्थान आजच्या साताऱ्या पासून ५ कि.मी. अंतरावर आहे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार लोक उंच डोंगरावर सूरक्षित ठिकाणी आपली वसाहत करत होते आणि त्याठिकाणी आपल्या आराध्य देवतांची स्थापना करत असतं. आपले आराध्य दैवत हे बहूतेक ठिकाणी डोंगरावर किंवा किल्ल्यावर असल्याचे आपल्याला दिसून येते. जिथे जिथे लोकवस्ती तिथे तिथे आपले कूल दैवत, कूलस्वामिनी, पिर-पैगंबर यांची प्रतिष्ठापना ते लोक करत असत. त्यामुळे पूर्वीचे मूख्य खंडोबा देवस्थान हे डोंगरावर होते. आजही त्या ठिकाणी भग्नावस्थेत गवळी लोकांचे वाडे नामशेष होत चाललेले गोलाकार चौकोनी पाया भरणीचे दगड रांगेत लावलेले दिसून येतात. अगदी डोंगरात एका टोकावर भव्य काळया दगडावर कोरीव काम केलेले हेमाडपंथी पुर्वाभिमुख श्री खंडोबा मंदीर उभारलेले आहे. हे मंदीर एका चौथ-यावर चोहोबाजूनी दगडीकाम केलेल्या स्वरुपाचे आहे. त्याच ठिकाणी निवासी खोल्या जमिनदोस्त झालेल्या दिसतात. फक्त मुर्तीवरील कळसाचा भाग तेवढा शिल्लक आहे त्यावर देखिल काटेरी झाडे-झूडपे यांची वाढ झालेली दिसून येते. हे ऐतिहासिक मंदिर औरंगाबाद जवळील बोरसर येथील कूलकण्यांनी बांधल्याचे सांगतात. तर इ.स.१७६६ मध्ये अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे सांगितले जाते. परंतू मंदिराच्या अपूर्ण स्थितीमुळे बांधकाम अपूर्ण राहिले की त्याची हानी झाली याची माहिती मिळत नाही. मंदिराच्या गाभा-यात एका शिळेवर घोडयावर स्वार झालेले श्री खंडोबा दर्शविण्यात आलेले आहे. हे मंदिर कोणी कुठल्या काळात निर्माण केले याचा उल्लेख कोठेही आढळून येते नाही. वर्षातून एकदा पौष महिन्याच्या तिस-या रविवारी सातारा गावातून पठारावर पालखी (खंडोबाची) देव भेटीला जाते. या पालखी सोहळ्यात भाविक मोठया संखेने सहभागी होतात. श्री खंडोबा मंदिराच्या मागे साधारण ३० बाय ४० परिघात एक चिरेबंदी तळे आहे. हा अपूर्व ठेवा आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.



साता-याच्या या डोंगरामध्ये दोन लेण्या पहायला मिळतात. तर डोंगराच्या वरच्या बाजूला सासू- सूनेचे दोन तलाव आहेत. वरच्या एका लेणीमध्ये खंडोबाचे जाते आहे. त्या जात्यातून पूर्वी भंडारा पडत असत अशी अख्यायिका आहे. **खंडोबा मंदिराची माहिती :**सर्व सामान्यांचा देव म्हणजे खंडोबा. छत्रपती संभाजीनगर शहराच्या जवळ सातारा गावात खंडोबाच्या जागृत अकरा देवस्थानापैकी चौथे स्थान म्हणून ओळखले जाते. खंडोबा मंदिर डोंगराच्या पायथ्याशी आहे. पेशवे काळातील स्थापत्यशैलीचे अतिशय सूंदर मंदिर असून मराठा वास्तूशैलीतील विरांनी या मंदिराचे बांधकाम केल्याचे सांगण्यात येते. मंदिर परिसर हा गर्भग्रह, सभा मंडप, व भव्य प्रवेशव्दार यामध्ये विभागलेला असून एका उंच चौथ-यावर मंदिर



बांधलेले आहे. मंदीराच्या गाभाऱ्याखाली एक पूरातन बारब आहे तीला जाण्यासाठीचा रस्ता आता बंद करण्यात आला आहे. या वर्षीच्या परतीच्या पावसाने ही बारब पूर्ण क्षमतेने भरली आहे. त्यामुळे मंदिराच्या गाभाऱ्या खालून पाण्याचा पाझर वाहतांना आपणास दिसतो. प्रवेशद्वाराचे बांधकाम साधे असून मंदिरात प्रवेश करण्यासाठी आठ पाय-या आहेत. आवाराचा पूर्व दरवाजा मोठा असून दरवाज्यावर नगरखाना आहे. उत्तर बाजूला दिपमाळ तर मंदिराच्या पूर्वेस मंडपाचा चौथरा दिसतो. या चौथ-याच्या चारही बाजूच्या भिंतीचा तळ व मंडपाचे १९ खांबाचे तळ नजरेस पडतात. मंदिराचे बांधकाम अर्धवट झाल्याचे दिसते. मंदिरगाभारा बाहेरुन ताराकाकृती करण्यात आले आहे. मंदिरातील अर्धमंडपात वरच्या भागात गजलक्ष्मी, शिवशाई, विष्णू, आणि कृष्णाची सूंदर शिल्प कोरलेले आहेत. मुख्य गर्भगृहात जाण्यापूर्वी अंतराळ भागात दक्षिण दिशेला ब्रम्हाची उत्पत्ती व शिल्प मालिका कोरलेली आहे. त्याखालील अलंकार पटटी मध्ये पोपटपक्षाची अलंकृत असलेली शिल्प पटटी आहे. गर्भगृहाच्या मधिल भागात श्री मच्छ, श्री कच्छ, श्री वराह, श्री नरसिंह, श्री वामन अशा दहा विष्णू अवतार कोरलेले आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या लगाड बिंबा वर गणेश मूर्ती कोरलेली आहे. त्यावर नंदीवर बसलेले शिवपार्वतीची मूर्ती कोरलेली आहे. त्याच प्रमाणे राम- लक्ष्मण-जानकी , श्री महाविष्णू, श्रीकृष्ण, श्री पांडूरंग व कशकी कलियुग हे देखिल विष्णू अवतार दाखवले आहेत. उत्तर दिशेला श्रीकृष्ण लिला विणूधारी गाई गौळणी यांची शिल्पे कोरलेली आहेत. आपण मुख्य गर्भागृहात प्रवेश केल्यास घंटा नाद कानावर पडतो. तसेच पूढे गेल्यावर आपल्याला आपल्या कूल देवताचे दर्शन होते. खंडोबाची मूर्ती मध्यम उंचीच्या दगडावर विराजमान झालेली आहे. ती मूर्ती पाषाणाची असून त्याची ऊंची साधारण ३ फुट असल्याचे समजते. ती मूर्ती पूष्प, त्रीपूडगंध, बेल, भंडारा याने माखलेली असते. दूस-या बाजूला अभिषेकाची मूर्ती व महादेवाची पिंड आहे मूर्तीच्या उजव्या बाजूला घोडयावर स्वार झालेली मूर्ती आहे. या मूर्तीचे दर्शन घेतले की समोरचे दृश्य पहाताच या मल्हारी मार्तंडाला आपण खंडोबा का म्हणतो याचा उलगडा होतो. त्याच्या समोरच दिसते ती दूधारी जमदाड किंवा दूधारी खंडा-खड्ग (तलवार) या तलवारीची उं*ची साधारण ९ फुट आहे. या तलवारीचा आकार मुळापासून ते टोकापर्यत भाल्याच्या पात्याप्रमाणे आहे. प्रदक्षिणा घालत असतांना मंदिराच्या बाहय भागाचे कोरीव काम पहात पहात आपण दगडी दिपमाळे समोर येतो. ही दिपमाळ काळया पाषाणात असून त्याच्या दिवटया या हत्ती मूखासारख्या आहेत. व या दिपमाळेच्या बाजूला नगारखाना आहे. येथे यात्रा उत्सवात नौबत झडत असते. तेथे असलेल्या पिंपळाच्या झाडाखाली पहिले ओटा (पार) होता. त्याच्या बाजूला असणारे श्री गणेश व मारुतीचे दर्शन घेवून बाहेर निघाले की पश्चिम दिशेला जयमल्हार गड आहे. या गडावर पूर्वी भंडारा पडत असे अशी अख्यायिका आहे. खंडोबाचा गड चढल्यावर पठाराच्या मध्यभागी सासू-सूनेचे एकत्रित तळे आहे. त्या तळयाबदद्ल असे सांगण्यात येते की, सासू-सूनेच्या भांडणात सासू सूनेच्या छातीवर बसली. काहीही अपराध नसतांना सासूने छळ केला म्हणून सूनेने सासूला शाप दिला की, तूझ्या तळयाचे पाणी घाण होईल, त्यामध्ये
जिवजंतू पडतील आणि मी जर सत्य असेल तर माझ्या तळयातील पाणी स्वच्छ राहिल. आजही आपण निर्खून पाहिल्यास असे दिसते की एकत्र असलेले हे दोन तळे एकाचे पाणी थोडे गढूळ जिवजंतू असलेले दिसते. दूस-या तळयाचे पाणी अगदी स्वच्छ दिसते. भक्तांच्या भक्तीला प्रसन्न होवून खंडेराया सातारा गावात आले अशी कथा आहे. दरवर्षी चंपाषष्ठीला येथे मोठी यात्रा भरते. या दिवशी पूरण पोळी, खोबरे, रेवडी, भरीत व रोडग्याचा नैवेद्य दाखवला जातो व यळकोट यळकोट जय मल्हार या गजरात भंडा-याची उधळण केली जाते.पौष पौर्णिमा, सोमवती अमावस्या, चंपाषष्ठी, माघ पौर्णिमा, याला येथे जत्रा भरते. **रविवारचे महत्व :** रविवार खंडोबा देवाचा वार म्हणून भाविक त्या दिवशी मोठया प्रमाणावर दर्शन घेण्यासाठी येतात. असे म्हणतात की महादेवाने कैलासपर्वतावर धर्मपुत्रांच्या रक्षणासाठी स्वरोचित मनूच्या १३ व्या कृतयुगाच्या समाप्तीस ८८,००० दिवस अवकाश असतांना चैत्र शुध्द पौर्णिमेला दोन प्रहरी मार्तंड भैरव अवतार घेतला त्या दिवशी रविवार होता. त्यामुळे श्री खंडोबा भक्त दर रविवारी येथे दर्शनासाठी गर्दी करतात. घरी कोटंबा पूजन करतात. व वारी मागतात. नविन लग्न झाल्यानंतर ज्या प्रमाणे खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी जेजूरीला जातात. त्याच प्रमाणे नवदाम्पत्य औरंगाबादच्या सातारे खंडोबाला देखील दर्शन घेण्यासाठी येतात. व त्याच ठिकाणी जागरण-गोंधळ घालतात. **चंपाषष्ठी :** या दिवशी मार्तंड भैरवाने मल्ल्या सुराचा वध केला तेव्हा देवांनी व गणांनी व ऋषिंनी देवाची पूजा चाफयाच्या पु*लांनी केली व तो दिवस षष्ठीचा होता. म्हणून त्याला चंपाषष्ठी असे म्हणतात. चंपाषष्ठीला गावात देवाची मिरवणूक काढली जाते. सर्व गावकरी त्यावेळी देवांची पूजा करतात. संध्याकाळी देव पून्हा देवळात येतात. चंपाषष्ठीला देव जहांगिरदार (दीक्षित) यांच्या वाड्यात येतात. दिक्षितांचे वंशज दांडेकर परिवार परंपरेनुसार रुद्राभिषेक करून खंडेरायाला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात व संध्याकाळी देव परत देवळात येतात. विजया दशमीला देवाची पालखी गावशिवारात मिरविली जाते. हा सोहळा पाहण्यासाठी राज्यातसील व राज्याबाहेरील भाविक गर्दी करतात. चंपाषष्ठीला राक्षसांवर भगवंतांनी विजय मिळवला याचा आनंद व्यक्त करण्यासाठी खंडेरायाचे ६ दिवसांचे नवरात्र बसवून मंदिरात व घरी उत्सव साजरा करतात. शेवटच्या दिवशी देव सिमोल्लंघन करतात.

---

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



## लेमन कोरीएंडर सूप

थंडीच्या दिवसात सूप पिण्याचा आनंद आगळाच असतो. तसे तर आता नेहमीच सुप पिण्यापासूनच जेवणाची सुरुवात होते . पार्टी मध्ये सुद्धा आता वेगवेगळ्या प्रकारचे सुप असतात. सुप हे आरोग्यासाठी खूपच उपयुक्त असते . काही सुप शक्तीवर्धक तर काही डाएट साठी बनवले जातात. गरम गरम सुप घसा, पोट यासाठी छान असते .कफासाठीहि ते उत्तम असते. नेहमी टोमॅटो सूप तर बनवले जातेच. आज आपण डायजेशनसाठी उत्तम आणि टेस्टी असे लेमन कोरिएंडर सूप करू.

**साहित्य :** 1 बाउल एकदम बारीक कट केलेला कोबी, अर्धा बाऊल मोठ्या कोबीच्या फोडी, 2 गाजरे, 8..10 बीन्सच्या शेंगा , अर्धाकिलो ब्रोकोली , 1 बाऊल बारीक कट केलेली कोथिंबीर, 2 ..3 चमचे एकदम बारीक कट केलेला लसूण ,1 चमचा बारीक कट केलेले आले, 2. 3 चमचे कॉर्न फ्लोअर , 1 चमचा मिरपूड ,2 चमचे ऑइल , 2 मोठी किंवा 3 लहान लिंबे , 1 वाटी कांद्याच्या मोठ्ठ्या फोडी , पाव वाटी बारीक कट केलेला कांदा ,2 हिरव्या मिरचीचे बारीक तुकडे , चवीनुसार मीठ वआवश्यक असेल तरच साखर. **कृती :** प्रथम सर्व भाज्या व्यवस्थित धुवून घ्याव्यात. मग बीन्स, गाजर यांची खालची व वरची बाजू कट करूनबाजुला ठेवुन ते एकदम बारीक कट करावेत. ब्रोकोलीचे जाड दांडे कट करून वरची बारीक कट करावी . लिंबाची साल खिसून बाजूला काढून ठेवावी व मग लिंबांचा रस काढून ठेवावा. आता एका कढईत 1 छमचा तेल घालुन त्यात पाव चमचा लसुन व आल्याचे तुकडे घालुन लगेचच कोथिंबीरीच्या कट केलेल्या काड्या , बीन्स..गाजर ब्रोकोली यांचे खालचे वरचे बाजूला काढून ठेवलेले भाग , लिंबांची खिसून ठेवलेली साल , कांदा ,कोबी यांच्या मोठ्या फोडी परतून त्यात भरपूर म्हणजे साधारण1 लिटर पाणी घालून ते 20 मिनिटे उकळून घ्यावे . मग ते तारेच्या मोठ्या चाळणीतून गाळून ठेवावे .हा आपला व्हेजिटेबल स्टॉक तयार झाला .म्हणजेच भाज्यांचा कोणताच भाग फेकून न देता त्या पूर्ण वापरल्या जातात कारण खरे तर भाज्यांच्या देठात ,साली मध्ये भरपूर सत्व असते .व्हिटॅमिन्स असतात जी आपण नेहमी फेकून देतो ,ती पूर्णपणे मिळतात. हा स्टॉक फ्रीझमध्ये भरपूर दिवस टिकतो. कधीही सूप, भाज्या, आमटी यांत वापरता येतो. नंतर कढई मध्ये 1 चमचा तेल घालून त्यात बाकीचा लसूण ,आले , मिरच्या सर्व घालावे व बारीक चिरलेला कांदा घालावा. कांद्याचा कच्चेपणा गेला व रंग बदलून चमक आली की त्यात बारीक चिरलेल्या सर्व भाज्या घालून छान परतावे . मग एका बाऊल मध्ये कॉर्नफ्लोअर घेऊन त्यात पाणी घालून मिक्स करुन ठेवावे. त्यानंतर आपल्याला किती सूप करायचे असेल तेवढे बाऊल स्टॉक घालावा . त्याला उकळी आली की मिरपूड , बारीक चिरलेली कोथिंबीर घालून लिंबाचा रस ,मिठ, साखर सर्व घालावे. शेवटी अगदी सावकाश कॉर्नफ्लोअर मिक्स केलेले पाणी घालून सतत ढवळत रहावे म्हणजे गुठल्या होणार नाहीत व सूपाला दाटपणा येतो. 1 उकळी आली की लगेंच सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून गरम गरम सर्व्ह करावे.

**वैशिष्ट्य :** हे सुप आंबट ,किंचित स्पायसी चटपटीत लागते. भाज्यांमुळे हेल्दी बनते तर आले ,लिंबामुळे पाचक सुद्धा आहे . मिरपुडीमुळे चव तर येतेच पण वेटलॉसाठीही उत्तम आहे .ब्रोकोलीमुळे मस्त स्वाद आणि गोडवा येतो तर लिंबाच्या सालींचा स्वादसुद्धा खूप सुरेख लागतो. यात आवडत असेल तर मशरूम पातळ कट करून घातला तर पौष्टिकता खूपच वाढते. बारीक कट केलेल्या रंगीबेरंगी भाज्यांमुळे खूप आकर्षक दिसते तर कोथिंबीर खूप लज्जत वाढवते .

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



हनिमून भाग 3 :

हनिमूनचे ठिकाण हे आपल्या घरापासून कोसो मैल दूर असते. आपण आपल्या कुटुंबापासून, नातेवाईकांपासून खूप लांब जाऊन राहणार असतो. अशा वेळी सर्व प्रकारच्या वातावरणाचा सामना करण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

ते ठिकाण तुमच्यासाठी सर्व बाजूने नवीन असते. अशा वेळी पैशांचा, बँकिंगचा व्यवहार दोघांनाही व्यवस्थित माहिती असणं, पासपोर्ट, क्रेडिट कार्डसारख्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी जबाबदारीनं सांभाळणं, मोबाईल हरवणार नाहीत याची काळजी घेणे, दिवसा फिरायला जाताना मोबाईल बॅटरी फुल चार्ज असणं, बाहेर फिरायला जाताना आकर्षक चांगले दिसणं, राहाणं, आरोग्य उत्तम ठेवणं, स्किनची काळजी घेणं अशा सगळ्या गोष्टींची दक्षता घ्यावी लागते. कारण यातील एखादी गोष्ट बिघडली तरी तुमच्या पूर्ण प्लॅनचा विचका होऊन, मानसिक त्रास सहन करावा लागतो आणि एका वेगळ्या आनंदाला आपण मुकतो.




काय काळजी घ्यावी ?

- जाताना प्रॉपर लस टोचून घेणे उदा. HEPATITIS B, MALERIA ETC. सोबत अँन्टिसेप्टिक्स, अँन्टिबायोटिक्स, पेन किलर्स आणि सॅनिटायझर्स असे मेडिकल किट असावे. - हेल्थ इन्शुरन्स पेपर आणि फॅमिली डॉक्टरांचा नंबर, पोलिस ऑफिसरांचा नंबर, एम.एस.ई.बी. नंबर सेव्ह केलेला असावा. - रस्त्यावरील अन्न तसेच कच्चे चिकन खाऊ नये. - जर तुम्हाला मूल नको असेल तर त्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार कोणती काळजी घ्यावी याची माहिती करून घेणे आवश्यक आहे.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

- टॅब वॉटरचा वापर न करता पॅक्ड मिनरल वॉटरच प्यावे. कारण अनेक छोट्या-छोट्या तक्रारी या दूषित पाण्यामुळेच होतात. - बाहेर फिरायला जात असताना सन ग्लास, सन स्क्रीन्स, छत्री, स्कार्फ, पाण्याची बॉटल, खायचे पदार्थ, ड्राय फ्रूटस्, मॉईचरायझर, फेस टिश्यू, इ. गोष्टी सोबत असाव्यात. - बीचवर कीटकदंशापासून सावध राहावे. अनेक बीचवर असे किटक असतात. त्यामुळे शरीर झाकलेले असावे. शरीराला रीपेलंट क्रीम लावावे किंवा पायबंद शूज वापरावेत. - जेवणापूर्वी किंवा काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुवावे. - हनिमूनसाठी जर दुसऱ्या देशात जायचं असेल तर तिथली संस्कृती, खानपान, प्रेक्षणीय स्थळं आणि महत्त्वाचे म्हणजे त्या देशाचे शिष्टाचार माहिती असणं आवश्यक आहे. कारण काही देशांमध्ये रस्त्यावर किंवा बाहेर काही गोष्टी करण्यास मनाई आहे.

# “बदन पे सितारे लपेटे हुए..”

आधुनिक केसरी

निर्माते एफ. सी. (फकीर चंद) मेहरा, दिग्दर्शक लेख टंडन आणि संगीतकार शंकर-जयकिशन या त्रिकुटाचा आणखी एक करमणूकप्रधान चित्रपट `प्रिन्स' (१९६९). त्यात शम्मी कपूर आणि वैजयंतिमाला हे बडे कलावंत मुख्य भूमिकांमधे होते. मेहरा, टंडन आणि एसजे तत्पूर्वी १९६२ मधे `प्रोफेसर' (शम्मी कपूर) आणि १९६६ मधे `आम्रपाली' (वैजयंतिमाला) या चित्रपटांसाठी एकत्र आले होते. `प्रिन्स'मधे अजित खान, राजेंद्र नाथ, डेव्हिड, लीला चिटणीस, लीला मिश्र, असित सेन, हेलन, परवीन चौधरी आदी सहकलाकार होते. संगीताची जबाबदारी शंकर-जयकिशन यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यावेळी गीतकार शैलेंद्र हयात नसल्याने सहापैकी तीन गीते गीतकार हसरत जयपुरी यांनी तर तीन गीते गीतकार फारुख कैसर यांनी लिहिली होती. सगळी गीते लोकप्रिय झाली. या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे राजपुत्र शमशेर सिंह (शम्मी कपूर) राजाचा एकुलता एक पुत्र. तो लहानाचा मोठा होतो तोच मुळी उच्छृंखल वातावरणात ! आता तो बेजबाबदार, मद्यपि आणि स्त्रीलंपट बनलेला असतो. प्रत्येकाने आपल्यापुढे नतमस्तक झाले पाहिजे अशी त्याची इच्छा असते. नेमका एक धर्मगुरू तसे करावयास नकार देतो तेव्हा शमशेर त्याला निर्दयपणे मारहाण करतो. पण त्याचाही काही उपयोग होत नाही. हताश शमशेर त्याला काय करू असे विचारतो.





धर्मगुरू त्याला सहा महिन्यांसाठी राजवाड्यातील सुखाचा त्याग करून सर्वसामान्य माणसासारखे जगून जीवनाचा खरा अर्थ समजावून घ्यावयास सांगतो. शमशेर तसे करावयास तयार होतो. तो स्वतःच्या गाडीच्या अपघाताचा बनाव रचून त्यात आपला मृत्यू झाल्याचे जगाला भासवितो. तो जेव्हा एका खेड्यात जातो तेव्हा एक अंध स्त्री त्याला आपला हरवलेला मुलगा सज्जन सिंह समजते. शमशेरही तिथे सज्जन म्हणूनच राहू लागतो. येथून एक नवा अध्याय सुरू होतो. पुढे कट-कारस्थान, समज-गैरसमज यांच्या अनेक नाट्यमय घटना घडतात. राजकन्या अमृताशी (वैजयंतिमाला) शमशेरची ओळख कधी आणि कोठे होते ? शमशेरचा हेतू साध्य होतो का ? या घटना चित्रपटाच्या उत्तरार्धात पाहावयास मिळतात.या चित्रपटातील “बदन पे सितारे लपेटे हुए” हे मोहम्मद रफी यांनी गायलेले गीत शम्मी कपूर, वैजयंतिमाला आणि अजित खान या तिघांवर एका बड्या हॉटेलात चित्रित झाले आहे. हे गीत खास शम्मी कपूर यांच्यासाठीच जन्माला आलेय ! या गीतात गीतकार हसरत जयपुरी, संगीत दिग्दर्शक शंकर-जयकिशन, पार्श्वगायक मोहम्मद रफी आणि दिग्दर्शक लेख टंडन यांनी शम्मी कपूर यांच्या धसमुसळ्या अभिनयाला पूर्ण वाव दिला असल्याचे जाणवते. या गीतात ड्रमसेट, ग्रुप व्हायोलिन, सॅक्सोफोन, बोंगो आदी वाद्यांचा वापर करण्यात आला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**बदन पे सितारे लपेटे हुए
ओ जान-ए-तमन्ना किधर जा रही हो
जरा पास आओ तो चैन आ जाए
हम ही जब न होंगे तो ए दिलरुबा
किसे देख कर हाए शरमाओगी
देखोगी फिर तुम कभी आईना
हमारे बिना रोज घबराओगी
है बनने संवरने का जब ही मजा
कोई देखने वाला आशिक तो हो
नहीं तो ये जलवा है बुझते दिये
कोई मिटने वाला एक आशिक तो हो
मोहब्बत की ये इंतेहा हो गई
मस्ती में तुमको खुदा कह गया
जमाना ये इन्साफ करता रहे
बुरा कह गया या भला कह गया**

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# इथेनॉल निर्मितीवर बंदी, शेतकरी विरोधी धोरणाचा परिपाक



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**देशांतर्गत शेतमालाचे भाव नियंत्रणात रहावे यासाठी केंद्र सरकार सातत्याने शेतकरी विरोधी धोरण राबवत आहे. साखरेपासून इथेनॉल निर्मितीवर बंदी, चना व गव्हाची उपलब्धता वाढविण्यासाठी आयात कर हटविण्याची तयारी, साठ्यावर नियंत्रण, तांदूळ व कांद्यावर निर्यातबंदी यामुळे देशातील शेतकरी देशोधडीला लागले असून केंद्र सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांमध्ये असंतोष बघायला मिळत आहे. राज्यात साखरेचा हंगाम पुर्ण जोमाने सुरु झाला आहे. मात्र यावर्षी साखरेच्या उत्पादकतेत घट होणार असल्याचा अंदाज आहे. यावर्षी साखर कारखाने सरासरी दोन ते अडीच महिनेच सुरू राहतील असा अंदाज आहे. आतापर्यंत राज्यातील १८० साखर कारखान्यांनी मिळून १६ लाख टन साखरेचे उत्पादन केले आहे.**

ऊसाच्या उत्पादनात घट झाल्याचा परिणाम दरांवर होत असून सध्या देशात साखरेच्या दरात वाढ होतांना दिसून येत आहे. त्यामुळे साखरेचे दर नियंत्रणात रहावे यासाठी ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबत अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे. या निर्णयानंतर देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल अशी सरकारला खात्री आहे. ग्राहक व्यवहार आणि अन्न पुरवठा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग देशातील साखरेचे उत्पादन, विक्री आणि उपलब्धता यावर लक्ष ठेवतो. ज्यामुळं स्थिर किंमतीवर साखरेची उपलब्धता सुनिश्चित होते. सरकारनं २०२३-२४ या काळात साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरींना साखरेच्या रसापासून इथेनॉल बनवू नये असे आदेश दिले आहेत. हा आदेश तात्काळ लागू झाला आहे. परंतु बी-हेवी मोलॅसेसपासून इथेनॉलचा पुरवठा करण्यासाठी तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या आदेशांसाठी इथेनॉलचा पुरवठा सुरु राहणार आहे. या निर्णयाबाबत मंत्रालयाने पेट्रोलियम मंत्रालयालाही कळवले आहे. भारत सरकार साखरेपासून इथेनॉल निर्मितीच्या उत्पादनावर बंदी घालणार आहे हे कळताच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत न्यूयॉर्क एक्सचेंजमध्ये साखरेचे भाव सुमारे ८ टक्क्यांनी घसरले आहेत. या निर्णयाचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसून येईल व त्यामुळे साखरेचे भाव खाली येण्याची शक्यता आहे. सरकारच्या या निर्णयामुळं साखर उत्पादक कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. बलराम चिनी ६.६० टक्के, दालमिया भारत ६.०८ टक्के, बजाज हिंदुस्थान ५.४१ टक्के, डीसीएम श्रीराम ५.८० टक्के घसरणीसह बंद झाले आहेत. उसाच्या रसापासून डायरेक्ट किंवा बी - हेवी पासून तयार झालेला इथेनॉल पेट्रोलियम कंपन्यांनी घेऊ नये असा आदेशही केंद्र सरकारकडून काढण्यात आला आहे. हा निर्णय नक्कीच शेतकरी विरोधी आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. वास्तविक केंद्र सरकारने दोन-तीन वर्षांपासून स्वतःच इथेनॉल निर्मिती साठी प्रोत्साहन दिले. इथेनॉलचे दर ठरतांना ऊसाच्या रसापासून निर्माण झालेल्या इथेनॉलला जास्त दर मिळत आहे. त्या खालोखाल बी हेवी इथेनॉलला दर चांगला आहे. सी हेवी ला सगळ्यात कमी दर मिळत आहे. ज्यूस पासून इथेनॉल निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांसाठी केंद्रसरकारने प्रोत्साहन दिले, व्याजात सवलत दिली आणि आज केंद्र सरकार आज अचानक इथेनॉल निर्मितीवर बंदी घालणार असेल तर या क्षेत्रात उतरण्यासाठी ज्यांनी शेकडो कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे ते सगळेच प्रकल्प आणि साखर कारखाने या निर्णयामुळे संकटात येतील त्यामुळे केंद्र सरकारने या निर्णयावर फेरविचार करून हा निर्णय मागे घेतला पाहिजे. व्हाचे व चण्याचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी व उपलब्धता वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडून आयात कर हटवले जाऊ शकतात कारण देशात गव्हाचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये आणि भाव नियंत्रणात रहावे याकरिता केंद्र सरकारकडून सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील व्यापारी, घाऊक विक्रेते , किरकोळ विक्रेते, मोठे साखळी विक्रेते, प्रोसेसर यांच्यासाठी गव्हाच्या साठ्याची मर्यादा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी गव्हाच्या साठ्याची मर्यादा ३ हजार टनांवरून २ हजार टनांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. बाजारातील गव्हाची उपलब्धता वाढण्याकरीता सरकारने हा निर्णय घेतला आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी १० टनावरुन ५ टन, आउटलेटसाठी १० टनावरुन ५ टन आणि डेपोसाठी २ हजार टनावरुन १ हजार टनांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे गव्हाचे भाव काही प्रमाणात कमी होऊ शकतात. आज मितीला गव्हाची सरासरी विक्री किंमत २१७२ रुपये प्रतिक्विंटल पर्यंत खाली आली आहे. देशांतर्गत गव्हाच्या किमती नियंत्रित करण्यासाठी सरकार खुल्या बाजार विक्री योजने (ओ एम एस एस) अंतर्गत दि.२८ जून पासून विक्री सुरु झाली आहे. सरकारकडून गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घालण्यात आल्याने बाजारातील गव्हाची उपलब्धता नियमित राहील असा अंदाज आहे. गव्हाचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने साठ्यातील गहू बऱ्याच प्रमाणात खुल्या बाजारात वितरीत केले आहे. राज्याचा साठा ७ वर्षातील नीचांकी पातळीवर आला आहे. भारताने २०२३-२४ या आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत २६.०८ लाख टन बासमती तांदूळ आणि ७३.१८ लाख टन बिगर बासमती तांदळाची निर्यात केली. तुकडा तांदूळ आणि बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर सरकारने बंदी घातली आहे. दि. ९ सप्टेंबर २०२२ रोजी बिगर बासमती तांदळावर २० टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आले होते, त्यानंतर दि.२० जुलै २०२३ रोजी बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवरही बंदी घालण्यात आली. इंडोनेशियातील तीव्र दुष्काळामुळे तांदळाच्या उत्पादनात घट झाली. भारतातून निर्यातीलाही प्रतिबंध घातला आहे. याचा परीणाम जागतिक स्तरावर तांदळाच्या किमती वाढल्या आहेत. सरासरीपेक्षा अधिक तापमान, अनियमित आणि कमी पाऊस हे आशियातील सर्वच देशांतील तांदळाचे उत्पादन कमी होण्यास प्रमुख कारण आहे. कृषी उत्पादनांची निर्यात सातत्याने घसरत आहे. एप्रिल आणि मे महिन्यात ३३ लाख टन प्रत्येक महिन्यात निर्यात झाली होती. ऑगस्ट महिन्यात २७.९४ लाख टन तर सप्टेंबर महिन्यात १७.९४ लाख टन कृषी उत्पादनांची निर्यात झाली. कृषी उत्पादनाच्या निर्यातीस सातत्याने निर्बंध घातले जात असल्याने निर्यात घटत आहे. एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीमध्ये १७२ लाख टन कृषी उत्पादनांची निर्यात झाली. जवळपास ४७ कृषी उत्पादनाची निर्यात होत होती. कांद्याच्या निर्यात बंदीनंतर देशात कांद्याचे भाव घटत आहेत आणि भारताजवळील देशात जसे बांग्लादेश, नेपाळ, भूताण, मालदीवमध्ये कांद्याच्या भावात जोरदार वाढ झाली. मागील एका आठवड्यात या देशातील भाव ६० ते ७० टक्के वाढले. दि. ७ डिसेंबर रोजी लाल कांद्याला सरासरी ३३०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत होते. मात्र आज लाल पोळ कांद्याला सरासरी १९०० रुपये प्रती क्विंटल इतके भाव मिळत आहेत. भावात मोठी घट झाल्यामुळे शेतकरी आंदोलनाच्या पवित्रा घेताना दिसले.

# कारखान्याच्या नावाखाली राजकारणी मोठे झाले

## ॲड कृष्णा जाधव : पैसा कमावला त्यांनी कामगारांकडे साधे ढुंकुनही पाहिले नाही

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील राजुरेश्वर मंगल कार्यालय येथे कामगारांचा आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी अध्यक्षस्थानी उत्तमराव राठोड तसेच ॲड. कृष्णा जाधव, लाल मिया शहा, वर्धमान पाटणी , कृष्णा मोहिते, किशोर वाळुजे यांची प्रमुख उपस्थीती स्व . चिंतामण मोरे यांना श्रध्दांजली वाहीली.
कन्नड सहकारी साखर कारखाना सन २००९ साली बंद झाला, त्यावेळी कामगारांची कारखान्याकडे सुमारे 38 महिन्याचा पगार ,ग्रॅच्युईटी , प्रॉडक्ट फंड व इतर येणे बाकी होती.. जी त्यांना न मिळाल्यामुळे कामगारांनी सण 2010 मध्ये मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली.



दोन वर्षाच्या संघर्षानंतर दिनांक 27 .10. 2023 रोजी सदर याचिकेमध्ये अंतरिम निर्णय झाला. मा. न्यायालयाने राज्य सहकारी बँकेस तातडीने दीपावली पूर्वी मा. न्यायालयात 16 कोटी 12 लक्ष रुपये भरणे बाबत आदेशित केले. त्याप्रमाणे सदर बॅंकेने सदरची रक्कम तातडीने बँकेत जमा केली व दिवाळीपूर्वीच आवश्यक त्या कागदपत्रांची जमवा जमवी करून मा. उच्च न्यायालयाचे वतीने कामगारांचे बँक खात्यावर आरटीजीएस प्रणाली नुरूप वर्ग करण्यात आली, ज्यामुळे एक प्रदीर्घ लढाईत कामगारांना अंशतः यश प्राप्त झाले .
यावेळी ॲड कृष्णा जाधव हे बोलतांनी म्हणाले की या साखर कारखान्याच्या जिवावर मोठे झाले नाव कमावल आणी कामगाराच्या जिवावर मुला मुलीचे लग्न करून घेतले कारखाना विकतांनी बघ्याची भुमीका घेतली या मुळे कन्नड तालुका विकासापासुन कोसो दुर गेला व कामगारांच्या वेतना विषयी शब्द सुद्धा घेतला नाही साधे त्याच्याकडे ढुंकुन ही पाहीले नाही तालुक्यातील राजकीय लोकांवर रोष व्यक्त केला .
शनिवारी, सकाळी 11.00 वाजता राजुरेश्वर मंगल कार्यालय कारखाना परिसर ,कन्नड ,येथे आनंद उत्सव साजरा करून स्नेहभोजनाचेही आनंद घेतला. कामगारांच्या वतीने सदर न्यायालयात न्यायालयीन लढाई ही ॲड. सतीश तळेकर, ॲड. प्रज्ञा तळेकर यांनी समर्थपणे लढविली.
कामगाराच्या या लढाईत स्व. चिंतामण मोरे, समाजसेविका मेधाताई पाटकर, कॉ. माणिकराव जाधव यांचे मोलाचे सहकार्य वेळोवेळी प्राप्त झाले.
असे कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमराव राठोड बोलतांनी म्हणाले यावेळी ॲड. कृष्णा जाधव, उत्तमराव राठोड, लाल मिया शहा, वर्धमान पाटणी , कृष्णा मोहिते, टी. एस .चव्हाण, आर. व्ही. शिंदे, किशोर वाळुंजे व शेकडो कामगार उपस्थीत होते.



# प्रा. प्रज्ञा पंडित यांच्या प्रवचनाने कौपिनेश्वर देवस्थान विष्णूमय

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेत महत्त्वाचे स्थान असलेल्या ऐतिहासिक कोपिनेश्वर मंदिरात चातुर्मासात अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.
यात कार्तिक महिन्याची सुरुवात प्रा. प्रज्ञा पंडित यांच्या विष्णुसहस्त्रनाम निरुपणाने झाली. या स्तोत्रांचा अर्थ सोप्या भाषेत प्रा. प्रज्ञा पंडित यांनी समजावून सांगितला. याशिवाय गणपती अथर्वशीर्ष, देवी सूक्त, श्री सूक्त, श्रीरामरक्षा, घोरकष्टोधरण स्तोत्र, नवग्रह स्तोत्र स्तोत्रांवरही प्रा. प्रज्ञा पंडित यांचे या महिन्यात प्रवचन झाले. महिनाभर चाललेल्या या विशेष निरुपण सेवेत प्रा. प्रज्ञा पंडित यांनी संस्कृत स्तोत्रांचे अर्थ सर्वसामान्यांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत समजावून सांगत, शब्द उच्चार स्पष्ट करत, दैनंदिन आयुष्यातील उदाहरणे देत त्यांनी आपले निरूपण सादर केले अशा भरभरून प्रतिक्रिया सर्व श्रोत्यांनी दिल्या. प्रवचन समारोपाच्या दिवशी प्रा. पंडित यांच्या तर्फे उपस्थितांना विष्णू सहस्त्रनाम आणि श्री सूक्त स्तोत्र पोथी भेट स्वरूपात देण्यात आली. या प्रसंगी मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे प्रमुख श्री पाध्ये, श्री उपाध्ये, श्री पाध्ये, श्री. सिताराम जगन्नाथ कासार, श्री नेमिनाथ ढोके, सौ. महाडिक,,श्रीमती नलिनी दामले यांनी प्रवचनकार प्रज्ञा पंडित यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रा. प्रज्ञा पंडित यांच्या प्रवचनाबरोबरच त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त केलेली दीप आरास आणि रांगोळी, देव दीपावली निमित्त आयोजित केलेला भंडारा या सारखे कार्यक्रमही या कार्तिक मासाचे मुख्य आकर्षण ठरले. याशिवाय वर्षभर सुरू असणाऱ्या मंदिरातील धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कौपिनेश्वर समिती प्रमुख श्री पाध्ये आणि कीर्तनकार श्री उपाध्ये यांनी केले आहे.

# बरांज कोलमाईन्स कंत्राटदार, प्रकल्पग्रस्त व कामगारांची थकीत देणी त्वरित अदा करावी

## एनसीबीसीच्या बैठकीत हंसराज अहीर यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केपीसीएलच्या बरांज कोलमाईन्स निगडीत ओबीसी व अन्य स्थानिक कंत्राटदार, कामगार तसेच प्रकल्पग्रस्तांची प्रलंबित आर्थिक देणी त्वरीत देण्याचे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी आयोगाच्या नवी दिल्ली येथील कार्यालयात दि. 13 डिसेंबर, 2023 रोजी पार पडलेल्या आढावा बैठकीस उपस्थित कोल इंडीयाच्या वरीष्ठ अधिका-यांना दिले.
सदर बैठकीस आयोगाचे सदस्या भुवनभुषण कमल, आयोगाचे सचिव, कोल मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व अन्य वरीष्ठ अधिकारी तसेच सिंगरेनी कोलचे सीएमडी, नेयवेली लिग्नाईट मायनिंगचे सीएमडी या बैठकीस उपस्थित होते. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाव्दारे केपीसीएल विषयक प्रलंबित प्रश्नी दि. 22 जुलै व 31 ऑक्टोंबर 2023 रोजी नागपूर विभागीय आयुक्त



कार्यालयात सुनावणी घेतली होती.
या पार्श्वभुमीवर आयोगाने दिल्ली येथे सदर बैठकीचे आयोजन करुन स्थानिक कंत्राटदार, खाण प्रकल्पग्रस्त व कामगारांना त्यांची थकीत राशी देवून न्याय देण्याचे निर्देश दिले. केप्पीसीएलने प्रलंबित देणीकरीता कोल मंत्रालयात 113 करोड रूपये जमा केले असून या रकमेतून ही थकीत राशी देण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. येत्या 20 दिवसात या विषयावर पुन्हा बैठक घेवून कार्यवाहीचा आढावा घेतल्या जाईल असेही आयोगाने यावेळी स्पष्ट केले. कोल मंत्रालयाच्या आढावा बैठकीमध्ये ओबीसी आयोगास प्राप्त झालेल्या अनेक तकारी संदर्भात सुनावणी घेत आयोगाने व्यक्तीगत प्रकरणे, ओबीसी वर्कर्स फेडरेशनच्या विविध प्रश्नांचा आढावा घेतांनाच रोस्टरनुसार ओबीसी पदभरती, आरक्षणानुसार बॅकलाग भरणे तसेच ओबीसी वर्गाच्या कल्याण व जनसुविधाविषयक बाबींच्या पुर्ततेबाबतही अध्यक्षांनी निर्देश देत सविस्तर आढावा घेवून चर्चा केली.

# तलवारीने केक कापून केला ‘हॅप्पी बर्थडे’

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** वाढदिवसाला तलवारीने केक कापून तो समाजमाध्यमावर सार्वत्रिक करणे चौघांना भलतेच महागात पडले! ‘बर्थ डे बॉय’सह त्याच्या मित्रांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
मोताळा तालुक्यातील धामणगाव बढे येथे हा चोघांना धडा शिकविणारा अन इतर युवकांना धडा देणारा घटनाक्रम घडला. धामणगाव बढे येथील रमेश सपकाळ यांचा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा करण्याचे मित्रमंडळाने ठरविले. त्याप्रमाणे तो थाटात ‘एन्जॉय’ देखील करण्यात आला. मात्र केक धारधार तलवारीने कापणे व ‘इन्स्टाग्राम आयडी’ वर ‘शेअर करणे त्यांना महागात पडले. ही तलवारबाजी वेगाने ‘व्हायरल’ झाली अन पोलीस दादांच्याही नजरेत आली. याची गंभीर दखल घेत धामणगाव बढे पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांनी कारवाईचे आदेश दिले.

# ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे शेंदुर्णी येथील नागरिकांची न्यायाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज


**जामनेर :** महावितरणाचे बेजबादार अधिकारी यांच्यावर कठोर कार्यवाही व्हावी त्यासाठी शेंदुर्णी येथील नागरिकांनी राज्याचे ग्राम विकास मंत्री गिरीष महाजन यांच्या कडे केली न्यायची मागणी ग्राम विकास मंत्री गिरीष महाजन यांच्या मतदार संघातिल हा संपूर्ण प्रकार असल्याने भाजपा माजी जिल्हा उप अध्यक्ष गोविंदजी अग्रवाल व भाजपा जेष्ठ नेते अमृत बापू यांना नागरिकांनी दिले तक्रार निवेदन.
महावितरण विभागाचे अधिकारी नितीन सांघवी हे नागरिकांच्या समस्यांकडे जाणीव पूर्वक काणा डोळा करून कुठलीही कामे जाणीव पूर्वक वेळेवर करत नसून नागरिकांना त्रास देण्यासाठी उडवा उडवीचे उत्तरे देत असून त्यांना विजे संदर्भात काही तक्रार असल्यास लेखी तक्रारी करायला सांगून अंधारात ठेवत असल्याचे व वृत्तपत्रात बातमी देण्याचे हे अधिकारी सांगत असल्याचे नागरिकांचे तक्रार निवेदनात म्हणणे असून या बेजबाबदार भ्रष्ट अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाहीची मागणी राज्याचे ग्राम



विकास मंत्री गिरीष महाजन यांच्या कडे नागरिकांनी केली आहे. सबंधित अर्जाची एक प्रत जिल्हा अधिकारी जळगाव व महावितरणाचे मुख्य अभियंता जळगाव यांच्या कडे देखील दिलेली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कायदा सुवेवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास नितीन सांघवी व महावितरण विभाग जबाबदार राहील असेही निवेदनात आहे. बेजबाबदार अधिकारी शेंदुर्णी कार्यालयाचा पदभार आस्थायी स्वरूपात सांभाळत असून त्यांच्याकडून ग्राहकांना त्रास दिल्या जात असेल व मोठ्या प्रमाणात ते भ्रष्टाचार करत असतिल व सबंधित अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराविषयी महावितरण विभागाला माहिती असून देखील या अधिकाऱ्यांकडे असलेला शेंदुर्णी विभागाचा अतिरिक्त पदभार वरिष्ठ कायम ठेवत असतील तर नेमके कारण काय असाही प्रश्न शेंदुर्णी येथील नागरिक उपस्थित करतानी बघायला मिळतात. नितीन सांघवी या बेजबाबदार अधिकाऱ्यावर आपल्या मतदार संघातील नागरिकांच्या तक्रार निवेदना नुसार राज्याचे ग्राम विकास मंत्री गिरीष महाजन काय कार्यवाही करतात याकडे सर्वांचे चांगलेच लक्ष लागले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शिक्षण हाच माणसाचा खरा दागिना

## नागनाथ घिसेवाड : भोकरला विज्ञान प्रदर्शनास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शिक्षणा शिवाय माणसाला दूसरा कुठलाच तरणोपाय नाही. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरानी शिक्षणाला प्राधान्य दिल्याने त्याचा दबदबा संबंध देशात आहे. विद्यार्थानी मोबाईलच्या मोहात न पडता शिक्षणाला महत्त्व द्यावे. शिक्षण हाच माणसाचा खरा दागिना आहे, असे प्रतिपादन नागनाथ घिसेवाड यांनी शुक्रवारी (ता. १५) केले आहे. जिल्हा परिषद नांदेड व गट शिक्षणाधिकारी विभाग भोकर यांच्या वतीने कै.लक्ष्मणराव घिसेवाड विद्यालयात ५१ वे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले त्यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.व्यासपीठावर पोलिस निरीक्षक नानासाहेब उबाळे, वैद्यकीय अधीक्षक अंनत चव्हाण, गट शिक्षणाधिकारी सौ.सुमन गोणारकर, केंद्र प्रमुख शेख जकीयोद्दीन, विजय चिंतावार,सूधांशु कांबळे, नागोराव शेंडगे, कैलास किनेवाड, ईश्वर नाईक, बातमीदार बाबुराव पाटील, रमाकांत जोशी,कमलाकर बरकमकर, बालाजी कदम, विठ्ठल सुर्लेकर,विशाल जाधव यांची



उपस्थिती होती.श्री.घिसेवाड म्हणाले की, दिवंगत राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपआपल्या क्षेत्रात नावलौकिक मिळवाव. सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी विज्ञानातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून उज्वल कामगिरी करावी.आई वडीला सोबतच देशाची मान उंचावण्यासाठी व्यसनाच्या आहारी न जाता शिक्षणाची कास धरली पाहिजे असे सांगितले आहे.प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक शाळेचे(२८),माध्यमिक शाळेचे(आठ) शाळेनी सहभाग घेतला होता. प्रास्तावीक.एच.जी.कूलकर्णी यानी केल. सुत्रसंचलन चंद्रकांत लोंखडे आभार सुधांशू कांबळे यांनी मानले आहे.

# छाया बेले यांना उलगुलान काव्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** येथील प्रथितयश लेखिका व कवयित्री छाया बेले यांच्या ' हॅपी होम'च्या भिंतीआड ' या बहुचर्चित काव्यसंग्रहाला अण्णा भाऊ साठे साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने कवी भुजंग मेश्राम यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा ' उलगुलान ' काव्य पुरस्कार जाहीर झाला आहे. ' हॅपी होमच्या भिंती आड ' हा स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा त्यांचा काव्य संग्रह अहमदनगर येथील साहित्याक्षर या नामांकित प्रकाशनाने प्रकाशित केला असून, या आधी त्यांचे 'लढाई अस्तित्वाची', 'घर याचे ह्रदयी माझ्या' हे काव्यसंग्रह, 'फरफट' ही कादंबरी व 'चकवा' ' वैशाख वणवा 'हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून, त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, मुक्ता साळवे वाचनालय उदगीर यासह विविध संस्थांचे पुरस्कार मिळालेले आहेत. येत्या २४ डिसेंबर रोजी नांदेड येथे होणाऱ्या सहाव्या राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनात कवयित्री छाया बेले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती अण्णा भाऊ साठे साहित्य परिषदेचे महासचिव प्रा. संजय मांजरमकर यांनी दिली. या प्रतिष्ठित पुरस्काराबद्दल कवयित्री छाया बेले यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# भुरट्या चोरांनी चार स्मार्टफोनवरच मारला डल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** निफाड पूर्व भागात भुरट्या चोरांनी उच्छाद मांडला असून द्राक्षे बाग कामगारांच्या चार स्मार्टफोनवरच वरच डल्ला मारला आहे. त्यामुळे भुरट्या चोरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

याबाबत लासलगाव पोलीस स्टेशन मध्ये लक्ष्मण गोपाळ बोरसे रा.रानविहिर ता.पेठ, ह.मु.देवगाव फाटा यांनी फिर्याद दिली असून मी व येवाज किसन बात्रे व माझ्या गावाकडचे अनेक मजुर नितिन खैरनार रा.मुखेड यांचे मालकीच्या वाकद शिवारातील शेतात प्लास्टिकच्या ताडपत्रीचे पाल बांधुन राहत असून द्राक्षे बागेचे काम करून पोट भरतो. आम्ही रात्री जेवण करुन झोपी गेलो. आम्ही सकाळी उठल्यावर माझा स्मार्टफोन उशाशी आढळून आला नाही, माझे मजुर मित्र मंगेश गोपाळ बोरसे, हरिदास सिताराम बात्रे, बत्तीबाई आंबादास किलबिले यांनी ही खात्री केली असता त्यांचे ही स्मार्टफोन मिळुन आले नाही. याबाबत भारतीय दंड संहिता ३७९ नुसार अज्ञात व्यक्ती विरोधात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पो.हवा.औदुंबर मुरडनर हे करीत आहेत.

लासलगाव परिसरात भुरट्या चोऱ्या वाढल्याच्या पार्श्वभूमीवर जे नागरिक तात्पुरत्या निवारा शेड अथवा पाल करून राहतात त्यांनी आपल्या मौल्यवान वस्तू, मोबाईल व्यवस्थित ठेवावे, परिसरात कुणी संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तातडीने लासलगाव पोलीस स्टेशनला कळवावे .
**राहुल वाघ, सहा .पो .निरीक्षक**

# व्यवहार ज्ञान मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिली बँकेला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** शिक्षण हे बंद वर्ग खोली आणि घोकंपट्टी यावरच निर्भर न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देऊन ,जीवन कौशल्ये तसेच व्यवहाराज्ञान मिळावे या उद्देशाने खुलताबाद तालुक्यातील के.प्रा. शा.सुलतानपूर येथील विद्यार्थ्यांनी शिक्षिका वैशाली कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा सुलतानपूर या बँकेत जाऊन व्यवहार कसे चालतात याची माहिती घेण्यासाठी वर्ग ५ ते ७ च्या गणित विषय बँक हे प्रकरण अभ्यासण्यासाठी बँकेला क्षेत्रभेट दिली. दैनंदिन जीवनात पैशाचे व्यवहार बँकेत कसे केले जातात याचे ज्ञान घेतले व बचतीचे महत्त्व समजून घेतले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती शाखा सुलतानपूर व्यवस्थापक श्री.आर एस वेताळ, श्री.खंडगळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व बँकेच्या कामकाजाची माहिती दिली.



बँक म्हणजे काय? बँकेच्या विविध कार्याबद्दल, तसेच बँकेतील बाबी जसे चेक क्लिअरिंग सिस्टम, चेक म्हणजे काय? पैसे काढण्याची, भरण्यासाठी कोणती स्लिप भरावी, मनी ट्रान्स्फर व प्रॅक्टिकली कसे कामकाज चालते व बँकेच्या संपूर्ण व्यवहाराची माहिती दिली यामध्ये बचत ठेवी, कर्ज योजना, बचत योजना आदी सुविधेचा वापर कसा केला जातो फिक्स डिपॉझिट व्याज याविषयीची माहिती दिली तसेच स्वतःच्या बचत खात्यातील एटीएम सुविधेद्वारे विद्यार्थ्यांना पैसे कसे काढतात ते समजून दिले. यावेळी आदिती वेताळ, ईश्वरी चव्हाण, पवन गुजर, सिद्धी चव्हाण, स्नेहल चव्हाण, पूनम बनकर ,ओंकार जाधव इ विद्यार्थ्यांनी प्रश्न, शंका विचारून मुलाखत घेतली. विद्यार्थ्यांना सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्तीचे पैसे बँकेत दिले जातात ते पैसे कसे काढावे,पैसे काढण्याच्या पावतीवर कशी व कुठे सही करावी.

# नांदा तांडा येथे लाईट सुरळीत ठेवा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे दि.१७/१२/२३ ते २४/१२/२३ पर्यंत मीक्षदा एकादशी गीता जयंती दिंडी नगर प्रदक्षिणा व श्रीमद् भागवत सप्ताहाचे गावाकऱ्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे याकरिता नांदा तांडा ठिकाणी नेहमी वीजपुरवठा खंडीत असतो.तसेच परिसरात अनेक भागात देखील वीज खंडीत असतो परिसरात अर्धा तास वीज पुरवठा खंडित होत असतो श्रीमद् भागवत सप्ताह निमित्ताने लाईट सुरळीत चालू ठेवा लाईट चे मेन्टेंन्स करा असे लेखी निवेदन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव व सावळदबारा ३३/११ केव्ही महावितरण कार्यालयात शुद्धा देण्यात आले आहे. महावितरण कार्यालयाच्या अंतगर्त असलेल्या नांदा तांडा गावांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात येऊ नये 33 KV कार्यालय अंतर्गत नांदा तांडा नागरिकांना व भाविक भक्तांना याचा त्रास सहन करावा लागतो तो त्रास कमीत कमी श्रीमद् भागवत सप्ताह होई पर्यंत या सप्ताहाला पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त उपस्थित राहत असतात म्हणून लाईटचा त्रास तरी झाला नाही पाहिजेत तो सुरळीत पणे चालू ठेववा असे लेखी निवेदनाद्वारे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिले.

# चंद्रपुरात प्रदूषण नियंत्रणासाठी 'एअर प्युरिफायर टॉवर' उभारा

## प्रदूषणामुळे बाधितांच्या तपासण्या, उपचारांकरिता प्रभावी योजना राबवा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या निमीत्ताने इको-प्रो तर्फे सुरू असलेल्या एक दिवस एक आंदोलन शृघले अंतर्गत आज सातव्या दिवशी चंद्रपुरच्या प्रदुषणमुक्ती करीता तसेच सिटीपीएसचे कालबाहय प्रदुषीत संच क्रमांक 3 व 4 त्वरीत बंद करण्याची तसेच चंदीगडच्या धर्तीवर 'एअर प्युरीफायर टॉवर' शहरात उभारण्याच्या मागणीसह अन्य मागण्या शासनाकडे करीत ''प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालय व अधिकारी यांना (एमपीसीबी) साकडं घाला सत्याग्रह'' आंदोलन करण्यात आले.चंद्रपूर शहर राज्यातील सर्वाधिक प्रदुषीत शहराच्या यादीत वरच्या स्थानावर असल्याने, राज्याच्या विजेची गरज सोबतच खनिजांची गरज पुर्ण करून चंद्रपूरकरांच्या वाटयाला कायम प्रदुषण, आजार हेच मिळाले आहे. चंद्रपूरचे प्रदुषण कमी व्हावे म्हणुन वेळोवेळी अनेक आंदोलने, पाठपुरावा तसेच जनहित याचिकाच्या माध्यमाने अनेक संस्था-संघटना लढत असतात मात्र याकडे हवे तसे लक्ष शासनाच्या वतीने करण्यात येत असल्याचे दिसुन येत नाही. प्रदुषण नियंत्रणासाठी कार्यरत असलेली महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नोटीसा देणे, बॅक गॅरन्टी जप्त करणे या पलिकडे काही होताना दिसत नाही. यासाठी राज्यातील शहरा-शहरातील प्रदुषणाची तीव्रता बघता, बाधीत जनतेच्या हिताचा, आरोग्याचा विचार करता भविष्यात प्रदुषण विरोधात कार्यवाहीचे स्वरूप व अंमलबजावणी बाबत शासनाने वाढत्या प्रदुषणाविरोधात धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. 2006 पासून चंद्रपूरच्या प्रदुषणाबाबत अनेक ॲक्शन प्लान आले मात्र अमलबंजावणी



हवी तशी झालेली नाही. अलिकडे जिल्हातील व शहरातील नदयाचे जलप्रदुषणाची समस्या गंभीर आहे. नागरी सांडपाणी पासुन तर उदयोगीक प्रदषुीत पाणी सर्रास नदयात प्रवाहीत केले जात आहे. तसेच जिल्हयातील तलावाची स्थिती सुध्दा गंभीर असुन जलप्रदुषण ठिकठिकाणी होत आहे. यासाठी सुध्दा कृती आराखडे आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थाची जवाबदारी आहे, नगर विकास विभागाची जवाबदारी आहे. मात्र याबाबत कृती होताना दिसत नाही. यापुर्वी इको-प्रो ने शहरातील प्रदुषणाविरोधात 'अन्नत्याग सत्याग्रह', धरणे आंदोलन, पदयात्रा तसेच जनहित याचीकाच्या माध्यमाने सिटीपीएस संच क्रमांक 1 व 2 साठी लढा दिलेला आहे. रेलवे मालधक्का प्रदुषण विरोधातही संघर्ष केलेला आहे. भविष्यात प्रदुषणाच्या मागण्यासंदर्भात इको-प्रो सत्याग्रह आंदोलनाच्या भुमीकेत असणार आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे चंद्रपूरकरास प्रदुषणाच्या त्रासापासुन मुक्त करण्यास थातुरमाथुर उपाययोजना करण्यापेक्षा आवश्यक व कठोर कार्यवाही करण्याच्या मागणीकरीता व प्रदुषणमुक्तीच्या मागण्यासाठी आज इको-प्रो तर्फे प्रतिकात्मक आंदोलन करीत विविध मागण्याकरीता एमपीसीबीला 'साकडं घाला सत्याग्रह' करण्यात आले, येत्या काळात या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात न आल्यास लवकरच तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुध्दा देण्यात आला आहे.

आज करण्यात आलेल्या एमपीसीबीला 'साकडं घाला सत्याग्रहाच्या मागण्या मध्ये सिटीपीएस कालबाहय संच क्रमांक 3 व 4 तात्काळ बंद करण्यात यावे, सिटीपीएस संच क्रमांक 5, 6 व 7 सुध्दा जुने संच होणारे प्रदुषण नियत्रणात आणुन टप्प्या-टप्प्याने बंद करण्याचा कार्यक्रम जाहीर करणे, चंद्रपूर शहरात प्रदुषण नियंत्रणसाठी चंदीगडच्या धर्तीवर महानगरपालिकेकडुन प्रस्तावित 'एअर प्युरीफायर टॉवर' ला त्वरीत मंजुरी प्रदान करावी, वायु प्रदुषण व नदी प्रदुषण कृती आराखडयाची संबधीत विभागाकडुन त्वरीत अंमलबजावणी करणे, सिटीपीएस/वेकोली परिसरातील वाढलेली काटेरी झुडपे काढुन त्याठिकाणी सौर उर्जा प्रकल्प दोन्ही उदयोगाने सुरू करणे, चंद्रपूरात प्रदुषणाने बाधीत नागरीकांचे तपासण्या, उपचाराकरीता मोफत व प्रभावी योजना राबविणे, चंद्रपूर शहरात महानगरपालिकेने तसेच इतर प्रदुषीत नगर पालिका क्षेत्रात 'हवा गुणवत्ता दर्शविणारी यंत्रणा' उभारावी, महाराष्ट्र महानगरपालीका व नगर परिषद (सुधारित) कायदा 1994 मधिल कलम 67-अ नुसार 'पर्यावरण सध्यस्थिती अहवाल' त्वरीत तयार करावे, जिल्हा पर्यावरण समीती घोषीत करून नियमित सभा व कार्यान्वीत करणे आदी मागण्या शासनाकडे करण्यात आलेल्या आहेत. आज इको-प्रो तर्फे संस्थेचे अध्यक्ष बंडु धोतरे यांचे नेतृत्वात करण्यात आलेल्या सत्याग्रह मध्ये नितीन रामटेके, धर्मेंद्र लुनावत, ओमजी वर्मा, राजु काहीलकर, अब्दुल जावेद, सचिन धोतरे, प्रकाश निर्वाण, कुणाल देवगीरकर, प्रितेश जीवने, सुधीर देव, भारती शिंदे, चित्राक्ष धोतरे आदी सहभागी होते.

# केंद्रीय योजनेतून चंद्रपुरात 10 हजार नवीन घरकुले

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला नागपूर येथे आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आपल्या हक्काचे घर असावे, असे प्रत्येकाचे स्वप्न असते. या स्वप्नाला प्रत्यक्षात साकार करण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. केंद्रीय योजनेतून दहा हजार घरांची निर्मिती करण्यात येणार असून तसा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर झाला आहे. स्वतः पालकमंत्री श्री. मुनगंटीवार या प्रस्तावाचा पाठपुरावा करीत असून लवकरच प्रधानमंत्री आवास योजनेतून चंद्रपुरात 10 हजार नवीन घरकुल उभे राहतील, असा विश्वास त्यांनी नागपुरात व्यक्त केला.

महात्मा फूले नविनीकरण उर्जा व पायाभूत तंत्रज्ञान लिमिटेड (महाप्रित) आणि चंद्रपूर महानगर पालिका मिळून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरबांधणी प्रस्तावासंदर्भात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथील हरिसिंग वनसभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महाप्रितचे संचालक पुरुषोत्तम जाधव,



मुख्य लेखाधिकारी डी.सी.पाटील, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्राचे संचालक अशोक जोशी, वैज्ञानिक संजय बालमवार तर दूरदृष्यप्रणालीद्वारे मुंबईवरून प्रधान सचिव दीपक म्हैसेकर उपस्थित होते.

चंद्रपूर महानगर पालिका अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेमधून खाजगी भागीदारीद्वारे घरांची निर्मिती या घटकांतर्गत घरकुल बांधणे प्रस्तावित आहे. यासाठी म्हाडाच्या अखत्यारीत नवीन चंद्रपूर येथे मौजा कोसारा, खुटाळा येथे जागा उपलब्ध आहे. या साईटवर घरकुल बांधण्याकरीता महाप्रित आणि चंद्रपूर शहर महानगरपालिका यांच्यात 12 एप्रिल 2023 रोजी सामंजस्य करार झालेला आहे.

चंद्रपूर शहरातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देण्याच्या अनुषंगाने महाप्रीत व चंद्रपूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 10 हजार घरकुलांची निर्मिती करण्यात येणार आहे. चंद्रपूर शहरात जागा नसलेले भाडेकरू तथा नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सदर योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ घेता येणार आहे. याकरीता नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत 2 लक्ष 50 हजार रुपयांचे अनुदान तसेच बांधकाम कामगार म्हणून 2 लक्ष रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# इरई नदी पूररेषेच्या पुनर्सर्वेक्षणाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

## पूर नियंत्रण रेषा निश्चितीबाबत नागपूर येथे आढावा

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** इरई नदी ही चंद्रपूर शहरालगत



असून सरासरी सात किलोमीटर ती शहराला समांतर वाहते. सन 2013, 2020 तसेच 2022 मध्ये इरई नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला होता. मात्र इरई नदीला पूर आल्यानंतर व धरणाचे सर्व गेट उघडल्यानंतरही काही भागात गत 20 वर्षात कधीही पाणी पोहचले नाही, असा एम.आर. सॅकचा अहवाल आहे. त्यामुळे वास्तविक स्थिती लक्षात घेऊन प्रात्यक्षिक सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री आणि जुजबी सर्व्हेचा आधार घेतला तर शहराचे नुकसान होईल आणि अवैध बांधकामे वाढतील. त्यामुळे संबंधित यंत्रणेने पुन्हा एकदा वस्तुस्थितीदर्शक सर्वेक्षण करावे, अशा सुचना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

नागपूर येथील हरिसिंग वनसभागृहात इरई नदी पूर नियंत्रण रेषा निश्चितीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. , जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता पद्माकर पाटील, चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते. पूररेषा दर्शक नकाशानुसार चंद्रपूर शहरातील निळी पूररेषा बाधित क्षेत्र हे सुमारे 450 हे.आर. आहे. चंद्रपूर शहर हे तिनही बाजुंनी जंगलाने वेढलेले असल्याने शहराच्या विकासासाठी हेच क्षेत्र शिल्लक आहे. आता या क्षेत्रातील विकास परवानग्या थांबविण्यात आल्यामुळे या क्षेत्रात अनधिकृतपणे बांधकामे सुरू झाली आहेत. कोणत्याही नदीची पूररेषा ठरविणे ही पाटबंधारे विभागाच्या अधिकार क्षेत्रातील बाब असून त्यासंबंधी सर्व्हेक्षण करणे, प्रतिकृती अभ्यास करणे, नकाशा तयार करणे व मंजूर करणे ही पाटबंधारे विभागाची जबाबदारी आहे. नदीच्या पूररेषा संदर्भाने सर्व्हेक्षण किंवा प्रतिकृती अभ्यास करणे ही बाब चंद्रपूर महानगर पालिकेच्या अधिकार क्षेत्रातील नसून याबाबत शासनाकडून कोणतेही अधिकृत आदेश प्राप्त नाही.

दिनांक 24 सप्टेंबर 2022 रोजी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्यचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीच्या अनुषंगाने 2 ऑगस्ट 2013 व 15 जुलै 2022 रोजीचा इरई नदी पूररेषेचा मायक्रोवेव सॅटलाईट डाटा तसेच नकाशा प्राप्त करण्याकरीता एम.आर.सॅक नागपूर यांना शुल्क अदा करण्यात आले आहे. एम.आर. सॅकचे संचालक यांच्याकडून प्राप्त नकाशानुसार दि. 22 नोव्हेंबर 2023 रोजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना पूर रेषेबाबतचा अहवाल सादर करण्यात आल्याची माहिती चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्यावतीने देण्यात आली.



# दिव्यांगांसाठी बँकांनी रॅम्पची व्यवस्था करावी

## प्रहार दिव्यांग संघटनेचा आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील राष्ट्रीयकृत बँकांनी आपल्या पायऱ्या दिव्यांगांसाठी बॅरियर फ्री रॅम्प सह बॅरियर फ्री कराव्यात या मागणीसाठी प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने बँकांना आंदोलनाचा इशारा दिला आहे. दिव्यांग व्यक्तींना बँकिंग सेवा सुलभ आणि सहज उपलब्ध व्हावी यासाठी राष्ट्रकृत बँकांनी प्रवेश करण्यासाठी दिव्यांगांसाठी अर्थात रॅम्प बसवावेत असे रिझर्व बँकेचे निर्देश आहेत. परंतु पैठण शहरातील बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र आणि आयसीआयसीआय बँक या बँकांनी दिव्यांगांसाठी बॅरियर फ्री रॅम्प बसवले नाहीत. सदरील या राष्ट्रकुत बँकांना बॅरिअर फ्री रॅम्प नसल्याने दिव्यांग व्यक्तींना प्रचंड अडचणीला सामोरे जावे लागत असून बँकिंग व्यवहार करण्यासाठी त्यांची कुचंबना होत आहे. सन २०१६ च्या दिव्यांग हक्क अधिकार अधिनियम कायद्यानुसार राज्य व केंद्र शासनाच्या सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयास बॅरियर फ्री रॅम्प असावेत असे निर्देश असताना देखील पैठण शहरातील या बँकांनी दिव्यांग कायदा आणि रिझर्व बँकेच्या निर्देशाकडे दुर्लक्ष केले आहे. याबाबत या राष्ट्रकृत बँकांना प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्याचा लेखी इशारा देण्यात आला आहे.पुढील पंधरा दिवसात अर्थात एक जानेवारीपर्यंत बँकेने दिव्यांगांना सेवा न पुरवल्यास सदरील बँकेचे समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा तालुका अध्यक्ष बाबासाहेब पठाडे यांनी दिला. सदरील बँकांना निवेदन देता वेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे, उपजिल्हाध्यक्ष सिद्धार्थ इंगळे, तालुका अध्यक्ष बाबासाहेब पठाडे, शहराध्यक्ष धोंडीराम सकुंडे, महिला अध्यक्ष राधा खरात, बाबासाहेब शिपनकर व गणेश भवरे आदी प्रहार दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर